


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार १५ मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

# देशातील परिस्थिती गंभीर, सर्वपक्षीय बैठक बोलवा, त्यात पंतप्रधानांनी हजर राहावे -पवार



**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील सध्याची परिस्थिती गंभीर आहे आणि अशा वेळेला देशाच्या सगळ्या नेत्यांची बैठक बोलवावी आणि त्याला प्रधानमंत्र्यांनी स्वतः हजर राहावे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी सुचवले. ते पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. 'गेल्या ३-४ वर्षात सर्वपक्षीय बैठका झाल्या, पण त्यातील एकाही बैठकीत पंतप्रधान नव्हते. पण सध्या एकंदर स्थिती गंभीर आहे असे सांगण्याचे काम मुख्यमंत्री-प्रधानमंत्री करत आहेत, तर तितक्याच गांभीर्याने सगळ्यांनी ही परिस्थिती समजून घ्यावी,' असेही पवार म्हणाले.

**मुख्यमंत्री राहुल गांधींबद्दल बोलले ते अयोग्य-** 'सकाळपासून टीव्हीवर बघतोय कुणी मोटारसायकलवरु न जात आहे, कोणी चालत जात आहे, एकाने तर जाहीर केले की मी मंत्री आहे आणि माझ्या गाड्या मी कमी केल्या. त्या १७ होत्या, आता १७ वरून ८ वर आलो. मला तर धक्काच बसला की १७ गाड्या होत्या आणि कमी केल्यानंतर ८ वर आणल्या. याचा अर्थ या सगळ्यांचा बघण्याचा दृष्टिकोन गांभीर्याचा असला पाहिजे. अशी स्थिती या आधी देशात झाली नव्हती असे नाही, पण आता काळजी घ्यायला हवी. या वेळेला मुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांनीसुद्धा आपली भाषा व्यवस्थित वापरली पाहिजे. राहुल गांधींच्या संबंधी मुख्यमंत्र्यांनी जे शब्द वापरले, ते अयोग्य होते. राहुल गांधी हे विरोधी पक्ष नेते आहेत आणि तेही संसदेत आहेत. विरोधी पक्ष नेता हे संवैधानिक पद आहे आणि ते लोकांमधून निवडून येते. त्यामुळे अशी भाषा या पदावर असलेल्या व्यक्तीसंबंधी वापरणे चुकीचे आहे,' असे शरद पवार म्हणाले. परिस्थिती गंभीर आहे, तर सगळ्या पातळीवर दाखवली पाहिजे!'रु पयाखाली का येतो, याचा विचार केला पाहिजे. आज इराणचा जो विषय आहे त्याचा परिणाम नक्कीच आहे. पण हा परिणाम तेवढा आहे का? निवडणुकीचे निकाल लागून गेले आणि त्यानंतर केंद्र सरकारने हे सगळे निर्णय घेतले. निवडणुका सुरू होते, तेव्हा याचे गांभीर्य नव्हते आणि याची जनतेत जागृती करावी असे वाटले नाही. पंतप्रधान सोमनाथच्या मंदिरात गेले, तिथे जाउन विमान उडवले, ६ विमाने त्या ठिकाणी घेउन शो केला. परिस्थिती गंभीर आहे तर सगळ्या पातळीवर दाखवली पाहिजे. सोनेखरेदी करू नका हे सांगणे याचा अर्थ एकच आहे की आपल्या रुपयाची जी किंमत आहे, ती घसरू द्यायची नाही. हा निर्णय चुकीचा आहे असे मी म्हणत नाही. पण एका बाजूला हे म्हणायचे आणि दुस-या बाजूला वेगळेच सुरू आहे. हे योग्य नाही,' याकडे पवारांनी लक्ष वेधले.

> **पंतप्रधान सोमनाथच्या मंदिरात गेले, तिथे जाउन विमान उडवले, ६ विमाने त्या ठिकाणी घेउन शो केला. परिस्थिती गंभीर आहे तर सगळ्या पातळीवर दाखवली पाहिजे. निवडणुका संपल्यावरच सरकारला गांभीर्य का सुचले?**



# मुख्यमंत्री फडणवीस बुलेटवरून विधान भवनात

**मुंबई/प्रतिनिधी-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनानंतर राज्यातील सत्ताधारी नेत्यांकडूनही त्याची अंमलबजावणी सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज स्वतः बाईक चालवत विधान भवनात दाखल झाले. मात्र, दुसरीकडे मंत्री गिरीश महाजन आणि रवींद्र चव्हाण यांनी विमानातून प्रवास केला. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी टीका केली आहे. राज्यातील अनेक मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्यात आली असून, सरकारी यंत्रणांकडूनही खर्च नियंत्रणावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेत बाईकचा वापर केल्याने प्रशासन आणि मंत्रिमंडळातील इतर सदस्यांनाही एक वेगळा संदेश दिला गेल्याची चर्चा सुरू आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर तसेच पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सार्वजनिक वाहतूक आणि कमी इंधन वापराच्या पर्यायांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःपासून बदलाची सुरुवात केली असून, शासकीय खर्च कमी करणे, उर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षण यावर सरकारने भर दिला आहे. या नव्या निर्णयांमुळे मंत्र्यांचे ताफे, दौरे, प्रवास पद्धती आणि सरकारी कार्यालयांच्या कामकाजात मोठे बदल होणार आहेत. सरकारच्या नव्या आदेशानुसार मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तात्काळ ५० टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. परगावी होणा-या दौ-यांदरम्यान निश्चित मर्यादेपेक्षा जास्त वाहने वापरली जाणार नाहीत, अशी स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आली आहे. मंत्री आणि वरिष्ठ अधिका-यांचे प्रस्तावित परदेश दौरे रद्द करण्यात आले असून, पुढील काही महिन्यांत नव्या दौ-यांना मंजुरी दिली जाणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. विशेष विमान किंवा हेलिकॉप्टरचा वापर टाळून नियमित विमानसेवेचा वापर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. याशिवाय, आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा सार्वजनिक बसने प्रवास करणे मंत्री आणि वरिष्ठ अधिका-यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.

# विधान परिषदेच्या 10 आमदारांनी घेतली शपथ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषदेच्या १० नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी सोहळा आज गुरु वारी (ता. १४ मे) झाला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदेंनी नवनिर्वाचित आमदारांना शपथ दिली. यावेळी शिवसेनेच्या (शिंदे गट) नीलम गो-हे यांच्यापासून शपथविधीला सुरु वात झाली. त्यानंतर शिवसेनेचे बच्चू कडू, शिवसेना ठाकरे गटाचे अंबादास दानवे, त्यानंतर भाजपच्या प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, माधवी नाईक, विवेक कोल्हे, संजय भेंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे झिशान सिद्दीकी यांनी परिषदेतील आमदारकीची शपथ घेतली. परंतु, यावेळी आमदार बच्चू कडू यांच्याकडून शपथविधीच्या सुरु वातीला करण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करण्यात आल्याचे पाहायला मिळाले. विधान परिषदेच्या १० जागांसाठी बिनविरोध निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपचे ५ सदस्य, शिवसेना शिंदे गटाचे २ सदस्य, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) प्रत्येकी एका सदस्याची आमदारपदी नियुक्ती झाली आहे. या सर्व नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी गुरु वारी झाला. यावेळी शिवसेनेच्या नीलम गो-हे यांनी आमदारकीची शपथ घेतली. परंतु, यावेळी त्यांनी शपथेव्यतिरिक्त भाषणही केले.



ज्यामध्ये त्या म्हणाल्या की, आज संभाजी महाराजांची जयंती आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मी अभिवादन करते. आमचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानते, असे म्हटले. नीलम गो-हे यांनी आभार मानल्यानंतर यावेळी मुख्य सचिवांनी सूचना करत नवनिर्वाचित सदस्यांना शपथेचा नमुना दिला. त्यामुळे त्यांनी शपथेपूर्वी किंवा शपथेनंतर कोणत्याही नावाचा किंवा घोषणेचा उल्लेख करू नये, अशी विनंती केली. बच्चू कडू यांनीही यावेळी शपथ घेतली. मात्र, त्यांनी मला थोडी सुविधा दिली पाहिजे, असे म्हणत भाषण करण्याची संधी देण्यात यावी, अशी विनंती केली. मात्र, त्यांच्या या मागणीवर तत्काळ विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी नाही.. सुविधा नाही कोणाला असे म्हणत त्यांना रोखले. मात्र, तरी सुद्धा कडू यांनी त्याकडे दुर्लक्ष करत शिवसेना नेते एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो आणि छत्रपती संभाजीराजेंना अभिवादन करतो, असे म्हणत मुख्य सचिवांकडून शपथेव्यतिरिक्त काहीही न बोलण्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळाले.


# खरात प्रकरणी उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे निलंबित

■ तब्बल 143 वेळा कॉल ■ खरातच्या पत्नीच्या नावे गुंतवणूक केल्याचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांनंतर आता प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आल्याचं दिसतंय. अशोक खरात सोबत आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप असलेल्या उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे याचे निलंबन करण्यात आलं आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिजित भांडेच्या निलंबनाचे आदेश दिले. उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अभिजीत भांडे याला अशोक खरात प्रकरण चांगलंच भोवल्याचं चित्र आहे. अशोक खरातसोबत असलेले आर्थिक व्यवहार त्याच्या अंगलट आले आहे. अशोक खरात याच्यासोबतच अभिजित भांडे याचे काल रेकार्डस हाती आल्यानंतर महसूलमंत्र्यांनी त्याच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत.



भोंदू अशोक खरात आणि उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांच्यामध्ये तब्बल १४३ वेळा फोन काल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अशोक खरातने अभिजीत भांडेला ८३ वेळा काल केले आहेत. तर भांडेने खरातला ६० वेळा काल केले आहेत.४ एप्रिल २०२५ ते १५ मार्च २०२६ या दरम्यान, अभिजीत भांडे आणि अशोक खरात यांच्यामध्ये हे काल झाल्याची माहिती आहे. या दोघांच्या दरम्यान १०,०३७ सेकंद म्हणजे जवळपास ३ तास काल झाल्याचं समोर आलं आहे. ७ ऑगस्ट २०२५ रोजी या दोघांच्या दरम्यान ११ मिनिटे चर्चा झाली होती. तर ७ जुलै २०२५ रोजी, एकाच दिवसात १० काल तर २३ नोव्हेंबर २०२५ रोजी १४ वेळा काल झाल्याचं रेकार्ड समोर आलं. याच पुराव्याच्या आधारे आता अभिजीत भांडे याच्या निलंबनाचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिल्याची माहिती आहे. त्यामुळे रुपाली चाकणकरांच्या नंतर आता अभिजीत भांडेची देखील चौकशी केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अभिजीत भांडे हा उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत होता. अशोक खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावे (पान २ वर)




# महाराष्ट्रातील 9.86 कोटी मतदारांची पडताळणी होणार

## मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेची घोषणा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण-तिसरा टप्पा' (एसआयआर फेज-३) राबवण्याचे अधिकृत आदेश दिले आहेत. या महत्त्वाकांक्षी मोहिमेत महाराष्ट्राचा प्रामुख्याने समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. चालू असलेल्या जनगणनेच्या 'हाउस लिस्टिंग' प्रक्रियेचा विचार करून आयोगाने हे वेळापत्रक आखले असून, हवामानाची प्रतिकूलता लक्षात घेता केवळ हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाख या भागांना या टप्प्यातून वगळण्यात आले आहे.महाराष्ट्रातील या मोहिमेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून एकूण ९७,९२४ बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) घरोघरी जाउन मतदारांच्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांच्या ९६,९४९ बूथ लेव्हल एजंट्सची



(बीएलए) मदत घेतली जाणार आहे.

आयोगाच्या वेळापत्रकानुसार, २० जून ते २९ जून २०२६ या काळात अधिकारी आणि कर्मचा?यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल, त्यानंतर ३० जूनपासून प्रत्यक्ष घरोघरी भेटी देउन पडताळणी करण्याच्या कामाला सुरु वात होणार आहे. ही मोहीम २९ जुलैपर्यंत असणार आहे.राज्यातील मतदारांसाठी ५ ऑगस्ट २०२६ ही तारीख महत्त्वाची ठरणार आहे, कारण याच दिवशी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांना आपल्या नावातील दुरु स्ती, पत्ता बदल किंवा नवीन नाव नोंदणीसाठी दावे आणि हरकती सादर करता येतील. सर्व हरकतींचा निपटारा केल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्राची अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे. निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर (पान २ वर)

# होर्मुझमध्ये गुजरातचे जहाज बुडाले

■ ओमान किनारपट्टीनजिक दुर्घटना,

■ १४ क्रु मेंबर्सना कोस्टगार्डने वाचवले

**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** इराण-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये आणखी एक गुजराती मालवाहू जहाज बुडाले. 'हाजी अली' नावाचे हे जहाज १३ मे रोजी सकाळी ओमानच्या सागरी हद्दीतून जात असताना, त्यावर ड्रोन किंवा क्षेपणास्त्रासारख्या शस्त्राने हल्ला झाला. या अपघातानंतर जहाजाला आग लागली, परंतु ओमानच्या तटरक्षक दलाने जहाजावरील सर्व १४ कर्मचा-यांची सुखरूप सुटका केली. गुजरातच्या द्वारका येथील रहिवासी आणि जहाजाचे मालक सुलतान अहमद अन्सार यांनी सांगितले की, एमएसव्ही हाजी अली हे जहाज बेरबेरा बंदरातून शारजाकडे जात होते. पहाटे सुमारे ३:३० वाजता ओमानच्या किना-याजवळ जहाज उलटले. कर्मचा-यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना स्फोटकासारखी एखादी वस्तू जहाजाला आदळल्याचा आवाज ऐकू आला. त्यानंतर जहाजाला आग लागली. परिस्थिती अधिकच बिकट झाल्याने, जहाजावरील सर्व १४ कर्मचा-यांनी लाईफबोटच्या साहाय्याने जहाज सोडले. यापूर्वी ७ मे रोजी, गुजरातच्या द्वारका येथून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जात असलेले एमएसव्ही अल फैज नूरे सोलेमानी-१ हे दुसरे मालवाहू जहाज देखील अमेरिका आणि इराणच्या नौदलादरम्यान झालेल्या गोळीबाराचे लक्ष्य बनले होते.



# केजरीवालसह आपच्या ५ नेत्यांच्या अडचणी वाढल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने 'आप'च्या पाच प्रमुख नेत्यांविरु द्ध अवमान कारवाई सुरू केली आहे. त्यापैकी सर्वांत प्रमुख म्हणजे आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांचाही यात समावेश आहे. हे प्रकरण दिल्ली मद्य धोरणाशी संबंधित आहे, यावरील याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्यासमोर सुरू होती. आता या प्रकरणाची सुनावणी दुस-या खंडपीठासमोर होईल. आम आदमी पक्षांच्या नेत्यांवर सोशल मीडियावर न्यायाधीशांविरु द्ध हेतुपुरस्सर मोहीम चालवून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा आणि न्यायालयाच्या विश्वासार्हतेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. न्या. शर्मा यांनी आदेशात हे स्पष्ट आणि कठोर शब्दांत नमूद केले. न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा या दिल्ली मद्य धोरण प्रकरणाची सुनावणी करत होत्या. न्यायाधीशांनी या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवावे, अशी मागणी आप नेत्यांनी केली होती.

# युपीत वादळ, 56 ठार

**प्रयागराज/वृत्तसंस्था :** राजधानी दिल्लीसह उत्तर भारतात वादळी वा-याने हाहाकार माजवला आहे. गेल्या दोन दिवसांपासून वादळी वारे आणि विजांच्या



कडकडाटासह मुसळधार पाउस कोसळत आहे. या पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. बुधवारी उत्तर प्रदेशात वादळी वा-यासह झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने भीषण परिस्थिती निर्माण केली. निसर्गाच्या या कोपामुळे राज्याच्या विविध भागांत घडलेल्या दुर्घटनांमध्ये तब्बल ५६ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, या पावसामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.वादळ आणि पावसामुळे उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांत घरांची पडझड झाली आहे. सर्वाधिक जीवितहानी प्रयागराज आणि भदोही जिल्ह्यांत झाल्याची माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून वीजपुरवठाही खंडित झाला आहे. अवकाळी पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून शेतक-यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

**आदित्यनाथ यांचे मदतीचे आदेश-** राज्यात झालेल्या या भीषण जीवित आणि वित्तहानीची दखल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी संबंधित जिल्हाधिका-यांना तातडीने पंचनामे करून बाधित कुटुंबांना आणि पीडितांना सानुग्रह मदत देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच जखमींना तातडीने उपचार पुरवण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

# वादळात टीनशेडसोबत 50 फूट ऊंचावर उडाले 'नन्हे मियाँ'

उत्तर प्रदेशातील बरेलीमध्ये बुधवारी भीषण चक्रीवादळाने अक्षरशः तांडव केले आणि संपूर्ण जिल्ह्यातच हाहाकार माजवला. अचानक बदललेले हवामान आणि या नंतर आलेला सोसाट्याचा वारा आणि पावसाने नागरिकांना




सावरण्याचीही संधी मिळाली नाही. या वादळात झाडे उन्मळून पडली आणि विजेचे खांबही कोसळले. मात्र, यातच, एक थरकाप उडवणारी घटनाही घडली आहे. एक निर्माणाधीन टीनशेड वादळात उडून गेले आणि त्यासोबत 'नन्हे मियाँ' नावाचा एक तरु णही हवेत उंच उडाला. या अंगावर शहारे आणणा-या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर जबरदस्त व्हायरल होत आहे. माध्यमांतील वृत्तानुसार, नन्हे मियाँ एका निर्माणाधीन मंगल कार्यालयाच्या कामात होते. अचानक आलेल्या वादळामुळे टीनशेड उडू लागले. स्वत?चा बचाव करण्यासाठी त्यांनी टीनशेडला बांधलेली दोरी घट्टपणे पकडली. मात्र वा-याचा वेग एढा भयंकर होता की, काही सेकंदातच संपूर्ण टीनशेड उखडले गेले आणि नन्हे मियाँ देखील त्यासोबत काही फूट उंच हवेत उडाले.

**मक्याच्या शेतात जाउन पडले 'नन्हे मिया'** -नन्हे मियाँ हवेत सुमारे ४० ते ५० फूट उंचावर उडून काही अंतरावर असलेल्या एका मक्याच्या शेतात जाउन पडले. या भीषण अपघातात त्यांचा हात फ्रॅक्चर झाला असून शरीराला गंभीर दुखापतही झाली आहे. हा सर्व प्रकरा एका स्थानिक व्यक्तीने बघितला आणि त्यांच्याकडे धाव घेतली. यानंतर त्यांना रु ग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय दंडाधिका-यांनी रु ग्णालयात जाउन त्यांची विचारपूस केली असून सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही दिले आहे.

# चारधाम यात्रेत 40 भाविकांचा मृत्यू

## केदारनाथमध्ये 22 तर बद्रीनाथमध्ये 7 जणांचा बळी

**डेहराडून/वृत्तसंस्था :** चारधाम यात्रेत भाविकांची संख्या सातत्याने विक्रम करत आहे. १९ एप्रिल रोजी सुरू झालेल्या या यात्रेत १३ मे पर्यंत १२ लाख ६४ हजार २१७ भाविकांनी चारही धामांचे दर्शन घेतले आहे. पण दुसरीकडे, यात्रेदरम्यान मृत्यूचा आकडाही सातत्याने वाढत आहे.राज्य आपत्कालीन परिचालन केंद्र ने १४ मे रोजी सकाळी १० वाजता जारी केलेल्या अहवालानुसार, आतापर्यंत चारधाम यात्रेत ४० भाविकांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक २२ मृत्यू केदारनाथ धाममध्ये नोंदवले गेले आहेत. तर बद्रीनाथमध्ये ७, यमुनोत्रीमध्ये ६ आणि गंगोत्रीमध्ये ५ भाविकांचा जीव गेला आहे. सरकार सातत्याने चांगल्या आरोग्य सुविधा आणि वैद्यकीय तयारीचा दावा करत (पान २ वर)





# औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद

## जिल्ह्यात औषध पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज, नियंत्रण कक्ष स्थापन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी एक दिवसीय देशव्यापी बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमध्ये देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेते सहभागी होणार असून, त्यांनी आपले व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत आणि अखंडपणे उपलब्ध व्हावा, यासाठी अन्न व औषध प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असल्याची माहिती अमरावतीचे सहाय्यक आयुक्त (औषधे) डॉ. अ. मा. माणिकराव यांनी दिली आहे.

मुंबई येथील सह आयुक्त (औषधे) तथा नियंत्रण प्राधिकारी यांच्या निर्देशानुसार, अमरावती जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न असलेली औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी प्रशासनाने तातडीने समन्वय साधला आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून अत्यावश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधित दुकानांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक तालुका आणि गाव पातळीवर देखील आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील, यादृष्टीने प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहे.

या आणीबाणीच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था आणि आरोग्य सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांच्या प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जात आहे.

नागरिकांनी या बंदच्या काळात कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. औषध पुरवठ्याबाबत नागरिकांना कोणतीही अडचण किंवा तातडीची गरज भासल्यास, अमरावती कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नागरिक ०७२१-२६६५८९२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा jcamrawati2022@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधू शकतात. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने औषधे उपलब्ध करून देण्यास प्रशासन पूर्ण मदत करेल, अशी ग्वाही डॉ. माणिकराव यांनी दिली आहे.

# सुकळी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी

## स्रोतस्तरावरील कचरा विलगीकरणावर भर; RDF निर्मिती, बायोमायनिंग व वैज्ञानिक लँडफिल प्रक्रियेचा आढावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, पर्यावरणपूरक आणि वैज्ञानिक पद्धतीने राबविण्याच्या दृष्टीने महापौर श्रीचंद तेजवानी, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी बुधवार, दि. १३ मे रोजी सुकळी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला भेट देऊन विविध विभागांची सखोल पाहणी केली.

या भेटीदरम्यान मान्यवरांनी प्रकल्पाच्या एकूण कार्यपद्धतीचा आढावा घेत शहरातून दररोज संकलित होणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. सध्या प्रकल्पाची २५० मेट्रिक टन कचरा प्रक्रिया करण्याची क्षमता असून, शहरातून येणाऱ्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण आणि विलगीकरण केले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

प्रकल्पामध्ये ओला कचरा, सुका कचरा, RDF (Refuse Derived Fuel) आणि इनर्ट अशा विविध प्रकारांमध्ये कचऱ्याचे विभाजन करण्यात येते. यामध्ये विशेषतः ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे व्यवस्थापन केले जाते, तर ज्वलनशील स्वरूपातील कचऱ्यापासून RDF तयार करण्यात येते. हा RDF दररोज सुमारे १०० मेट्रिक टन प्रमाणात चंद्रपूर येथे पाठविण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. इतर शहरांच्या तुलनेत हे प्रमाण लक्षणीय मोठे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भेटीदरम्यान मान्यवरांनी प्लांटमध्ये उपलब्ध विविध यंत्रसामग्रीची कार्यपद्धती प्रत्यक्ष पाहिली. कचरा वर्गीकरणासाठी



वापरण्यात येणाऱ्या मशिनरी, कन्वेयर सिस्टीम, विलगीकरण प्रक्रिया तसेच RDF निर्मितीची संपूर्ण कार्यपद्धती याबाबत अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली. प्लांटमध्ये सध्या उपलब्ध RDF साठा, चंद्रपूरला पाठविण्यात आलेल्या RDF चे प्रमाण आणि भविष्यातील व्यवस्थापनाबाबतही चर्चा करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी 'स्रोतस्तरावरील कचरा विलगीकरण' या उपक्रमाला अधिक गती देण्याच्या सूचना केल्या. नागरिकांनी घरातूनच ओला आणि सुका कचरा वेगळा करून दिल्यास संपूर्ण प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि पर्यावरणपूरक होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. शहरातील नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणाबाबत अधिक जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

तसेच सुकळी प्रकल्प परिसरातील प्राणी अवशेष जाळणी प्रकल्प (Animal Incineration Plant) याचीही पाहणी करण्यात आली. प्राण्यांचे अवशेष वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या कार्यपद्धतीची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यामुळे पर्यावरणीय प्रदूषण कमी होण्यास मदत होत असल्याचे सांगण्यात आले.

यानंतर वैज्ञानिक पद्धतीने विकसित करण्यात येत असलेल्या लँडफिल साईटची पाहणी केली. भविष्यातील कचरा व्यवस्थापन लक्षात घेऊन पर्यावरणीय नियमांचे पालन करत लँडफिल विकसित करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. याशिवाय बायोमायनिंग प्रकल्पालाही भेट देऊन जुन्या कचऱ्याचे वैज्ञानिक प्रक्रियेद्वारे पुनर्वापर आणि विल्हेवाटीचे काम कशाप्रकारे सुरू आहे, याचा आढावा घेण्यात आला.

शहरातील वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कचऱ्याचे पुनर्वापरक्षम व्यवस्थापन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेला अधिक सक्षम आणि शाश्वत बनविण्यासाठी मनपा प्रशासन कटिबद्ध असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या पाहणी दरम्यान शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, नगरसेवक ॲड.प्रशांत देशपांडे, राजु कुरील, उपायुक्त योगेश पिठे, शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे, उपअभियंता विवेक देशमुख, अभियंता राजेश आगरकर, शरद तिनखेडे, मनपा कर्मचारी, कंत्राटदार उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### तेजस्विनी पतसंस्थेत १० कोटींच्या

करून कार्यालयाची पाहणी करण्यात आली. मात्र त्यानंतरही ठोस कारवाई झालेली दिसत नसल्याची नाराजी ठेवीदारांनी व्यक्त केली आहे.तपासणी दरम्यान संस्थेचे सॉफ्टवेअर थकबाकीमुळे बंद असल्याची माहिती समोर आली. संबंधित सॉफ्टवेअर कंपनीची सुमारे १ लाख ३५ हजार रुपयांची थकबाकी असल्याने डेटा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय वायफाय सेवा बंद असल्याने आर्थिक व्यवहारांची संपूर्ण माहिती मिळण्यात अडथळे आले.

दरम्यान, संस्थेचे नियमित लेखापरीक्षण, वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच काही संचालकांच्या नियुक्त्यांबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात प्रमोद शिंदे यांच्या भावाने अवधूतवाडी पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रार दाखल केल्याने प्रकरणाला आणखी वेगळे वळण मिळाले आहे.प्रशासक नियुक्त होऊन जवळपास २५ दिवस उलटल्यानंतरही गुन्हे दाखल न झाल्याने ठेवीदार आक्रमक झाले आहेत. २० मे पूर्वी न्याय न मिळाल्यास १ जूनपासून साखळी व आमरण उपोषणासह तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा ठेवीदार आणि कर्मचाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिला. यावेळी प्रभाकर सोनटक्के, अमोल वगारे, रवी मिश्रा, संध्या सोनटक्के, जगदीश अटल, प्रियांका लंगोटे, सर्वेश नवाडे आदी उपस्थित होते.

### परप्रांतीय भटक्या कुटुंबावर

(वय१७ वर्षे, रा. आर्वी, जिल्हा वर्धा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बाभुळगाव पोलीसांनी कलम ३०९(६) BNS अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, अज्ञात आरोपींचा तपास सुरू आहे.

पोलिस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार दिनांक १४ मे रोजी रात्री २ वाजता बाभूळगाव येथे आयुर्वेदिक औषध विक्रीसाठी आलेल्या फिर्यादी कुटुंबावर अज्ञात दरोडेखोरांनी हल्ला केला. लाकडी काठीने आई सुनीता चितोडिया, वडील जब्बरसिंग चितोडिया, आजोबा सुजितसिंग ठाकूर, मामा विनोदसिंग ठाकूर ,मामी गीता ठाकूर यांना मारहाण करून जखमी केल्यानंतर त्यांनी फिर्यादीच्या सोन्याच्या नथणी (६ हजार रुपये किंमत), चांदीच्या पैजण (५०० रुपये किंमत) व २० हजारांची नगदी हिसकावली. कुटुंबातील सर्वजण सध्या उपचाराधीन असून, घटनास्थळी रक्ताचे डाग व पायांचे पुरावे मिळाले आहेत. यातील फिर्यादीचे वडील जब्बरसिंग यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने,स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे तसेच बाभूळगावच्या पोलिस निरीक्षक दीपमाला भेंडे यांनी तत्काळ घटनास्थळ गाठले.या प्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित बेंबरे हे तपास करीत आहेत. सीसीटीव्ही फुटेज, आजूबाजूच्या साक्षीदार आणि गुन्हेगारी नोंदी तपासल्या जात असून, लवकरच आरोपींना अटक होण्याची शक्यता आहे.या घटनेमुळे स्थानिक व्यापारी व रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बाभुळगाव परिसरात रात्रीच्या वेळी गस्त वाढवण्यात आली असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वेतन रखडल्याने समुदाय आरोग्य

असल्याची भावना अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व समुदाय आरोग्य अधिकारी शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी जिल्हा परिषद अमरावती समोर अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. तसेच, बदली होऊन पाच महिने उलटल्यानंतरही काही अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले नसल्याने संबंधितांना तातडीने कार्यमुक्त करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

'आम्ही अनेक वेळा जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदने दिली. मात्र आमच्या प्रश्नांची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे,' अशी माहिती जिलाध्यक्ष डॉ. आनंद उल्हे यांनी दिली.

### ट्रकच्या चाकाखाली सापडून

घटनास्थळी पोहोचले. तेव्हा तेथे एमएच २७/बीएक्स ९६७८ क्रमांकाचा ट्रक उभा असून शुभम रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसून आला. घटनास्थळी उपस्थित असलेला ट्रक चालक पवन देवबाजी नाईक (वय ३७) व इतरांनी पोलिसांना सांगितले की, ते शेतात मका भरण्यासाठी आले होते. काम सुरू असताना शुभम ट्रकच्या पुढील बाजूने जात होता. त्याचवेळी चालकाने ट्रक पुढे घेतला असता मागील चाकाखाली काहीतरी आल्याची जाणीव झाली. खाली उतरून पाहिले असता शुभमच्या डोक्यावरून ट्रकचे चाक गेल्याचे निदर्शनास आले. या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी वडिलांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी ट्रक चालक पवन देवबाजी नाईक याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवणे व मृत्यूस कारणीभूत ठरण्याचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### आयशर ट्रकमधून ११ गोवंशाना

पेट्रोलपंप चौकात ट्रक ला पकडून ताब्यात घेतले व त्यातील ३ लाख ३० हजार रुपये किमतीची गोवंश व १५ लाख रुपयांचा ट्रक असा एकूण १८ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ११ गोवंशाना जीवदान दिले.यातील आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे

### तिवसा ते कुऱ्हा मार्गावर तब्बल

मोठ्या प्रमाणात गांजा तिवसा मार्गे अमरावतीकडे नेण्यात येणार आहे. माहिती अत्यंत खात्रीशीर असल्याने पोलिसांनी तत्काळ हालचाली सुरू केल्या.

NDPS कायद्यानुसार आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करत राजपत्रित अधिकारी, शासकीय पंच, वजन काटेवाला तसेच फोटोग्राफर यांच्या उपस्थितीत तिवसा–कुऱ्हा मार्गावर शेंदुरजना बाजार नजीक सापळा रचण्यात आला. काही वेळातच माहितीप्रमाणे एक विनाक्रमांकाची सिल्वर-राखाडी रंगाची बोलेरो वाहन तेथे येताना दिसून आले. पोलिसांनी वाहन अडवून तपासणी केली असता वाहनामध्ये ठेवलेल्या पाच नायलॉन कट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला.

तपासणीदरम्यान वाहनातील चालक तथा मुद्देमाल मालक मोहन मनदेव चव्हाण (वय २८, रा. मांजरी म्हसला) यास पोलिसांनी ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या गांजाचे एकूण वजन ९३ किलो ६०० ग्रॅम इतके असून त्याची अंदाजे बाजार किंमत १८ लाख ७२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले बोलेरो वाहन, वाहनाच्या दोन नंबर प्लेट असा सुमारे ५ लाख रुपयांचा अतिरिक्त मुद्देमालही जप्त करण्यात आला. एकूण कारवाईत २३ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला आहे.

सदर आरोपीस मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाईसाठी तिवसा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असून NDPS कायद्यान्वये गुन्हा नोंद प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड तसेच चांदूर रेल्वे उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि मुलचंद भांबुरकर, पोउपनि सागर हटवार तसेच पोलीस कर्मचारी अमोल देशमुख, सुधीर बावणे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, निलेश डांगोरे, रवींद्र बावणे, बळवंत दाभने, भूषण पेठे, पंकज फाटे, चालक संजय प्रधान, हर्षद घुसे व तिवसा पोलीस स्टेशनचे अरविंद गावंडे यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. अमरावती जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या कठोर मोहिमेमुळे अवैध तस्करी करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशाच प्रकारच्या धडक कारवाया सुरू राहतील, असा इशारा पोलिस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

### महिलांनो आत्मरक्षणासाठी

अरुणा इंगोले. जयश्री खातखीडे, वंदना दारवेकर , मदत कक्षेच्या सोनाली देशमुख, तालुकाप्रमुख छाया निचळ,मिनाक्षी कपले, डॉ भावना भूतडा,भारतीय जनता पार्टीच्या मेघा भारती, प्रगती पोटे वर्षा उफाळे, विद्या अरबट, अपर्णा मालठाने, प्रा. प्रणिता बिजवे, वृंदा मुकतेवार, भाग्यश्री सगणे,प्रीती उमाळे ,डॉ दिनेश म्हाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आश्विनी अरबट यांनी तर संचालन मनोज गव्हाणे व प्रा मंजुषा यांनी केले.

गेल्या अनेक दिवसापासून देशात तथा महाराष्ट्रात लव जिहाद च्या घटना वाढत आहेत , यासाठी शासन स्तरावर कायद्याच्या माध्यमातून कारवाई होत आहे मात्र लोकांनी सावध राहून अशा घटना होऊ नये यासाठी सजग राहण्याची गरज आहे, यावर नागरिकांनी कशी काळजी घ्यावी या उद्देशाने अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर मध्ये ' हुंकार स्त्री शक्तीचा ' या अंतर्गत प्रसिद्ध वक्ता तथा प्रखर हिंदत्ववादी म्हणून प्रसिद्ध असलेल्या काजल हिंदुस्थानी यांनी संबोधित केले.

गोपाल पाटील अरबट मित्र मंडळ यांनी हा कार्यक्रम घेतला. शहरातील बस स्थानक चौकात असलेल्या कन्या शाळेच्या मैदानात यावेळी काजल हिंदुस्थानी यांना ऐकण्यासाठी मोठी गर्दी जमली होती. विशेषतः महिला मोठया प्रमाणात एकत्र आल्या होत्या , यावेळी दर्यापूर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

आपल्या प्रखर वाणीतून काजल हिंदुस्थानी यांनी लव जिहाद चे भीषण वास्तव लोकांसमोर मांडले. यासाठी देव- देश - धर्म याबाबत चे संस्कार आपल्या मुलांवर करण्याचे आवाहन करत महिलांनी आत्मरक्षणासाठी दुर्गा बनण्याचे सुद्धा आवाहन काजल हिंदस्थानी यांनी केले. येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेना नेते गोपाल अरबट यांच्या जन्म दिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शिवसेना नेते गोपाल पाटील अरबट यांच्यासह महेंद्र भांडे, तुषार चौधरी, राहुल भुबर, नागोराव केने, प्रा विनोद बिजवे, निलेश टवलारकर विलास साखरे, नंदू निकोले, हेमंत उमाळे, सागर गेठे, तुषार चौधरी, निरज नागे, मुन्ना इसोकार, अतुल सगणे, विनय गावंडे, युवा सेना तालुका प्रमुख भूषण नागे,अमित ठाकरे ,योगेश गायकवाड,सतिश नागे, सूरज पाचखडे, संदीप गुल्हाने,प्रविण बायस्कर,बाप्पू साबळे,सौरभ वायझडे, गजू चांदुरकर, गणेश लाजूरकर, सौरभ मलिये, सावळे नगरसेवक स्वप्निल गावंडे, रोशन कट्यारमल नगरसेवक, गणेश धुराटे, कपिल पोटे, आदींनी परिश्रम घेतले.

### बांधकाम स्थळांवरील विजेच्या

घालत असताना पोलिसांना खबऱ्याकडून माहिती मिळाली की, साहिल राऊत आणि त्याचा साथीदार रेल्वे स्टेशन चौक परिसरात संशयास्पदरीत्या फिरत आहेत. तसेच त्यांनी शहरातील अनेक बांधकामस्थळांवरून विजेच्या तारा चोरी केल्याची माहितीही मिळाली.

माहितीची खातरजमा करत पोलिसांनी तत्काळ सापळा रचला आणि दोघांनाही ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र कसून चौकशीत त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली.

चौकशीदरम्यान आरोपींनी गाडगेनगर, राजापेठ आणि बडनेरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विजेच्या तारा चोरी केल्याची कबुली दिली. या प्रकरणी पोलिसांनी विविध साहित्यांसह एकूण १.९२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने तसेच कर्मचारी सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाडे आणि राजिक रायलीवाले यांच्या पथकाने केली. शहरात वाढत्या मालमत्ता चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी गुन्हे शाखेकडून विशेष मोहीम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून 'एल निनो'च्या

माहिती दिली.

जिल्हाधिकारी यांनी जलयुक्त शिवार अभियानाची सद्यस्थिती, तलाव आणि नाल्यांमधील गाळ काढणे, कालवा दुरुस्ती, चेक डॅमची कामे आणि नाला खोलीकरणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. तसेच सर्व जलसंधारण कामांचे मॅपिंग करण्याच्या सूचना दिल्या.

ग्रामीण व शहरी भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई लक्षात घेऊन पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी नियोजन करावे. ग्रामीण भागात टंचाईवर मात करण्यासाठी सार्वजनिक बोअरवेलवर सोलर पंप बसवण्याच्या कामाला गती देण्याच्या सूचना करण्यात आल्या. जिल्ह्यातील जलाशयांमधील उपलब्ध पाणी पिण्यासाठी प्राधान्याने उपयोगात आणावे. शहरी भागात नळजोडणीची तपासणी करून पाणीगळती तात्काळ दुरूस्त करण्यात यावी. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला कळविण्यात यावे, अशा सूचना दिल्या.

सिंचनासाठी पाण्याचा वापर करताना सूक्ष्म नियोजन करावे. कालवा दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्यात यावेत. कृषी विभागाने शेतीसाठी पाण्याचे नियोजन करावे. पीक विम्याची सद्यस्थिती आणि शेततळ्यांच्या कामांचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी चाऱ्याची सद्यस्थिती तपासून आवश्यक ते नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. याबाबत पशूसंवर्धन विभागाने जुलैपर्यंत चाऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुरेसा चारा उपलब्ध होणार आहे. तसेच शासकीय जमिनीवर चारा लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

जलसंधारणाच्या कामातून भूजल पातळी वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. प्रामुख्याने रिचार्ज शाफ्टच्या कामाचे नियोजन करावे. तसेच नवीन बोअरवेलच्या कामांवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रोजगार हमी योजनेतून 'गाव तिथे जलसंधारण कामे' राबवली जाणार आहेत. यात प्रामुख्याने शेततळे, पाझर तलाव, नाला खोलीकरण आणि गाळ काढणे, तसेच बोअरवेल आणि विहीर पुनर्भरणाची कामे हाती घेण्यात यावी. वन विभागानेही पाणी साठविण्यासाठी जागा निवडून कामे सुरू करावीत, असे निर्देश देण्यात आले.

### वारंवार खंडित होणाऱ्या

अशासारखे उपकरणे जळत आहे. ज्यामुळे लोकांना हा त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत महा वितरण चांदुर रेल्वे येथील इंजिनिअर स्थूल यांना निवेदन सादर करण्यात आले.

यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करण्यात येईल असे स्थूल यांनी सांगितले.

निवेदन देताना माजी नगराध्यक्ष शिट्टु सूर्यवंशी, शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष निवास भाऊ सूर्यवंशी, शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष रुपेश पुडके, स्वप्निल मानकर,सारंग देशमुख, सागर गरुड, अजय देसाई, अर्जुन सरदार, तेजस वानखडे, आर्यन वणवे तसेच काँग्रेस कमिटीचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### खरात प्रकरणी उपजिल्हाधिकारी

असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याप्रकरणी आता त्यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अशोक खरातशी संबंधित अनेक कामांमध्ये अभिजीत भांडेची गुंतवणूक असल्याचा आरोप केला जात आहे. आता त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईनंतर खरातशी संबंधित इतर महसूल अधिका-यांचेही धाबे दणाणल्याची चर्चा आहे. शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या अशोक खरातमुळे रु पाली चाकणकर यांच्यासह अनेक राजकारणी अडचणीत आल्या आहेत. या प्रकरणात संबंधित सर्वांची चौकशी करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं आहे. तसेच या प्रकरणात कुणालाही सोडणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे अशोक खरातशी संबंधित प्रशासकीय अधिकारी अडचणीत आले असल्याची चर्चा सुरू आहे.

### महाराष्ट्रातील ९.८६ कोटी

आपले प्रतिनिधी नियुक्तकरण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि सर्वसमावेशक होईल. या मोहिमेमुळे आगामी निवडणुकांसाठी राज्याकडे एक त्रुटी मुक्त आणि अद्ययावत मतदार डेटाबेस उपलब्ध होणार आहे. पहिल्या दोन टप्प्यांत देशातील ५९ कोटी मतदारांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि पंजाब यांसारख्या मोठ्या राज्यांमध्ये कामाला वेग येणार आहे.

### तनिष्का जोशीने दहावीत गणित आणि विज्ञानात मिळवले १०० पैकी १०० गुण

**अचलपुर/प्रतिनिधीः-**नुकत्याच जाहीर झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेच्या निकालात फातिमा कॉन्व्हेंट स्कूल अचलपुर ची विद्यार्थिनी तनिष्का अभय जोशी हिने गणित व विज्ञान या दोन्ही विषयात पूर्णपैकी पूर्ण १०० गुण प्राप्त करून जिल्हात अव्वल स्थान मिळविले आहे. यापूर्वीही पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तिने तालुक्यातून आणि जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला आहे .डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत वर्ग नववी मध्ये तिने प्रथम क्रमांक प्राप्त केला होता .गणित संबोध, गणित प्राविण्य, गणित प्रज्ञा या सर्वच परीक्षांमध्ये ती तालुक्यातून प्रथम आली होती. ऑल इंडिया मॅथ्स सायन्स टॅलेंट परीक्षेतही तिने नेत्रदीपक यश मिळविले आहे. आणि सायन्सच्या चौथीपासून दहावीपर्यंतच्या सर्वच ऑलिंपियाड परीक्षेत मध्ये तिने सुवर्णपदक प्राप्त करून सेकंड लेव्हलला मेरिट मिळविला आहे.

तिला चित्रकला व संगीताची विशेष आवड असून तिने शास्त्रीय संगीत व सुगम संगीताच्या मध्यमापरीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केल्या आहेत. अतिशय हुशार मेहनती व मनमिळाऊ विद्यार्थिनी म्हणून तिने दहावी शाळेची हेड गर्ल म्हणून काम केले आहे. शाळेच्या प्राचार्य सिस्टर व्हिंसी सर्व शिक्षक वृंद यांचा तिच्या यशात व जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे तसेच डीलाईट कोचिंग इन्स्टिट्यूट मधून मिळालेल्या विशेष मार्गदर्शनामुळे आपण हे यश मिळवू शकलो. याकरता ती आपल्या यशाचे श्रेय सर्व शिक्षक व पालकांना देते.

### चारधाम यात्रेत ४० भाविकांचा मृत्यू

आहे, परंतु वाढत्या मृत्यूच्या आकडेवारीमुळे यात्रा मार्गावरील आरोग्य आव्हाने आणि उच्च उंचीशी संबंधित समस्यांची गंभीरता देखील दिसून येत आहे. आरोग्य विभागाचे म्हणणे आहे की, बहुतेक मृत्यू हृदयविकाराचा झटका, उच्च उंचीवरील आजार , उच्च रक्तदाब आणि इतर आरोग्यविषयक कारणांमुळे झाले आहेत. २० दिवसांपूर्वी केदारनाथमध्ये गुजरातच्या भाविकाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला होता.२० दिवसांपूर्वी केदारनाथमध्ये गुजरातच्या भाविकाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला होता.

मृत्यूमागे उंच प्रदेशातील आजार, हृदयविकाराचा झटका आणि जुने आजार

आरोग्य विभागाच्या मते, चारधाम यात्रेत आतापर्यंत झालेले बहुतेक मृत्यू प्रकृती बिघडल्यामुळे, हृदयविकाराचा झटका आणि उंच प्रदेशातील आजार यांसारख्या समस्यांमुळे झाले आहेत.यात्रा मार्ग उंच प्रदेशातून जातो, जिथे ऑक्सिजनची पातळी कमी असल्यामुळे आणि सततच्या चढाईमुळे वृद्ध आणि आधीच आजारी असलेल्या यात्रेकरूंची प्रकृती बिघडल्याची प्रकरणे समोर येत आहेत.यात्रेपूर्वी सल्लागार सूचना (ॲडवाइजरी) जारी करण्यात आली होती.

चारधाम यात्रा सुरू होण्यापूर्वी सरकारने अनेक आढावा बैठका घेतल्या होत्या. सर्व विभागांना यात्रा सुरू होण्यापूर्वी तयारी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सरकारचा दावा आहे की, यात्रा मार्गावर आरोग्य सेवा, डाक्टर आणि वैद्यकीय कर्मचा-यांची पुरेशी व्यवस्था करण्यात आली आहे. प्रवाशांसाठी सल्लागार सूचना (ॲडव्हायझरी) देखील जारी करण्यात आली होती, ज्यात वृद्ध, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकाराने ग्रस्त असलेल्या लोकांना आरोग्य तपासणी करून घेण्याचा सल्ला देण्यात आला होता. आरोग्यमंत्र्यांनीही प्रवाशांना सावधगिरी बाळगण्याचे आणि शरीरात त्रास जाणवल्यास त्वरित थांबण्याचे आवाहन केले आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १५ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## अल्पसंख्याक युवकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करावे

### जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे निर्देश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अल्पसंख्याक युवकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय समितीच्या आढावा सभेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, जिल्हा कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त प्रविण खंडारे, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सचिन नखाते, योजना उपशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, वाशिम मुख्याधिकारी निलेश गायकवाड, रिसोड मुख्याधिकारी सतीश शेवदा, कारंजा मुख्याधिकारी महेंद्र वाघमोडे आदी उपस्थित होते. सभेत अल्पसंख्याक



समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार, आरोग्य सुविधा, महिला सक्षमीकरण, क्रीडा सुविधा तसेच नागरी सुविधा याबाबत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी घेतला.

शिक्षण विभागाच्या आढाव्यात पाचवी ते सातवीतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची शाळाबाह्य होण्याची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गळतीमागील कारणांचा अभ्यास करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. तसेच उर्दू माध्यम शाळांमधील गणित व विज्ञान विषय शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबतही चर्चा झाली. मराठी भाषा फाउंडेशन योजनेअंतर्गत उर्दू माध्यमाच्या दोन शाळांमध्ये मराठी विषय शिकविण्यासाठी तीन मानसेवी शिक्षक कार्यरत असून ४७४ विद्यार्थी लाभ घेत असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली. क्रीडा विभागाच्या आढाव्यात जिल्हा क्रीडा निधीतील २० टक्के निधी अल्पसंख्याक शाळांसाठी राखीव ठेवण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग वाढविण्यासाठी अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. शासकीय तंत्रनिकेतनातील अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहाच्या दुरुस्ती कामाचा आढावा घेताना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर वसतिगृह पुन्हा सुरळीत सुरू करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत निर्देश देण्यात आले.

## मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांची आढावा सभा

### प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश

■ प्रतिनिधी | कारंजा ■

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी (दि. १३) कारंजा पंचायत समिती येथे आयोजित सभेत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक धैर्यशील पाटील आणि गटविकास अधिकारी पुनम राणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रलंबित कामांची पूर्तता तसेच ग्रामपंचायत स्तरावरील कामांमध्ये गती आणण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

सभेमध्ये ग्रामीण विकास, स्वच्छ भारत मिशन, पंचायत विभाग, नरेगा, महिला व बालकल्याण, शिक्षण, आरोग्य,



ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम विभाग आदी विविध विभागांच्या योजनांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालय बांधकाम, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, ध३इ इत्ले उपक्रम, घरकुल योजना, १५ वा वित्त आयोग निधी खर्च, पाणीकर व घरकर वसुली, नरेगा कामे, अंगणवाडी सुविधा, शाळा व आरोग्य केंद्र बांधकाम, पाणीटंचाई उपाययोजना आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान यांनी संबंधित विभागांना शासनाच्या योजनांची अंमलबजावणी वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करून नागरिकांना मूलभूत सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यावर भर दिला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हयात प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत इंदिरा गांधी योजना, संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजना या योजनांतील लाभार्थ्यांना दरवर्षी हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार माहे एप्रिल २०२६ ते माहे मार्च २०२७ या कालावधीकरिता हयात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. केंपुयो-२०२६/प्र.क्र.४२/विसयो, दि. ०७ मे २०२६ नुसार यावर्षापासून हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार शासनाने विकसित केलेल्या Beneficiary Satyapan App या ॲपद्वारे सर्व लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तरी इंदिरा गांधी योजना, संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजना या योजनांतील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या सोयीच्या सेतू केंद्रावर, आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सेवा केंद्र अथवा तहसील कार्यालय, वाशिम येथील संजय गांधी योजना शाखेत उपस्थित राहून ऑनलाईन पद्धतीने हयात प्रमाणपत्र सादर करावे. जे लाभार्थी जून २०२६ पूर्वी Beneficiary Satyapan App द्वारे हयात प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांचे माहे जुलै २०२६ पासून अनुदान वितरण बंद करण्यात येईल, याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे तहसीलदार निलेश पळसकर यांनी कळविले आहे.

## प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचा लाभ घेण्याचे फेरीवाल्यांना आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) पुनर्रचित योजनेची अंमलबजावणी वाशिम शहरात करण्यात येत असून शहरातील पात्र फेरीवाल्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन नगर परिषद वाशिम तसेच शहर फेरीवाला समितीमार्फत करण्यात आले आहे.

नगर विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार पथविक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम कर्ज म्हणून १५ हजार रुपये, नियमित परतफेडीनंतर द्वितीय कर्ज २५ हजार रुपये आणि तृतीय कर्ज ५० हजार रुपये बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय लाभार्थ्यांना क्रेडिट कार्ड सुविधा, डिजिटल व्यवहार प्रोत्साहन, अन्न सुरक्षा, डिजिटल साक्षरता तसेच वित्तीय साक्षरता यांसारखे विविध लाभही देण्यात येणार आहेत.

मोबाईल ॲपद्वारे सर्वेक्षण पूर्ण झालेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री स्वनिधी कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. वाशिम शहरातील पात्र व गरजू फेरीवाल्यांनी आपल्या प्रभागातील सेतू केंद्र, कॉमन सर्व्हिस सेंटर तसेच शहर उपजीविका केंद्र, बालाजी संकुल, पाटणी चौक, युनियन बँकेच्या मागे येथे ऑनलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध असून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरता येणार आहे. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार संलग्न मोबाईल क्रमांक, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, बँक पासबुक, फेरी व्यवसायाचा फोटो, नगरपालिकेची बैठक पावती, सर्वेक्षण झाल्याची पावती आदींचा समावेश आहे. तसेच शहर फेरीवाला समितीने शिफारस केलेले फेरीवाले या योजनेसाठी पात्र राहणार आहेत.

योजनेबाबत काही अडचण अथवा अधिक माहितीसाठी नगर परिषद वाशिम कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन नगराध्यक्ष अनिल केंदळे तसेच शहर फेरीवाला समितीचे अध्यक्ष तथा मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांनी केले आहे.

## उष्मा घातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**वाशिम :** भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १२ ते १४ मे २०२६ दरम्यान जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून 'यलो अलर्ट' जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.प्रशासनाने नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत

**नागरिकांनी काय करावे ?**

- तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे.

- शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे, तसेच घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करावा.

## असंघटित महिला सेना व संस्थेकडून पॅड वाटप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शेलुबाजार रोडवरील झोपडपट्टी येथे शाळकरी मुली व मागास वस्तीतील महिला व मुलींना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. सदर उपक्रम महाराष्ट्र असंघटित महिला कामगार व कर्मचारी सेना (महाराष्ट्र राज्य) व दिव्या स्वयंमसाहायत्ता महिला गट व बहुउदशीय संस्था वाशीमच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

महाराष्ट्र असंघटित महिला कामगार व कर्मचारी सेनेच्यावतीने मुली व महिलांच्या आरोग्यासाठी लोकपयोगी काम करत असून, या संस्थेने अनेक महिलांना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप केल्याची माहिती संस्थापक अध्यक्षा प्रा. संगिता चव्हाण यांनी दिली. यावेळी उपस्थित महिला व मुलींना मार्गदर्शन करतांना प्रा. संगिता चव्हाण म्हणाल्या की, महिलांचा महत्वाचा विषय म्हणजे मासिक पाळी, मात्र आजही गरीब वस्तीतील महिला व मुली मासिक पाळीत कपडा किवा गोणपाट अशा गोष्टी वापरतात. कापडाचा वापर सोडून महिलांनी सॅनिटी पॅड चा वापर करावा. आरोग्याची काळजी घेवून स्वत:चे संरक्षण करावे.

## जीवघेण्या उन्हात मुक्या जीवांसाठी महिलांची जलसेवा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा परिसरात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर मुक्या पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने देवा तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहारा कॉलनीतील महिला मंडळींनी विविध ठिकाणी झाडांना जलपात्रे लटकवून पक्ष्यांसाठी पाण्याची सोय केली.

अलीकडील काळात झाडांची मोठ्या प्रमाणावर होणारी कत्तल आणि वाढते तापमान यामुळे माणसांसह पशुपक्ष्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. माणसाला पिण्यासाठी विविध साधने उपलब्ध असली तरी मुक्या पक्ष्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. अनेकदा पाण्याअभावी त्यांचा जीवही जातो. निसर्गाच्या समतोलासाठी पशुपक्ष्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याने त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

या अंतर्गत हनुमान मंदिर, जगदीश्वर मंदिर, गजानन महाराज मंदिर, मुंगसजी महाराज मंदिर तसेच मानोरा रोड परिसरातील झाडांवर जलपात्रे लावण्यात आली. यापूर्वीही वैकुंठ सेवा समितीच्या वतीने बायपासजवळील स्मशानभूमीत पक्ष्यांसाठी जलपात्रांची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी परमेश्वर व्यवहारे, एस. एस. चव्हाण आणि आशा व्यवहारे यांनी पक्ष्यांचे पर्यावरणातील महत्त्व विषद करत नैसर्गिक समतोल राखण्यासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

सदर जलपात्रे स्व. प्रकाश दादा डहाके यांच्या स्मृतिदिनानिमित्त आमदार सईताई डहाके यांच्या उपस्थितीत वनविभागाच्या पर्यटन केंद्रातून प्राप्त झाली आहेत. त्यामुळे वाढत्या तापमानात कारंजा परिसरातील पक्ष्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या प्रसंगी गो ग्रीन फाउंडेशनचे डॉ. पद्माकर मिसाळ, वैकुंठ सेवा समितीचे परमेश्वर व्यवहारे, यू-ट्यूब चॅनलचे एस. एस. चव्हाण, भगवान धाडवे, गजानन गणेकर, शिंदे महाराज तसेच आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र मंडळाचे सदस्य आणि गुरुदेव सेवा मंडळाच्या तालुका सेवा अधिकारी आशा व्यवहारे, कमला मालखडे, नंदा जाधव, भारती घोगरे, सुमन साखरकर, उषा डगवार, चित्रा नवघरे, राजूभाऊ घोगरे, प्रतीक साखरकर, वैष्णवी डगवार, जिजाबाई विसरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## बांधकाम कामगारांच्या योजनांसाठी कोणालाही पैसे देऊ नका

### गैरप्रकार आढळल्यास तक्रार करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, वाशिम यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व लाभ हे पूर्णपणे मोफत असून कामगारांनी कोणत्याही व्यक्ती अथवा एजंटला पैसे देऊ नयेत, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

मंडळामार्फत सामाजिक सुरक्षा विषयक योजना, शैक्षणिक योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक लाभाच्या योजना, गृहपयोगी संच वाटप योजना, पेटी वाटप योजना आदी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या बहाण्याने काही व्यक्ती अथवा एजंट हे अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून कामगारांकडून पैशांची मागणी करत असल्याच्या तक्रारी कार्यालयाला प्राप्त झाल्या आहेत. या प्रकारामुळे कार्यालयाची बदनामी होत असून शासकीय यंत्रणेची प्रतिमा मलिन होत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अशा प्रकारे पैसे मागणाऱ्या अथवा स्वीकारणाऱ्या व्यक्तींचा कार्यालयाशी कोणताही संबंध नसून अशा व्यवहारास कार्यालय जबाबदार राहणार नसल्याचे जाहीर प्रकटनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

## इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाच्या सूचना

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सध्या पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यावर परिणाम करणारी परिस्थिती निर्माण झालेली असून भविष्यातही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, तालुका प्रशासनाने पेट्रोल व डिझेलचा पुरवठा सुरळीत, पारदर्शक व अखंड ठेवण्यासाठी सर्व पेट्रोल पंप चालक व विक्रेत्यांना विविध सूचना जारी केल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

प्रशासनाच्या निर्देशानुसार कोणत्याही परिस्थितीत पेट्रोलियम पदार्थांची साठेबाजी अथवा कृत्रिम टंचाई निर्माण करू नये. तसेच दररोज उपलब्ध असलेल्या इंधन साठ्याची माहिती पेट्रोल पंपावर ठळकपणे प्रदर्शित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पेट्रोल पंप निश्चित वेळेत सुरू ठेवून ग्राहकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे.

अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करणे, कंपनीकडून वेळेत इंधन मागणी नोंदविणे तसेच उपलब्ध साठा संपण्यापूर्वी नवीन पुरवठा सुनिश्चित करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. इंधन वितरण करताना कोणताही भेदभाव न करता निष्पक्ष पद्धतीने वितरण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने, शासकीय आपत्कालीन वाहने, सार्वजनिक वाहतूक सेवा तसेच जीवनावश्यक वस्तू वाहतूक करणाऱ्या वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करावा, असे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

घबराटीत अनावश्यक इंधन खरेदी व साठवणूक होऊ नये यासाठी ग्राहकांचे समुपदेशन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार जिल्हा प्रशासन अथवा तेल कंपन्यांच्या निर्देशानुसार इंधन वितरणावर मर्यादा लागू करण्यात येऊ शकते.

## देशव्यापी औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सतर्क

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना यांच्या वतीने बुधवार दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी एक दिवसीय बंदची घोषणा करण्यात आली आहे. संघटनेच्या प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ देशभरातील ठोक व किरकोळ औषध विक्रेत्यांनी व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत व अखंडपणे उपलब्ध राहावा यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, वाशिम कार्यालयामार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती गजानन घिरके, सहाय्यक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, वाशिम यांनी दिली आहे. सहआयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी समन्वय साधण्यात येत आहे. अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होणार नाही यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे.

## एलपीजी गॅस वितरणाबाबत तहसील प्रशासनाच्या कडक सूचना

### सुरळीत पुरवठा व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी एजन्सींना निर्देश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सध्या एलपीजी गॅस पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व गॅस एजन्सी चालक व वितरकांनी सर्वसामान्य नागरिकांना नियमित, पारदर्शक व सुरळीत गॅस पुरवठा उपलब्ध करून द्यावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने विविध निर्देश जारी केले आहेत.

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कारंजा यांनी दिलेल्या सूचनांनुसार, कोणत्याही परिस्थितीत एलपीजी गॅस सिलेंडरची अनधिकृत साठवणूक अथवा कृत्रिम टंचाई निर्माण करू नये. उपलब्ध गॅस साठ्याची माहिती एजन्सीच्या दर्शनी भागात स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

गॅस एजन्सी व वितरण व्यवस्था नियमित वेळेत सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून, ग्राहकांना वेळेत सिलेंडर वितरणासाठी पुरेसे कर्मचारी व वाहने उपलब्ध ठेवण्यास सांगण्यात आले आहे. वितरण प्रक्रियेत कोणताही भेदभाव न करता घरगुती ग्राहक, रुग्णालये, वसतिगृहे, शासकीय संस्था तसेच अत्यावश्यक सेवांना प्राधान्याने गॅस पुरवठा करावा, असेही निर्देश आहेत.



ऑनलाईन बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच सिलेंडर वितरण करण्यात यावे तसेच एका दिनांकाच्या ऑनलाईन बुकिंगचे पूर्ण वितरण झाल्यानंतरच पुढील तारखेच्या बुकिंगचे वितरण करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रशासनाने नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये यासाठी अतिरिक्त सिलेंडर बुकिंग अथवा साठवणूक टाळण्याचे आवाहन केले असून, याबाबत माध्यमांद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आवश्यक असल्यास प्रशासन अथवा तेल कंपन्यांच्या निर्देशानुसार वितरणावर तात्पुरते निर्बंध लागू करण्यात येऊ शकतात.

एजन्सींनी कार्यालयात उपलब्ध गॅस साठा, वितरण वेळापत्रक, हेल्पलाईन क्रमांक व प्रशासनाच्या सूचना स्पष्टपणे प्रदर्शित कराव्यात. अधिकृत दरापेक्षा जास्त दराने सिलेंडर विक्री करू नये तसेच घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर अथवा अनधिकृत पुरवठा टाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ग्राहकांच्या रांगा व गर्दी व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था करावी. गावनिहाय आठवड्यातून एक किंवा दोन वेळा निश्चित दिवस व ठिकाण निश्चित करून वितरण करावे. बुकिंग दिनांकानुसारच वाटप करण्यात यावे व त्याबाबत संबंधित गावातील ग्राहकांना पूर्वकल्पना द्यावी, असेही नमूद करण्यात आले आहे.

सध्याची उष्णतेची लाट लक्षात घेता कोणत्याही परिस्थितीत उघड्यावर किंवा मोकळ्या मैदानात गॅस सिलेंडर वितरण करू नये. अशा प्रकारे वितरण केल्यास अनुचित घटना घडल्यास संबंधित वितरकास जबाबदार धरण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६७ ■ शुक्रवार, १५ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची गुंतवणूक; ८,००० जणांना मिळणार रोजगार

### -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग आणि एएम इंटेलिजन्स लॅब यांच्यात सामंजस्य करार



**मुंबई जनमाध्यम :** राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार आज झाला.

मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात (श्ईं) 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल. प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.हा प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असून यामध्ये २,५०,००० उच्च क्षमतेचे 'एआय चिपसेट्स' वापरले जातील. तसेच या प्रकल्पाचा दोन टप्प्यांत विकास करण्यात येईल. २०० मेगावॅट क्षमतेचा पहिला टप्पा सन २०२८ पर्यंत तर ३०० मेगावॅट क्षमतेचा दुसरा टप्पा २०३० पर्यंत पूर्ण करण्यात येणार उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ तसेच हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क धोरण २०२४ अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता (ㅈ) आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात राष्ट्रीय व जागतिक स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा उद्देश या प्रकल्पामागे आहे.

# डेंग्यूच्या डासांनी प्रशासनालाच चावले; आरोग्य यंत्रणेचा बोजवारा

## देवळीत पाच रुग्ण पॉझिटिव्ह; सेवाग्राममध्ये किट नाही, तपासणी बंद : नागपूरकडे नमुने पाठविण्याची नामुष्की

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात 'आरोग्यसंपन्न गाव'च्या घोषणा आणि बॅनरबाजी सुरू असताना प्रत्यक्षात मात्र आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. ऐन उन्हाळ्यातच डेंग्यूने देवळी तालुक्यात शिरकाव केला असून दापोरी गावात पाच रुग्ण पॉझिटिव्ह आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गंभीर बाब म्हणजे डेंग्यू तपासणीसाठी आवश्यक किटच उपलब्ध नसल्याने सेवाग्राम येथील प्रयोगशाळा ठप्प पडली आहे. परिणामी संशयितांचे नमुने थेट नागपूरच्या एम्समध्ये पाठविण्याची वेळ प्रशासनावर आली असून जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत.

जिल्हा हिवताप विभागाने जानेवारी ते एप्रिल २०२६ या कालावधीत डेंग्यूसदृश लक्षणे असलेल्या ७२४ नागरिकांचे रक्त नमुने घेतले. त्यापैकी पाच जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले असून सर्व रुग्ण देवळी तालुक्यातील दापोरी येथील आहेत. अजून पावसाळा सुरूही झाला नसताना डेंग्यूचे रुग्ण सापडणे हे प्रशासनासाठी धोक्याची घंटा मानले जात आहे. परंतु आरोग्य विभागातील अधिकारी मात्र निव्वळ कागदी मोहीम राबवून स्वतःची पाठ थोपटण्यात व्यस्त असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.

उन्हाळ्यामुळे घराघरांत कुलर आणि एसीचा वापर वाढला आहे. मात्र याच कुलरमधील साचलेल्या पाण्यात एडीस डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत आहे. गावोगावी गटारे तुंबलेली, नाल्यांमध्ये घाण साचलेली आणि रिकाम्या भांड्यांत पाणी साठलेले असतानाही स्वच्छतेबाबत स्थानिक प्रशासनाची उदासीनता कायम असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. फवारणीच्या नावाखाली केवळ दिखावा सुरू आहे, प्रत्यक्षात डासांचे




साम्राज्य वाढत आहे, अशी संतप्त भावना दापोरी परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

याहून संतापजनक बाब म्हणजे सेवाग्राम येथील प्रयोगशाळेत डेंग्यू तपासणीसाठी आवश्यक किटच उपलब्ध नसल्याने अनेक महिन्यांपासून चाचण्या बंद आहेत. शेकडो रक्त नमुने प्रयोगशाळेत पडून असल्याची माहिती समोर आली आहे. निधीअभावी आरोग्य सेवा ठप्प पडत असताना शासन आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी मात्र ढिम्म असल्याने जनतेत तीव्र संताप आहे. जिल्ह्यात डेंग्यूचा धोका वाढत असताना आरोग्य विभागाच्या निष्क्रियतेमुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

सेवाग्रामची यंत्रणा निकामी ठरल्याने देवळीतील संशयितांचे नमुने नागपूरच्या एम्समध्ये पाठविण्यात आले. तेथून आलेल्या अहवालात पाच जण डेंग्यू पॉझिटिव्ह असल्याचे स्पष्ट झाले. वेळेत तपासणी झाली नसती तर साथीचा उद्रेक आणखी मोठा झाला असता, अशी चर्चा आरोग्य वर्तुळात सुरू आहे.

दरम्यान, डेंग्यूसोबतच मलेरियानेही जिल्ह्यात डोके वर काढले आहे. जानेवारी ते एप्रिल या काळात तब्बल १ लाख २२ हजार ३७ नागरिकांची मलेरियासाठी तपासणी करण्यात आली. त्यापैकी बोरगाव (मेघे) येथील एक रुग्ण पॉझिटिव्ह आढळला आहे. त्यामुळे किटकजन्य आजारांनी जिल्ह्याला विळखा घालण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट झाले आहे.

आरोग्य विभागाने नागरिकांना कुलर आठवड्यातून एकदा स्वच्छ करण्याचे, परिसरात पाणी साचू न देण्याचे आणि ताप, अंगदुखी, उलट्या अशी लक्षणे दिसताच तातडीने डॉक्टरांकडे जाण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ आवाहनांनी डेंग्यू थांबणार नसून प्रशासनाने युद्धपातळीवर स्वच्छता, फवारणी आणि तपासणी मोहीम राबविण्याची गरज आता तीव्रतेने व्यक्त होत आहे.

## धगधगत्या कंटेनरने महामार्ग दणाणला; दोन तासांच्या झुंजीनंतर आग आटोक्यात

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरालगतच्या राष्ट्रीय महामार्गावर सगुना कंपनीजवळ गुरुवारी दुपारी एका भरधाव कंटेनरला अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कंटेनरमधून अचानक धुराचे लोट बाहेर पडू लागल्याचे लक्षात येताच चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले. काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केल्याने महामार्गावरील वाहतुकीतही मोठी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.



घटनेची माहिती मिळताच कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच हिंगणघाट नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करीत तब्बल दोन तास पाण्याचा मारा करून अखेर आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र तोपर्यंत कंटेनरमधील संपूर्ण साहित्य जळून खाक झाले होते.

प्राथमिक माहितीनुसार संबंधित कंटेनर हा बेंगळुरूहून पुढील प्रवासासाठी निघाला होता. कंटेनरमध्ये विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणात भरलेले होते. आगीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी काही काळ महामार्ग परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## होमगार्डचे द्वितीय त्रैमासिक संमेलन

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली होमगार्डचे द्वितीय त्रैमासिक संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रशासकीय अधिकारी संजय सुरोशे, केंद्र नायक प्रमोद वानखेडे, पलटन नायक प्रदिप बलवीर, अनंत गजबे, समादेशक अधिकारी हेमलता कांबळे, कैलास रोकडे, सागरकुमार थेरे यांची उपस्थिती होती. सदाशिव वाघमारे यांनी साप्ताहिक कवायतीमध्ये होमगार्डची संख्या फारच कमी असल्याचे निर्दशनास आले असल्यामुळे होमगार्ड साप्ताहिक कवायतीमध्ये का? येऊ शकत नाही याचा परामर्श घेतला. तसेच होमगार्डच्या अडचणीचे निराकरण



करुन जवळच्या पोलिस स्टेशनला साप्ताहिक कवायतीचे आयोजन करण्याबाबत संबंधितांना आदेश दिले. यावेळी आपदा मित्रचे प्रशिक्षण घेऊन आलेले होमगार्ड बुध्द जयंती बंदोबस्तासाठी आष्टी येथे कर्तव्यावर असतांना १ मे रोजी दुपारच्या दरम्यान आष्टी बसस्थानक परिसरात मध्यप्रदेशातून वरुड मार्गे आर्वीकडे बारदाना भरलेल्या ट्रक जात असतांना अचानक धावत्या ट्रकला आग लागली. त्या परिसरात कर्तव्यावर असलेले होमगार्ड अंकित हराळे, देवेंद्र मोहोड, प्रविण ढोक यांनी ट्रक थांबवून आग विझविण्याचे मोठे कार्य केले व होणाऱ्या मोठ्या हाणीपासुन वाचविले. त्याबद्दल सदाशिव वाघमारे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## जेवणाचा घास ठरला अखेरचा; आर्वीच्या पोलिस कर्मचाऱ्याचा प्रवासात दुर्दैवी मृत्यू

### -परळी-अंबाजोगाई मार्गावरील हृदयद्रावक घटना; पोलिस दलात हळहळ

**सेलू जनमाध्यम :** जनतेच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कर्तव्य बजावणाऱ्या एका पोलिस कर्मचाऱ्याचा प्रवासादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना परळी-अंबाजोगाई मार्गावर घडली. जेवणासाठी धाब्यावर थांबलेल्या पोलिस कर्मचाऱ्याच्या घशात अचानक अन्नाचा घास अडकल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पोलिस दलासह परिसरात शोककळा पसरली आहे.

देवेंद्र रामराजजी गुजर (वय ५५, रा. आर्वी, जि. वर्धा) असे मृत पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते जिल्ह्याबाहेर शासकीय कर्तव्यासाठी गेले होते. सोमवारी सायंकाळच्या सुमारास प्रवासादरम्यान परळी-अंबाजोगाई मार्गावरील एका धाब्यावर ते जेवणासाठी थांबले होते. जेवण सुरू असतानाच अचानक त्यांच्या घशात अन्नाचा घास अडकल्याने त्यांना त्रास होऊ लागला.



घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. काहींनी त्यांना पाणी दिले, तर काहींनी तत्काळ वैद्यकीय मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र काही क्षणांतच त्यांची प्रकृती गंभीर बनली आणि दुर्दैवाने त्यांची प्राणज्योत मालवली.

घटनेची माहिती मिळताच परळी ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह पुढील तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला. या घटनेची नोंद पोलिसांत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

देवेंद्र गुजर हे कर्तव्यनिष्ठ, शांत आणि मनमिळावू स्वभावाचे अधिकारी म्हणून परिचित होते. सहकारी कर्मचारी तसेच मित्रपरिवारात त्यांची वेगळी ओळख होती. त्यांच्या अचानक निधनाने पोलिस दलात मोठी पोकळी निर्माण झाली असून आर्वी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. कर्तव्याच्या प्रवासात काळाने अचानक घातलेला हा घाला अनेकांना सुन्न करून गेला. एका हसऱ्या कुटुंबाचा आधार हरपल्याने सर्वत्र शोक व्यक्त होत आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी टीसी वर फहमीदा बी असे नाव होते. माझ्या वोटिंग कार्ड वरील फैमिदा अकील शेख हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- फुलफैल कुरेशी मोहल्ला, वर्धा, ४४२००१


## बुलेटवरून विधानभवनात फडणवीस इंधन बचतीचा 'पॉवरफुल' संदेश

**मुंबई जनमाध्यम :** वाढत्या इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अनोखा आदर्श घालून दिला. नेहमीचा आलिशान ताफा आणि कडक सुरक्षा व्यवस्था बाजूला ठेवत फडणवीस थेट बुलेट मोटारसायकलवरून विधानभवनात दाखल झाले.



त्यांच्या मागील सीटवर भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार बसले होते. मुख्यमंत्र्यांच्या या 'बुलेट एन्ट्री'ने विधानभवन परिसरात एकच चर्चा रंगली.

पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी इंधन बचतीसाठी सरकारी ताफे कमी करण्याचे दिलेले आवाहन प्रत्यक्षात उतरवताना फडणवीसांनी हा संदेश दिला. राज्यातील मंत्री, अधिकारी आणि प्रशासनाने वाहनांचा वापर कमी करावा, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगला प्राधान्य द्यावे तसेच इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री बुलेटवरून पोहोचत असताना दुसरीकडे काही मंत्र्यांच्या विमान प्रवासावरून विरोधकांनी टोलेबाजी केली. तरीही फडणवीसांच्या या कृतीने 'संदेश मोठा की ताफा हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला.

## रेल्वे स्टेशन परिसरातून मोटारसायकल लंपास

### रामनगर पोलिसांची चोरट्यावर कारवाई

#### गुन्हे शोध पथकाची धडाकेबाज कामगिरी; चोरीची पल्सर जप्त

**वर्धा जनमाध्यम :** रेल्वे स्टेशन परिसरातून मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला रामनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अटक केली असून त्याच्याकडून चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. या कारवाईमुळे वाहनचोरीच्या वाढत्या घटनांवर पोलिसांनी प्रभावी अंकुश आणल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

हर्षद लिलाधरराव बांगरे (वय ३४, रा. तराळे ले-आऊट, वर्धा) यांच्या मालकीची बजाज पल्सर-१५० ही मोटारसायकल क्रमांक एमएच-३२ एडी-८९८२ ही १ फेब्रुवारी २०२६ रोजी चोरीला गेली होती. फिर्यादीचे जावई राजेंद्र उदापुरे यांनी सकाळी रेल्वे स्टेशनसमोरील पार्किंगमध्ये मोटारसायकल उभी करून नागपूर येथे कामानिमित्त गेले होते. सायंकाळी परतल्यानंतर वाहन जागेवर दिसून न आल्याने परिसरात शोध घेण्यात आला. मात्र मोटारसायकल मिळून न आल्याने अखेर २७ फेब्रुवारी रोजी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता.



तपासादरम्यान गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी राहुल दशरथ जाधव (वय १९, रा. वडार झोपडपट्टी, आर्वी नाका, वर्धा) याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने रेल्वे स्टेशन परिसरातून पल्सर मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.

यानंतर पोलिसांनी पंचासमक्ष आरोपीकडून अंदाजे २५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त केली. या कारवाईमुळे रामनगर पोलिसांनी वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात यश मिळविले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मक्केश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखोंडे यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकातील पोलिस कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली.


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वर्धा
राजेश नरहरशेट्टीवार यांची ईमारत, दुसरा माळा, हिरो शोरुमच्या मागे,
मोहन नगर, नागपूर रोड, वर्धा

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 139/26 कलम-१९

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **शिव पार्वती चॅरिटेबल ट्रस्ट, पोरगव्हाण, ता.आष्टी जि.वर्धा**

बाबत अर्जदार - **श्री.चंद्रशेखर किसन अडसळ**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त वर्धा विभाग वर्धा हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) **जंगम मिळकत -** रोख रु.११०००/- जमा आहे

(ब) **स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **३०.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
वर्धा विभाग, वर्धा


# जमिनी घेतल्या, रोजगार बुडवला; 'लॅन्को'ने केला शेतकऱ्यांचा घात

## प्रकल्प बंद... मांडवा परिसरातील भूमिपुत्रांचे संसार उद्ध्वस्त; खा.काळे यांची जमिनी परत देण्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** विकासाच्या चमकदार स्वप्नांचा बाजार मांडत मांडवा आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी गिळंकृत करणारा 'लॅन्को' विद्युत प्रकल्प आज ओसाड सांगाड्यात बदलला आहे. उद्योगाच्या नावाखाली हजारो एकर जमीन घेतली, पण प्रकल्पच अर्ध्यावर कोसळल्याने शेतकरी मात्र अक्षरशः रस्त्यावर आले आहेत. आता प्रकल्प नाही तर जमिनी तरी परत द्या, अशी हतबल हाक प्रकल्पग्रस्त शेतकरी देत आहेत.

एकेकाळी वर्धा जिल्ह्याच्या औद्योगिक क्रांतीचे प्रतीक म्हणून मांडवा येथील लॅन्को प्रकल्पाकडे पाहिले जात होते. रोजगार, व्यापार आणि विकासाची मोठमोठी स्वप्ने दाखवण्यात आली. आपल्या मुलांना नोकऱ्या मिळतील, गावाचा चेहरामोहरा बदलेल, या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी आपल्या पिढीजात जमिनी कंपनीच्या हवाली केल्या. काहींच्या घरातील शेतीच पूर्णपणे संपुष्टात आली.

सुरुवातीला प्रकल्पाचे काम धडाक्यात सुरू झाले. अवजड यंत्रसामग्री, बांधकामांची लगबग आणि रोजगाराच्या आशेने परिसर गजबजला होता. मात्र अचानक प्रकल्पाची गती मंदावली. दिवसेंदिवस कामे थांबू लागली आणि अखेर संपूर्ण प्रकल्प अर्धवट अवस्थेतच बंद पडला. बांधकामावरील मजूर, सुरक्षा रक्षक, तांत्रिक कर्मचारी ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्याच नोकऱ्यांवर गदा आली. विकासाच्या नावाने दाखवलेले स्वप्न एका क्षणात उद्ध्वस्त झाले.



आज परिस्थिती इतकी भीषण झाली आहे की, ज्यांनी जमीन दिली त्यांच्याच घरात उपासमारीची वेळ आली आहे. शेती गेली, रोजगार गेला आणि उदरनिर्वाहाचे साधनही हिरावले गेले. अनेक शेतकरी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत आमच्या जमिनी आम्हाला परत द्या, अशी आर्त विनंती करत आहेत. कंपनी नाही, प्रकल्प नाही, मग आमच्या जमिनी का अडवून ठेवल्या आहेत असा प्रश्न प्रकल्पग्रस्त विचारत आहेत.

या वेदनादायी वास्तवाची दखल घेत खासदार अमर काळे यांनी प्रशासनाला थेट पत्र पाठवत प्रकल्पाची सद्यस्थिती स्पष्ट करण्याची मागणी केली. प्रशासनाकडून प्रकल्प पूर्णपणे बंद पडल्याचे स्पष्ट होताच त्यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेत, ज्या जमिनी प्रकल्पासाठी घेण्यात आल्या त्या पुन्हा शेतकऱ्यांना परत द्याव्यात, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या शेती व्यवसायाकडे पुन्हा वळू द्या. त्यांच्या दोन वेळच्या भाकरीची व्यवस्था तरी होऊ द्या, अशी भावनिक भूमिका त्यांनी मांडली.दरम्यान, मांडवा आणि परिसरातील प्रकल्पग्रस्तांचे डोळे आता प्रशासनाच्या निर्णयाकडे लागले आहेत. विकासाच्या नावाखाली उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळणार का, की पुन्हा सरकारी फाईलींच्या ढिगाऱ्यात त्यांचा आवाज गाडला जाणार, असा संतप्त सवाल आता परिसरातून उपस्थित होत आहे.




# विदर्भातील ५५० कि.मी.च्या चार महामार्गांना पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मंजुरी

## द्रुतगती महामार्ग प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करा-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राची पूर्व व पश्चिम सीमा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडण्यासाठी विदर्भातील ५४७ कि.मी.च्या चार प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. हे प्रकल्प जलदगतीने व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, उद्योग मंत्री ड?. उदय सामंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. अपर मुख्य सचिव म्हैसकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली.

महाराष्ट्राचे पूर्व व पश्चिम क्षेत्र जोडणारे आणि विदर्भातील विकासात महत्त्वाचे पाउल ठरणा-या या प्रकल्पांची पुढील कार्यवाही जलदगतीने करून प्रकल्प वेळेत होईल यावर भर द्यावा. नवेगाव मोर ते सुरजागड हा मार्ग खनिज वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हा मार्ग समृद्धी महामार्गाला जोडण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. तसेच पश्चिम महाराष्ट्र ते कोकणाला जोडणा-या टनेल रस्त्यासंदर्भात अभ्यास करून सादरीकरण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

नागपूर - गोंदिया प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग, भंडारा गडचिरोली द्रुतगती मार्ग, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग आणि नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड ग्रीन फिल्ड रस्ता या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना यावेळी मान्यता देण्यात आली. या चारही प्रकल्पांची स्थापत्य किंमत ३२४७८ कोटी व एकूण बांधकाम किंमत ५१९०६.३५ कोटी रुपये एवढी आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या महामार्गांचे काम केले जाणार आहे. हे सर्व प्रकल्प सप्टेंबर २०२८ ते डिसेंबर २०२८ या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे म्हैसकर यांनी यावेळी सांगितले.

**प्रकल्पांची वैशिष्ट्ये**

- नागपूर -गोंदिया द्रुतगती मार्ग
- एकूण लांबी - 162.377 कि.मी.
- प्रारंभ व शेवटचा बिंदू -गवसी मानपूर, नागपूर ते सावरी, गोंदिया
- लेनची संख्या -3 अ 3
- इंटर चेंज - 9
- आवश्यक भूसंपादन -1634.27 हे.
- हा महामार्ग नागपूर, भंडारा व गोंदिया या तीन जिल्ह्यांना जोडला जाणार

**भंडारा-गडचिरोली द्रुतगती मार्ग**

- एकूण लांबी - 94.241 कि.मी.
- प्रारंभ व शेवटचा बिंदू -बोरगाव, जि. भंडारा ते ऋणमोचन, जि. चंद्रपूर
- लेनची संख्या-3अ3
- इंटर चेंज - 6
- आवश्यक भूसंपादन -1185.73 हे.
- हा महामार्ग भंडारा, गोंदिया, गडचिरोली या तीन जिल्ह्यांना जोडला जाणार

**नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग**

- एकूण लांबी -204.799 कि.मी.
- प्रारंभ व शेवटचा बिंदू - सेलडोह, जि. वर्धा ते नवेगाव मोरे (घाटकुळ),जि. चंद्रपूर
- लेनची संख्या -2अ2
- इंटर चेंज - 7
- आवश्यक भूसंपादन -2159.087 हे.
- हा महामार्ग नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील 9 तालुक्यांना जोडला जाणार आहे.
- नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड ग्रीन फिल्ड रस्ता
- एकूण लांबी -85.765 कि.मी
- प्रारंभ व शेवटचा बिंदू -नवेगाव मोरे (घाटकुळ), जि. चंद्रपूर ते मंगेर, जि. गडचिरोली
- लेनची संख्या - 2अ2
- आवश्यक भूसंपादन- 289.02 हे.
- हा महामार्ग चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील 4 तालुक्यांना जोडला जाणार आहे.



## आफ्रिका-भारत विशेष वाहन हेतू कंपनी स्थापन करण्याकरिता करार

**मुंबई/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र विकसित करण्याकरिता सिडको आणि आफ्रिका इंडिया इकानामिक फाऊंडेशन (एआयईएफ) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत आफ्रिका भारत करारावर स्वाक्ष-या करून आदान-प्रदान करण्यात आले. मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या बैठकीस नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, आफ्रिका इंडिया ईकानामिक फाउंडेशनचे अध्यक्ष डा. जी. रथिनवेलू, संयुक्त राष्ट्रसंघ राजदूत न्यूयार्कचे राजदूत टी. एस. तिरु मूर्ती, यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सिडकोतर्फे आफ्रिका भारत व्यापार केंद्र (एआयबीसी) नवी मुंबई येथे प्रस्तावित असून भारत व आफ्रिकन राष्ट्रांमधील आर्थिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे एकात्मिक केंद्र म्हणून हा प्रकल्प संकल्पित आहे. द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक आणि संस्थात्मक भागीदारी यांना चालना देण्याच्या उद्देशाने आफ्रिका इंडिया इकानामिक फाऊंडेशन (एआयईएफ) यांच्या सहयोगाने हा प्रकल्प आकारास येणार आहे. ग्लोबल साउथ देशांमधील सहाकार्याकरिता भारताचे नेतृत्व मान्य होत असताना, भारत-आफ्रिकेतील सध्याच्या ९६ अब्ज अमेरिकन डालर भागीदारीच्या क्षमता अधिक वाढीस लागाव्या याकरिता हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आफ्रिका भारत व्यापार केंद्र हा परिवर्तन घडवून आणणारा प्रकल्प असून याद्वारे भारत-आफ्रिका संबंधांचे प्रमुख जागतिक केंद्र म्हणून महाराष्ट्र उदयास येणार आहे. व्यापार, गुंतवणूक आणि संस्थात्मक सहयोग यांकरिता समर्पित परिसंस्था निर्माण करण्यासह या प्रकल्पाद्वारे आफ्रिकन देशांबरोबरचे आर्थिक संबंध बळकट होउन विकास, रोजगार आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीकरिता नवीन संधी खुल्या होणार आहेत. जागतिक पटलावर महाराष्ट्राला मानाचे स्थान प्राप्त होण्यासह ग्लोबल साउथमधील भारताच्या विस्तारणा-या भूमिकेकरिता हा प्रकल्प योगदान देणार आहे. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, खारघर येथील प्रस्तावित आफ्रिका भारत आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र हे जागतिक व्यापार संबंधांना सहाय्यभूत जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारण्याकरिता महत्त्वाचे पाउल आहे. या प्रकल्पातील एकात्मिक सुविधा आणि मुंबई महानगर प्रदेशातील मोक्याचे स्थान यामुळे हितसंबंधी यादरम्यान अखंड आदान-प्रदान प्रस्थापित होउन व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक उपक्रमांकरिता हा प्रकल्प प्रेरक ठरेल.

## पाटबंधारेच्या सहा प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ काढण्यात येणार

### शेतक-यांना मोफत गाळ; सीसीटिव्ही, जीपीएस- जीओ फेन्सिंगद्वारे नियंत्रण

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील धरणांच्या जलाशयांतील वाढता गाळ, कमी होत चाललेली पाणीसाठा क्षमता आणि अनियंत्रित वाळू उपशाच्या पार्श्वभूमीवर सहा मोठ्या प्रकल्पांच्या जलाशयातून प्रायोगिक तत्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यास व त्याबाबतच्या सुधारित धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणामुळे प्रकल्पांतील पाणीसाठा वाढणार असून, शेतक-यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. तसेच धरणांच्या जतन संवर्धनाच्या दृष्टीने हे पाउल महत्वाचे ठरणार आहे. प्रायोगिक तत्वावर गाळ काढण्यात येणा-या प्रकल्पांमध्ये उजनी, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी आणि हतनूर धरण या प्रकल्पांचा समावेश आहे

नव्या धोरणानुसार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांना ही कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या प्रक्रियेतून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व दुरुस्ती कामांसाठी वापरला जाणार आहे.

या निर्णयातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे धरणांमधून काढण्यात येणारा गाळ शेतक-यांना त्यांच्या शेतात टाकण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतक-यांनी फक्त वाहतूक खर्च करायचा असून कोणतेही स्वामित्व शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे.

गाळाच्या परिमाणानुसार निविदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ५० दशलक्ष घनमीटरपर्यंत गाळ असल्यास ५ वर्षे, ५० ते १०० दशलक्ष घनमीटरसाठी ७ वर्षे आणि १०० दशलक्ष घनमीटरपेक्षा अधिक गाळ असल्यास १० वर्षांचा कालावधी असेल.

नव्या धोरणात वाळू चोरी आणि अनियमितता रोखण्यासाठी कडक तांत्रिक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गाळमिश्रित वाळूपासून वेगळी करण्यात आलेली वाळू साठवणूक क्षेत्र जीओ फेन्सिंग अंतर्गत राहणार असून तेथे २४न७ सीसीटीव्ही देखरेख बंधनकारक असेल. वाळू वाहतूक करणा-या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक राहील. वाहनांचे ई-पास, बारकोड प्रणाली आणि ऑनलाईन नोंदी ठेवण्याची सक्ती करण्यात आली आहे. जलाशयातून केवळ वाळू उपसा करता येणार नाही. गाळ आणि वाळू दोन्ही काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच नैसर्गिक जमिनीच्या पातळीखाली दोन फुटांपेक्षा अधिक उत्खनन करण्यास मनाई करण्यात आली आहे. पर्यावरणीय बाबींनाही या धोरणात महत्त्व देण्यात आले आहे. पर्यावरण विभागाची परवानगी, राज्य तज्ञ मूल्यमापन समिती आणि राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची मान्यता, तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या सस्टेनेबल सँड मायनिंग मॅनेजमेंट गाईडलाईन्स २०१६ आणि एन्फोर्समेंट अँड मानेटरिंग फार सेन्ड मायनिंग २०२० मधील निकषांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. जलाशयांच्या पृष्ठभागावर भविष्यात सौरउर्जा प्रकल्प, पर्यटन, जलक्रीडा किंवा जलविद्युत प्रकल्प उभारण्यास अडथळा निर्माण होणार नाही, अशी अटही करारामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील धरणांची पाणीसाठवण क्षमता वाढणे, सिंचन कार्यक्षमता सुधारणे, शेतजमिनींची सुपीकता वाढणे आणि वाळू उत्खनन प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे.


## दुसरा मुंबई क्लायमेट वीक फेब्रुवारी 2027 मध्ये होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** हवामान बदलाच्या प्रश्नांवर जागतिक स्तरावरील चर्चा आणि प्रत्यक्ष कृती यांचा संगम घडवून आणणा-या मुंबई क्लायमेट वीकच्या पहिल्या पर्वाच्या परिणाम आणि प्रभाव अहवालाचे (आउटकम अँड इम्पॅक्ट रिपोर्ट) प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीनंतर करण्यात आले. मुंबई क्लायमेट वीकच्या दुस-या पर्वाचे आयोजन २२ ते २६ फेब्रुवारी २०२७ दरम्यान मुंबईत करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली. प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जात असून, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे यजमान संस्थांमध्ये सहभागी आहेत. अहवाल प्रकाशनाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक शिशिर जोशी आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य सरकार आणि पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या पूर्ण सहकार्याची ग्वाही दिली. नागरिकाभिमुख आणि प्रगतीशील हवामान उपाययोजना उभारण्यावर आमचा भर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई क्लायमेट वीक २०२६चा मुख्य उद्देश हवामान बदलासंदर्भातील चर्चा केवळ परिषदांपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृती आणि अंमलबजावणीवर भर देणे हा होता. तीन दिवसांच्या या उपक्रमात शहरी लवचिकता, अन्न व्यवस्था आणि उर्जा संक्रमण या तीन प्रमुख विषयांवर केंद्रित चर्चा झाली. सरकार, वित्तीय संस्था, उद्योग समूह, संशोधक, नवोन्मेषक, नागरी संस्था, शैक्षणिक संस्था आणि स्थानिक समुदाय अशा विविध स्तरांतील घटक एकाच व्यासपीठावर आले.

# आदिवासी व डोंगराळ जिल्ह्यांत १७ नवीन व्यावसायिक महाविद्यालयांना मान्यता -मुख्यमंत्री

- मुख्यमत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक
- आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण पद्धतीला चालना
- राज्यात नवीन कौशल्य केंद्रांना मान्यता
- २०३०-३१ पर्यंत नवीन फार्मसी अभ्यासक्रमांना स्थगिती

**मुंबई/प्रतिनिधी :** कौशल्याधारित शिक्षणाला गती देण्यासाठी नवीन कौशल्य केंद्रांना मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पर्यंत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करण्यास परवानगी दिली जाणार नाही परंतु ७ आदिवासी, डोंगराळ व मागास जिल्ह्यात नवीन अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बी. व्होक अभ्यासक्रमांची १७ महाविद्यालये सुरु करण्यास प्राधान्याने मान्यता दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग (माहेड) ची बैठक मंत्रालय येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तंत्रज्ञानातील बदल, औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या गरजा आणि रोजगाराच्या नव्या संधी लक्षात घेता शिक्षण पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणात काळानुरूप बदल घडवून आणत विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण पद्धती अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे.



कौशल्याधारित शिक्षण, प्रशिक्षण कार्यक्रम व संशोधन उपक्रमांमध्ये उद्योगसहभाग वाढवून गुणवत्तावृद्धीवर विशेष भर दिला जाणार आहे. बदलत्या उद्योग गरजांनुसार नवीन अभ्यासक्रम विकसित करून राज्यातील युवकांना अधिकाधिक रोजगारक्षम बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बहुविद्याशाखीय शिक्षणाला चालना देण्यासाठी राज्यातील पारंपरिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य ही स्वतंत्र विद्याशाखा सुरू करावी. बहुविद्याशाखीय शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना केवळ एका विषयापुरते मर्यादित न राहता विविध क्षेत्रांतील ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करता येणार आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा बृहत् आराखडा मंजूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा २०२५-२०३१ कालावधीसाठीचा बृहत् आराखडा बैठकीत मंजूर करण्यात आला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठाच्या बृहत आराखड्यानुसार गडचिरोली, नंदुरबार, हिंगोली, वाशिम, धाराशिव, सिंधुदुर्ग व परभणी या जिल्ह्यात अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्यास प्राधान्याने परवानगी दिली जाणार आहे. गडचिरोली, हिंगोली, वाशिम, धाराशिव, सिंधुदुर्ग व परभणी या जिल्ह्यात बी. व्होक अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरु करण्यास प्राधान्याने परवानगी दिली जाणार आहे. धाराशिव व परभणी या जिल्ह्यात वास्तुशास्त्र अभ्यासक्रमांची तर नंदुरबार व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात एचएमसीटी अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरु करण्यास प्राधान्याने परवानगी दिली जाणार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने प्रवेश क्षमतेवर मर्यादा घालणे, अभ्यासक्रम उद्योगानुरूप अद्ययावत करणे, तसेच प्रयोगशाळा व संशोधनासाठी उद्योगांसोबत भागीदारी वाढवण्यावर भर द्यावा. शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्यासाठी औषधनिर्माण कंपन्यांसोबत भागीदारी वाढवून विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, प्रात्यक्षिके आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून ते शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्था उघडू नयेत तसेच विद्यमान संस्थांमधील प्रवेशक्षमता वाढविण्यात येउ नये तसे केंद्र शासनास व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना कळविण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## स्पर्धा परीक्षेसाठी राखीव प्रवर्गासाठीच्या सवलती घेतल्यास खुल्या जागेवरील दावा अमान्य

**मुंबई/प्रतिनिधी :** स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेस बसण्याची संधी या आधारे सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणा-या उमेदवारांबाबत स्पष्टता निर्माण होणार असून आरक्षणाच्या अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता आणि सुसंगती येणार आहे. राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) या पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत घेतलेली नाही, अशा उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातूनही करण्यात येणार आहे. तथापि, ज्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) संधीमध्ये शासनाने दिलेली सवलत घेतलेली असेल, अशा उमेदवारांची गणना संबंधित राखीव प्रवर्गातच करण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नाही, असेही या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे.

## आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी लागू

**मुंबई/प्रतिनिधी :** विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यात विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, उसतोड व विद्यानिकेतन अशा एकूण ९७७ आश्रमशाळा स्वंयसेवी संस्थामार्फत अनुदान तत्त्वावर चालविल्या जातात. या आश्रमशाळांमधील उच्च माध्यमिक शिक्षकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नसल्याने १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आश्रमशाळांतील ७८८ उच्च माध्यमिक शिक्षकांना ही वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी श्रेणी लागू होणार आहे. हा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही, तसेच यात कोणतीही थकबाकी दिली जाणार नाही, या अटीसह या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

## नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानला दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानला विविध प्रकारच्या वाड्मयीन उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी यंदाच्या आर्थिक वर्षापासून दहा लाख रुपये निधी देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मराठी साहित्याचा प्रसार आणि संवर्धनासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजी नगर, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या सात संस्थांना दरवर्षी दहा लाख रु पयांचे अनुदान देण्यात येते. या संस्था नियतकालिकांचे प्रकाशन, विभागीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन, मराठी ग्रंथ निर्मितीसाठी विविध पारितोषके देणे, संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन आदी विविध वाड्मयीन उपक्रमांचे आयोजन करतात. याचप्रमाणे कुसुमाग्रज प्रतिष्ठानकडूनही कार्य केले जाते त्यामुळे कुसुमाग्रज प्रतिष्ठानलाही दरवर्षी दहा लाख रुपये निधी देण्यास मान्यता देण्यात आली.

## नाशिक परिक्रमा मार्ग प्रकल्पासाठी जमीन खरेदीवर मुद्रांक शुल्कात सवलत

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पासाठी आवश्यक ठरेल, अशा खासगी जमिनीच्या खरेदीवरील मुद्रांक शुल्क सवलत देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) मधील आडगाव-दिंडोरी रोड-डकांबळे शिवार-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८-पेठ गवळवाडी-गंगापूर -रोड-गोवर्धन-त्र्यंबक महामार्ग-बेलगाव ढगा-नाशिक मुंबई महामार्ग-विल्होली-सिन्नर फाटा अशा ६६.१५ किलोमीटरच्या आखणीस मान्यता देण्यात आली आहे. परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनासाठी ३ हजार ६५९ कोटी ४७ लाख रु पयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. हा खर्च नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाद्वारे उपलब्ध करु न देण्यात येणार आहे. परिक्रमा मार्गाचे भूसंपादन थेट खरेदी पध्दतीने करण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी अंदाजे ७५ कोटी रु पयांचे मुद्रांक आणि नोंदणी शुल्क भरावे लागणार आहे. भूसंपादन प्रक्रिया आणि बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी आरेखनात समाविष्ठ जमिनींच्या खरेदी खतासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## मृद व जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजुर विभागासाठी 8 हजार 767 पदांना मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या मृद व जलसंधारण विभागाच्या फेररचनेसह विभागाकरिता सुमारे ८ हजार ७६७ पदांच्या आकृतीबंधास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. २०१७ मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागातून मृद व जलसंधारण या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली होती. छत्रपती संभाजी नगर येथे आयुक्तालयाच्या स्थापनेसह क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेसाठी सुमारे १६ हजार ४२३ पदाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला होता. यात मूळ विभागाची ६ हजार ४८१ पदे व कृषि विभागाकडून ९ हजार ९४२ पदे वर्ग होणे अपेक्षित होते. यावर उच्चस्तरीय सचिव समितीने मृद व जलसंधारण विभागाकरिता मंजूर ६ हजार ४८१ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरिता मंजूर २ पदांसह एकूण ६ हजार ४८३ पदांव्यतिरिक्त सुमारे २ हजार २८४ वाढीव पदांसह ८ हजार ७६७ पदांच्या सुधारित आकृतीबंधला मान्यता दिली. याशिवाय विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना करण्यास मान्यता देण्यात आली. यात प्रादेशिक जलसंधारण अधिकारी सहा कार्यालयांतील १०२ पदे रद्द करण्यात येणार आहेत. सध्या जलसंधारण अधिकारी यांची ३१ कार्यालये असून, सुधारित आकृती बंधात राज्यातील ३४ जिल्ह्यांसाठी ३४ कार्यालये स्थापन करण्यात येतील. वर्धा, पालघर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये नव्याने जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची कार्यालये सुरु होतील. महानगरपालिका क्षेत्रामध्ये मृद व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात करावी लागतात. यासाठी मुंबई महानगर प्रदेशातील नउ मनपांसाठी तीन पथके (९ पदे), पुणे व पिंपरी चिंचवड २ मनपासाठी १ पथक (३ पदे), नाशिक व मालेगाव मनपासाठी १ पथक (३ पदे), उर्वरित १६ महानगरपालिकांमध्ये वरिष्ठ अभियंता किंवा सहायक अभियंता श्रेणी (प्रत्येकी १ पद) अशी १६ पदे. अशारितीने २९ महापालिकांसाठी ३१ पदे नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.

## कौशल्याधारित शिक्षणाला चालना; राज्यात नवीन कौशल्य केंद्रांना मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील मानव संसाधन सक्षम करण्यासाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा बृहत आराखडा मंजूर करण्यात आला असून कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांद्वारे नियोजित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रभावी कार्यवाही करण्यात आली आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि नागपूर येथे विविध अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही कौशल्ये दिली जात आहेत. ह्यूमन कॅपिटल ते टॅलेंट कॅपिटल विकासावर भर दिला जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण(एनईपी) , राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (एनएसक्यूएफ) आणि राष्ट्रीय क्रेडिट आराखडा (एनसीआरएफ) फ्रेमवर्कनुसार तयार केलेले अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढवत आहेत. आतापर्यंत सुमारे ६१ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, बदलत्या उद्योग गरजांनुसार नवीन अभ्यासक्रम विकसित करण्यावर भर आहे. राज्यात कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी नवीन कौशल्य केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. औषधनिर्माणशास्त्र संस्थांमध्ये गुणात्मक वाढ करण्यावर भर देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# गुणवत्तेचा खेळखंडोबा

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा खेळखंडोबा होणे ही केवळ प्रशासकीय चूक नाही, तर देशातील लाखो तरुणांच्या स्वप्नांशी केलेली चेष्टा आहे. सलग तिसऱ्या वर्षी परीक्षेची पारदर्शकता पुराव्यानिशी धोक्यात येणे हे आपल्या व्यवस्थेच्या नैतिक अधःपतनाचे लक्षण आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) ३ मे रोजी झालेली नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द केल्याची घोषणा केली आणि पुन्हा एकदा लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. ज्या परीक्षेवर देशातील भावी डॉक्टरांची निवड अवलंबून असते, जिथे गुणवत्तेचा खरा कस लागायला हवा, तिथे आज पैशांचा आणि भ्रष्टाचाराचा बाजार बोकाळला आहे. एका बाजूला अहोरात्र परिश्रम करणारा प्रामाणिक विद्यार्थी आहे, तर दुसऱ्या बाजूला दहा ते पंचवीस लाख रुपये मोजून 'शॉर्टकट'ने यश मिळवू पाहणारी माफिया यंत्रणा कार्यरत आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, ही यंत्रणा रोखण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. पेपरफुटीचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे समोर येणारे वास्तव आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागलेली कीड अधोरेखित करत आहे. राजस्थान पोलिसांचा 'स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप' आणि 'सीबीआय' ज्या साखळीचा तपास करत आहेत, तिचा विस्तार महाराष्ट्र ते हरियाणा आणि राजस्थान ते बिहार असा झालेला दिसतो. नाशिकमधून पेपर बाहेर पडतो, तो हरियाणातील दलालांमार्फत राजस्थानमध्ये पोहोचतो आणि तिथे 'गेस पेपर'च्या नावाखाली लाखो रुपयांना विकला जातो. याला 'गेस पेपर' म्हणणे हा देखील एक मोठा विनोदाचा भाग आहे. जेव्हा रसायनशास्त्राचे ४५ आणि जीवशास्त्राचे ९० असे एकूण १३५ प्रश्न मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळतात, तेव्हा तो केवळ अंदाज नसून थेट परीक्षा-चोरीच मानावी लागते. राजस्थानम सीकर हे शिक्षणाचे केंद्र आता अशा घोटाळ्यांचे केंद्र बनत असल्याचे चित्र समोर येत आहे. तिथे राकेश मंदावरिया यांसारखे दलाल उघडपणे 'पेपर उपलब्ध आहे' अशी बढाई मारतात. बिहारमध्ये तर एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षातील विद्यार्थीच 'सॉल्वर गँग' चालवत असल्याचे उघड झाले आहे. ज्यांनी स्वतः डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले, तेच आज व्यवस्थेत भ्रष्टाचार पेरत असल्याचे पाहून संताप अनावर होतो. नीट परीक्षेला देशभरातून सुमारे २५ लाख विद्यार्थी बसतात. केवळ सुमारे १ लाख जागांसाठी होणारी ही अत्यंत जीवघेणी स्पर्धा आहे. यामध्ये बहुतांश विद्यार्थी मध्यमवर्गीय किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील असतात. आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे, या स्वप्नासाठी अनेक पालक आपले सर्वस्व पणाला लावतात, कर्ज काढतात आणि मोठे त्याग करतात. काही विद्यार्थी तर सलग तीन ते पाच वर्षे केवळ या एकाच परीक्षेच्या तयारीत गुंतलेले असतात. त्यांचे आयुष्य, आनंद आणि तारुण्य हे सतत पुस्तकांमध्ये आणि अभ्यासाच्या खोलीतच मर्यादित राहते. अशा परिस्थितीत, जेव्हा एखाद्या होतकरू विद्यार्थ्याला हे समजते, की ज्या परीक्षेसाठी त्याने एवढा मोठा त्याग केला, त्या परीक्षेचा पेपर आधीच फुटला होता, तेव्हा त्याच्या मनावर होणारा आघात कल्पनेपलीकडचा असतो. अशा घटना विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासावर गंभीर परिणाम करतात. परीक्षा रद्द होणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय नव्हे, तर विद्यार्थ्यांवर होणारा मानसिक त्रास आणि अन्यायही आहे. यातील आर्थिक नुकसानीचा हिशोब मांडणेही कठीण आहे. सरकार आणि संबंधित प्राधिकरणातील अधिकारी 'झिरो टॉलरन्स'च्या घोषणा करत राहतात, पण सलग तीन वर्षे अशा घटना घडतातच कशा, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. विरोधक यामागे 'राजकीय संरक्षण' असल्याचा आरोप करत आहेत, तर सत्ताधारी आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत; परंतु या सगळ्या राजकीय चिखलफेकीत मात्र सामान्य विद्यार्थ्याचाच बळी जातो आहे. परीक्षा रद्द करणे हा कदाचित तांत्रिक निर्णय असू शकतो, पण ज्यांनी पेपर चांगला सोडवला होता, त्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि अपेक्षांवर त्याचा मोठा परिणाम होतो. त्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखी ही परिस्थिती आहे. ज्या विद्यार्थ्यांना खात्री होती की यंदा आपण डॉक्टर होणारच, त्यांच्या मनात आता एकच भीती आहे 'पुन्हा तेवढेच मार्क मिळतील का?' या मानसिक तणावातून ते जात आहेत, त्याची भरपाई कोण करणार? अनेक विद्यार्थ्यांनी वर्षभराचा ताण हलका करण्यासाठी सुट्टी घेतली होती; पण आता त्यांना पुन्हा त्याच दडपणाच्या वातावरणात, त्याच पुस्तकांमध्ये डोके खुपसून बसावं लागणार आहे. केंद्र सरकार आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीने हे स्पष्ट करणे आवश्यक आहे, की एमबीबीएससारख्या अभ्यासक्रमांशी संबंधित आणि थेट जनतेच्या आरोग्याशी निगडित असलेल्या प्रवेश परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि भ्रष्टाचारमुक्त प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी त्यांची नेमकी योजना काय आहे. हा केवळ एका परीक्षेचा प्रश्न नाही, तर देशाच्या भविष्यातील आरोग्यसेवेच्या गुणवत्तेशी जोडलेला अत्यंत गंभीर मुद्दा आहे. आपण विकसित राष्ट्र बनण्याची स्वप्ने पाहत असताना, जर महत्त्वाच्या प्रवेश परीक्षा देखील पूर्ण पारदर्शकतेने आणि विश्वासार्हतेने घेता येत नसतील, तर त्या स्वप्नांची पायाभरणीच कमकुवत ठरते. पेपरफोडी आणि गैरप्रकार करणारी यंत्रणा ही केवळ कायद्याचे उल्लंघन करणारी नसून, ती संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेवरील आणि तरुण पिढीच्या मेहनतीवरील विश्वासाला तडा देणारी आहे. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि प्रामाणिक प्रयत्नांना धक्का बसतो. म्हणूनच, सरकारने केवळ गुन्हे दाखल करण्यापुरते मर्यादित न राहता, अशा प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अधिक कठोर कायदे, मजबूत देखरेख व्यवस्था आणि तांत्रिकदृष्ट्या अभेद्य परीक्षा प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. जेणेकरून जेणेकरून पुन्हा कोणत्याही 'मंदावरिया' किंवा 'खैरनार'च्या मनात पेपरलीक करण्याचा विचार डोकावणार नाही.

# आव्हानात्मक कालखंड

डॉ. जयंतीलाल भंडारी

**पश्चिम आशियातील संघर्षाचा परिणाम भारतात महागाई वाढण्याच्या रूपात दिसून येऊ लागला आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ, मालवाहतुकीचे वाढलेले दर आणि तेल पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे जगासह भारततही महागाई वाढत आहे. साबण, पेस्ट, बिस्किटे यांसारखी उत्पादने बनवणाऱ्या अनेक एफएमसीजी कंपन्यांनी पाकिटांचा आकार लहान करण्याची रणनीती अवलंबली आहे. जागतिक क्रेडिट रेटिंग एजन्सी आणि जागतिक संस्थांच्या अहवालांमध्ये अमेरिका आणि इराणमधील संघर्ष लांबल्यास भारताचा विकास दर कमी होण्याचा आणि महागाई वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**




भारतीय हवामान विभागाने 'अल निनो'मुळे २०२६ मध्ये सरासरीपेक्षा कमी मान्सूनचा अंदाज व्यक्त केला आहे. हा अंदाज गेल्या २६ वर्षांतील मान्सूनचा सर्वात कमी असलेला प्राथमिक अंदाज आहे. तो खरा ठरल्यास देशातील कृषी उत्पादन आणि खाद्यपदार्थांच्या किमतींवर परिणाम होऊ शकतो. नुकतेच जागतिक बँकेने म्हटले आहे की, वर्ष २०२६ मधील कमपुवत मान्सूनमुळे भारतातील कृषी उत्पन्न आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दबाव वाढू शकतो. यामुळे महागाई वाढण्याचे आणि विकास दरात घट होण्याचे आव्हान निर्माण होईल. हवामान विभागाने पावसाच्या दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. हा अंदाज ५ टक्के कमी किंवा जास्त या मॉडेल त्रुटीसह जारी करण्यात आला आहे. स्कायमेटच्या अहवालानुसार, देशात ७५ टक्के पावसावर आधारित मान्सून हंगामात ५ टक्के कमी-जास्त फरकाने ९४ टक्के पाऊस होऊ शकतो.

मागील आकडेवारी असे सांगते की, सरासरीपेक्षा कमी मान्सून असलेल्या वर्षांमध्ये जेव्हा पावसाची वेळ, वितरण आणि विस्तार जवळपास समान राहिला, तेव्हा खरीप उत्पादनात फारशी घट झाली नाही. मात्र, कोरडवाहू क्षेत्रांत घेतल्या जाणाऱ्या कडधान्य आणि तेलबिया पिकांसाठी धोका निर्माण होऊ शकतो. पश्चिम आशियातील संघर्षामुळे महागलेली खते, महागडे तेल आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे शेतीचा खर्च वाढला आहे, अशा वेळी कमपुवत मान्सूनचा केवळ शेतीवरच नव्हे, तर अर्थव्यवस्थेवरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. नीती आयोगाच्या मते, देशातील एकूण पीक क्षेत्रापैकी केवळ ५५ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे आणि ४५ टक्के शेती मान्सूनवर अवलंबून आहे. सीडब्लूएमआय नुसार, सुमारे ७४ टक्के गहू आणि ६५ टक्के तांदूळ लागवडीचे क्षेत्र आधीच भीषण पाणीटंचाईचा सामना करत आहे. नगदी पिके आणि औद्योगिकीकरणाकडे वाढत्या कलामुळे भारतातील मान्सूनच्या पावसावर अवलंबित्व वाढले आहे. आता अल-निनोचा धोका आणि कमपुवत मान्सूनच्या शक्यतेमुळे जलाशय कोरडे पडण्याची आणि शेतीसाठी पाण्याच्या टंचाईची चिंता वाढली आहे.

केंद्रीय जल आयोग देशातील एकूण १८३.५६५ अब्ज घनमीटर क्षमता असलेल्या १६६ प्रमुख जलाशयांच्या साठ्यावर लक्ष ठेवून असते. सध्या या जलाशयांमध्ये एकूण क्षमतेच्या ४४.७१ टक्के साठा आहे. अलीकडेच यात वेगाने घट झाली आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये भारतात ३५.७० कोटी टन अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन झाले आहे. यावर्षी २०२५-२६ मध्ये यापेक्षाही अधिक अन्नधान्य उत्पादनाची शक्यता आहे. २०२६ मध्ये गव्हाच्या लागवडीखालील क्षेत्रदेखील मागील वर्षाच्या ३२८.०४ लाख हेक्टरच्या तुलनेत वाढून सुमारे ३३४.१७ लाख हेटर झाले आहे. हे आणखी एका चांगल्या पिकाच्या शक्यतेचे संकेत देते. एफसीआयच्या केंद्रीय पूलमध्ये १ एप्रिल २०२६ रोजी सुमारे ६०० लाख टनांहून अधिक गहू आणि तांदळाचा उपलब्ध साठा अन्नसुरक्षेच्या बाबतीत भारताची मजबुती दर्शवतो. सध्या देशातील ८० कोटींहून अधिक दुर्बल घटकातील लोकांना मोफत अन्न धान्य वाटप केले जात आहे. हेदेखील उल्लेखनीय आहे की, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या निर्यात आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताने ५५ अब्ज डॉलर मूल्याची कृषी निर्यात केली आहे आणि भारत जगातील सातवा सर्वात मोठा कृषी निर्यातदार देश म्हणून कृषी निर्यात क्षेत्रात उभा राहिला आहे. वर्ष २०१४ ते २०२५ दरम्यान प्रक्रिया केलेल्या अन्न उत्पादनांची निर्यात चार पट, फळे आणि डाळींची निर्यात तीन पट, अन्नधान्याची निर्यात दोन पट आणि तांदळाच्या निर्यातीत सुमारे ६२ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे.

भारत सरकारने देशांतर्गत बाजारपेठा स्थिर करण्यासाठी आणि उत्पादकांना फायदेशीर मोबदला सुनिश्चित करण्यासाठी एक निर्णायक आणि शेतकरी-केंद्रित पाऊल उचलत ५० लाख मेट्रिक टन गहू आणि अतिरिक्त १० लाख मेट्रिक टन गहू उत्पादनांच्या निर्यातीला मंजुरी दिली आहे. मात्र, कमपुवत मान्सूनमुळे आगामी निर्यात आदेशांच्या पूर्ततेसाठी सतर्पता बाळगणे आवश्यक आहे. देशाने पाहिले आहे की, वर्ष २०२१-२२ मध्ये ७० लाख टनांहून अधिक गव्हाची निर्यात केली होती, परंतु वर्ष २०२४ मध्ये गव्हाची आयात करावी लागली. कमी पावसामुळे जलाशयातील पाण्याची पातळी खालावल्याने सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता प्रभावित होईल, अशा परिस्थितीत आतापासूनच जलसंधारणाचे प्रयत्न सुरू व्हायला हवेत. सध्या जो किरकोळ महागाई दर ३.४० टक्के आहे, तो वाढण्याची शक्यता राहील. त्यामुळे किंमत नियंत्रणाच्या रणनीतीसह पुढे जावे लागेल.

भारताला पीक विविधीकरण आणि शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या एकात्मतेसह हा प्रवास करावा लागणार आहे. यासाठी सिंचन व्यवस्थेचे नवीन धोरण तयार करणे फायदेशीर ठरेल. धान्य वाया जाण्यापासून वाचवण्यासाठी देशात २०२८ पर्यंत सहकारी क्षेत्रात ७०० लाख टन धान्य साठवणुकीची नवीन क्षमता विकसित करण्याची महत्त्वाकांक्षी योजना वेगाने पुढे नेली पाहिजे. जागतिक रेटिंग एजन्सी मूडीजने आपल्या अहवालात म्हटले आहे की, पश्चिम आशियातील युद्ध, ऊर्जेच्या किमती आणि पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे भारताचा विकास दर मंदावू शकतो आणि महागाई वाढू शकते. मूडीज रेटिंग्सने भारताच्या विकास दराचा अंदाज कमी करून चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ६ टक्के केला आहे, जो पूर्वी ६.८ टक्के वर्तवण्यात आला होता. मूडीजने चालू आर्थिक वर्षात सरासरी महागाई दर ४.८ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे, जो २०२५-२६ मधील २.४ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. अशा स्थितीत महागाई दर भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरवलेल्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा वर जाणे आव्हानात्मक ठरेल.

सरकारने महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी आणि सामान्य माणसावर होणारा तिचा परिणाम कमी करण्यासाठी जीवनावश्यक खाद्यपदार्थांचा बफर स्टॉक वाढवणे, खुल्या बाजारात खरेदी केलेल्या अन्नधान्याची धोरणात्मक विक्री करणे आणि आवश्यक आयातीची सुविधा उपलब्ध करून देणे यांसारखी अनेक धोरणात्मक पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर महागाईच्या कोणत्याही आव्हानाचा सामना करण्यासाठी भारताकडे १० एप्रिलपर्यंत ७०० अब्ज डॉलरपेक्षा अधिक परकीय चलन साठ्याची शक्तीदेखील आहे. येणाऱ्या काळात खाद्यतेलाच्या आयात शुल्कात कपात करण्यासह खतांचा योग्य पुरवठा करण्यासाठी ठामपणे पावले उचलली जातील.

रिझर्व्ह बँकेद्वारे आवश्यक असल्यास चलनविषयक धोरण कडक करताना सध्याचा ५.२५ टक्के धोरणात्मक व्याजदर वाढवला जाईल. काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करून त्याअंतर्गत गरजेनुसार वस्तूंच्या साठवणुकीची मर्यादा निश्चित करणे, नियमित छापे टाकणे आणि दोषींवर जलद कायदेशीर कारवाई करणे या मार्गावरही ठामपणे पुढे जाताना दिसेल, अशी आशा करूया.

## कॉर्पोरेट जिहाद आणि शंखनाद!

आजच्या आधुनिक युगात युद्धे केवळ सीमेवर शस्त्रांनी लढली जात नाहीत, तर ती वैचारिक आणि आर्थिक स्तरावरही खेळली जात आहेत. पुणे येथे हिंदू जनजागृती समितीने आयोजित केलेल्या 'बेटी सुरक्षित, राष्ट्र सुरक्षित' या देशव्यापी अभियानाच्या शुभारंभप्रसंगी 'कॉर्पोरेट जिहाद'चे भीषण वास्तव समोर आले. कॉर्पोरेट जिहादच्या माध्यमातून आपल्या तरुण पिढीच्या विचारधारेवर आणि धर्मावर जे पद्धतशीर आक्रमण होत आहे, ते अत्यंत चिंताजनक आहे. केवळ गुन्हेगारांनाच नव्हे, तर त्यांना छुपी मदत करणाऱ्या संपूर्ण व्यवस्थेला कायद्याच्या कक्षेत आणून कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये हिजाब चालतो, पण कुंकू, टिळा आणि हातातील कलावा (दोरा) चालणार नाही, असे असंवैधानिक नियम लादले जात आहेत. हिंदूंनी आपल्या धार्मिक अस्मितेसाठी संघटितपणे आवाज उठवला पाहिजे. जेव्हा समाज एकत्र येतो, तेव्हाच अशा कंपन्यांना आपले नियम मागे घेण्यास भाग पाडले जाऊ शकते. या जिहादी संकटाचा सामना करण्यासाठी हिंदूंमध्ये दोन गोष्टी असणे अनिवार्य आहे. आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचे श्रेष्ठत्व जाणून घेणे. आपल्याला अदृश्य स्वरूपात लक्ष्य करणाऱ्या शत्रूची ओळख पटवणे. बेटी सुरक्षित, राष्ट्र सुरक्षित' हे अभियान केवळ जनजागृतीपुरते मर्यादित नसून, ते राष्ट्ररक्षणाचे पाऊल आहे. मग ते 'लव्ह जिहाद' असो वा 'कॉर्पोरेट जिहाद', हिंदू समाजाला आता जागृत व्हावेच लागेल.

**वर्षा आवदे**
नागपूर

## मोफतच्या योजना की प्रगतीचे पाश?

आजच्या राजकारणाचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी निवडणूक जिंकण्यासाठी विकासाची आश्वासने दिली जात असत; आता 'फुकट' देण्याच्या घोषणा केल्या जातात. 'सरकार सगळं फुकट देतंय' ही घोषणा ऐकायला कानाला गोड लागते, पण हीच गोडी भविष्यातील कडू सत्याची नांदी आहे, हे आपल्याला कधी समजणार? फुकट धान्य, फुकट वीज, फुकट बस प्रवास आणि बँक खात्यात जमा होणारे फुकटचे पैसे या सगळ्यामुळे आपण प्रगतीकडे जात आहोत की अधोगतीकडे, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे. राज्यकर्त्यांनी जनतेला आळशी बनवण्याचे एक षडयंत्र रचले आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कारण जर जनता सुशिक्षित झाली, स्वावलंबी झाली आणि स्वतःच्या पायावर उभी राहिली, तर ती प्रश्न विचारेल. ती विचारेल की, 'आमच्या जिल्ह्यात आयटी पार्क का नाही? आमच्या तालुक्यात कारखाना का आला नाही? शेतीला पाणी का मिळत नाही?' हे प्रश्न सत्तेला हादरे देणारे असतात. हे प्रश्न टाळण्यासाठी 'मोफत'चा उपाय शोधला गेला आहे.

कोणतीही गोष्ट 'फुकट' नसते. सरकारने दिलेले एक रुपयाचे अनुदान हे दुसऱ्या कोणाच्या तरी कष्टाच्या करातून आलेले असते. आपल्याला 'भिकारी' बनवणारी व्यवस्था नको, तर 'सक्षम' बनवणारी व्यवस्था हवी आहे. शेवटी, भीक मागून किंवा कोणाच्या उपकारावर जगून पोट भरता येईल, पण मान ताठ करून जगता येणार नाही.

**विरेंद्र सोनवणे**
मो. ८८८८२४४८८३

## भीषण पाणी टंचाईचे वास्तव

गेल्या मार्च महिन्यापासूनच महाराष्ट्रात पाणी टंचाईच्या तीव्र झळा बसू लागल्या असून सरकारी आकडेवारीनुसार राज्यात सध्याच्या घडीला ४११ गावे आणि १११४ वाड्यांना ४६६ हून अधिक टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तीव्र पाणी टंचाईमुळे हताश झालेले गावा-खेड्याकडच्या महिला पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशांना वणवण भटकत आहेत आणि गावात टँकर येताच हंडे, कळशी घेऊन विहिरीवर प्रचंड गर्दी करत आहेत.

ग्रामीण भाग पाणी टंचाईशी असा जीवघेणा संघर्ष करत असताना पुणे आणि मुंबईसारख्या शहरांमध्येही पाणी कपातीचे संकट घोंगावत आहे. धरणांमधील पाणीसाठा वेगाने खाली आल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून मुंबई महानगरपालिकेने मुंबई आणि उपनगरांमध्ये १५ मे २०२६ पासून टक्के पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. एकूणच राज्यातील नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

**प्रदीप मोरे**

# ममतांसमोरील आव्हाने !

अभय गोखले



'कॅट क्लाइंब्ड द ट्री ओन्ली अंडर ड्युरेस' मांजर स्वतःच्या इच्छेने झाडावर चढली नाही, तर तिला कुणीतरी घाबरवल्यामुळे किंवा तीच्या जीवाला धोका निर्माण झाल्यामुळे जीव वाचवण्यासाठी ती नाइलाजाने झाडावर चढली. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची अवस्था सध्या त्या मांजरी सारखी झाली आहे. इतके दिवस विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीला कस्पटासमान लेखणाऱ्या ममतांना, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा दारुण पराभव झाल्यानंतर आता अचानक इंडिया आघाडीची आठवण झाली आहे. कॉंग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी या इंडिया आघाडीतील घटक पक्षांबरोबर पश्चिम बंगालमधील विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत समझोता करण्यास ममतांनी आजवर नकार दिला होता. कॉंग्रेसला तर त्यांनी अपमानास्पद जागा सोडण्याची तयारी दाखवून एक प्रकारे कॉंग्रेसच्या जखमेवर मीठ चोळले होते. मात्र पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने त्यांच्या पक्षाची धुळधाण उडवल्यानंतर ममतांना आता कॉंग्रेस आणि डावे पक्ष एकदम जवळचे वाटू लागले आहेत.

ममतांनी भाजपाच्या विरोधातील पक्षांना असे आवाहन केले आहे की, भाजप हा आपल्या सर्वांचा कॉमन शत्रू असल्याने आपण आपापसातील हेवेदावे विसरून, भाजपा विरोधात एकत्र आले पाहिजे. एकंदरित सत्तेवर असताना हवेत असणाऱ्या ममता यांचा दारुण पराभव झाल्यानंतर आता जमिनीवर आल्या आहेत. मात्र आता उशीर झाला आहे, असे ममतांना सुनावणाऱ्या, कॉंग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या पक्षांनी, ममता बॅनर्जी यांच्या आवाहनाची खिल्ली उडवली आहे. कॉंग्रेसच्या एका नेत्याने म्हटले आहे की, इतके दिवस इंडिया आघाडीला दुर्लक्षित करणाऱ्या ममता बॅनर्जी यांना आपला निवडणुकीत पराभव झाल्यानंतर इंडिया आघाडीची आठवण झाली आहे. २०११, २०१६ आणि २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी जो प्रचंड हिंसाचार घडवून आणला आणि त्याची झळ, कॉंग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला पोहोचली त्या घटना ममता आता विसरलेल्या दिसत आहेत.

२०११ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत डाव्या आघाडीचा पराभव करून जेव्हा तृणमूल कॉंग्रेस पहिल्यांदा राज्यात सत्तेवर आली तेव्हा आपण राज्यात हिंसाचार होऊ दिला नाही. अर्थात ममता त्याबाबत धडधडीत खोटे बोलत आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ममतांनी असाही दावा केला की, मी राज्याचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांना माझी बुलेटप्रुफ कार पाठवली होती तसेच त्यांना झेडप्लस सुरक्षा प्रदान केली होती. तृणमूल कॉंग्रेसचे प्रवक्ते रिजू दत्ता यांचे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबन झाल्यानंतर त्यांनी पक्षावर टीकेचे आसूड ओढले आहेत. हेच ते रिजू दत्ता जे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, पश्चिम बंगालचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्यावर निरनिराळ्या टीव्ही चॅनेल्सवरुन बेफाम आरोप करत होते. मात्र पक्षाने त्यांची हकालपट्टी केल्यानंतर आता त्यांना आपल्या बोलण्याचा पश्चात्ताप झाला आहे. त्यांनी आता सुवेंदू अधिकारी यांचे गोडवे गायला सुरुवात केली आहे.

रिजू दत्ता यांनी आपल्या पक्षावर टीका करताना असे विधान केले आहे की, राज्यातील जनता तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यशैलीला अतिशय वैतागली होती. जनतेला छोट्या छोट्या कामांसाठीही, तृणमूलला कमिशन द्यावे लागत होते. रिजू दत्ता यांनी पक्षावर केलेला सर्वात मोठा आरोप म्हणजे, खेडेगावांतील हिंदू महिलांवर तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात अत्याचार करण्यात आले. त्यामुळे महिलावर्ग मोठ्या प्रमाणात तृणमूल कॉंग्रेसपासून दुरावला. तृणमूल कॉंग्रेसचा निवडणुकीत विजय झाला असता तर हे शहाणपण त्यांना सूचले असते का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भाजपाची प्रशंसा करून रिजू दत्ता यांना भाजपात प्रवेश करायचा असावा. परंतु त्यांचा तो हेतू साध्य होणार नाही. कारण भाजपाचे पश्चिम बंगाल प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी म्हटले आहे की रिजू दत्ता यांच्यासारख्या लोकांसाठी भाजपाची दारे बंद करण्यात आली आहेत. नजीकच्या भविष्यात ममतांचे काही सहकारी त्यांची साथ सोडून भाजपामध्ये गेले तर आश्चर्य वाटायला नको. त्यांना गेली पंधरा वर्षे सत्तेत रहाण्याची सवय झाली आहे. त्याशिवाय काही नेत्यांच्या विरोधात इडी सीबीआय यांची चौकशी सुरू आहे. काही नेत्यांच्या डोक्यावर इडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यांची टांगती तलवार आहे. अशा परिस्थितीत स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा एकच उपाय त्यांच्या समोर आहे, तो म्हणजे भाजपात प्रवेश करणे. तृणमूलचे अनेक नेते भाजपात प्रवेश करण्यासाठी उत्सुक असणार, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत पक्ष एकसंध ठेवण्यासाठी, ममतांना बरीच कसरत करावी लागेल. पश्चिम बंगालचा आजवरचा इतिहास पाहिला तर जे पक्ष प्रदीर्घ काळ राज्यात सत्तेवर राहिले, ते सत्तेवरून खाली उतरल्यानंतर अतिशय कमकुवत झाले. कॉंग्रेस राज्यात २५ वर्षे सत्तेत होती. सत्तेवरून खालीउतरल्यावर कॉंग्रेसची ताकद इतकी कमी होत गेली की विधानसभेत किंवा लोकसभेत एक दोन जागा मिळवणेही पक्षासाठी अवघड होऊन बसले. मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी राज्यात ३४ वर्षे सत्तेत होती. मात्र सत्तेतून पायउतार झाल्यानंतर, आघाडीची इतक्या वेगाने घसरगुंडी झाली की, गेल्या खेपेस पक्षाला विधानसभेत एकही आमदार निवडून आणता आला नाही.

लोकसभेतही पक्षाचा एकही खासदार गेल्या खेपेला पश्चिम बंगाल मधून निवडून आला नाही या पार्श्वभूमीवर तृणमूल कॉंग्रेसच्या नशिबात काय लिहिले आहे, या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच आपल्याला देऊ शकेल.

# मध्यरात्रीचा रक्तरंजित हल्ला

## चार गंभीर जखमी, तिघा हल्लेखोरांचा शोध सुरू



**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभुळगाव : बाघीलाल पार्क परिसरात मध्यरात्री सुमारे ३ वाजताच्या सुमारास स्थलांतरित झोपडीधारकांवर अज्ञात दरोडेखोरांनी जीवघेणा हल्ला चढविल्याची धक्कादायक घटना समोर आली असून या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मध्यरात्री झालेल्या या हल्ल्याने बाभुळगाव परिसर हादरून गेला आहे.

घटनेची गंभीरता लक्षात घेता बाभुळगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले. घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा करण्यात आले असून पोलिसांकडून विविध बाजूंनी तपास सुरू आहे.

या हल्ल्यात चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय पथक लक्ष ठेवून आहे. दरम्यान, अधिकृत माहितीनुसार हल्ला करणाऱ्यांची संख्या तिघे असल्याचे समोर आले आहे. मात्र वृत्त लिहेपर्यंत आरोपींचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नव्हता. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची विशेष पथके विविध दिशांना रवाना करण्यात आली असून तपास यंत्रणा युद्धपातळीवर कामाला लागली आहे. या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी पूर्ववैमनस्य, दरोडा किंवा अन्य कोणत्या कारणातून हा प्रकार घडला का, याचाही तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# धावत्या लाईनीच्या लपंडावामुळे नागरिक घामाघूम

**जनमाध्यम प्रतिनिधी**

## महावितरणच्या कारभाराविरुद्ध तीव्र संताप!




ढाणकी - मे महिन्याचा कडक उन्हाळा आणि ४० अंशाच्या पार गेलेला पारा अशा परिस्थितीत ढाणकी परिसरात महावितरण कंपनीच्या वीज पुरवठ्याचा लपंडाव सुरू आहे. यामुळे स्थानिक नागरिक प्रचंड उन्हाळ्यात कमालीचे बेहाल झाले असून परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सध्या दुपारच्या वेळी नागरिक उन्हाच्या तीव्र झळा सोसत आहेत. घरात कुलर आणि पंखे चालवण्यासाठी विजेची अत्यंत गरज असतानाच वीज गायब होत आहे. २४ तासांतून डझनभर वेळा वीज खंडित होत आहे. रात्रीच्या वेळीही अचानक वीज जात असल्याने लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींचे हाल होत आहेत.पाणी वीज गुल असल्यामुळे गावातील पाणीपुरवठा योजना विस्कळीत झाल्या आहेत. ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. विजेअभावी स्थानिक व्यापारी, झेरॉक्स सेंटर, आणि शीतपेय विक्रेते यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. महावितरणने आपले तांत्रिक बिघाड त्वरित दुरुस्त करून उन्हाळ्याच्या दिवसात सुरळीत वीज पुरवठा करावी अशी मागणी ग्रामस्थ करत आहे.

# युवासेना यवतमाळ–वाशिम लोकसभा संपर्क प्रमुखपदी ॲडव्होकेट विशाल गणात्रा यांची नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : युवासेनेचे यवतमाळ जिल्हा संपर्क प्रमुख ॲडव्होकेट विशाल राजेश गणात्रा यांची युवासेना यवतमाळ–वाशिम लोकसभा संपर्क प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, युवा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे तसेच शिवसेना नेते ना. संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी राज्यातील विविध लोकसभा संपर्क प्रमुख पदांची घोषणा केली. यवतमाळच्या विशाल गणात्रा यांना पुन्हा संधी दिल्याने युवासेनेत आनंद व समाधान व्यक्त होत आहे.

राज्यात सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रिया तसेच मतदार यादी अद्ययावत करण्याच्या मोहिमेला गती देण्यासाठी आणि युवासेना सदस्य नोंदणी अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी पक्षाने लोकसभा स्तरावर संघटनात्मक बळकटी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच पार्श्वभूमीवर या नियुक्त्या करण्यात आल्या आहे. विशाल गणात्रा हे गेल्या दहा वर्षांपासून युवासेनेत सक्रियपणे कार्यरत असून त्यांनी शहर प्रमुख, जिल्हा प्रमुख,



संपर्क प्रमुख, लोकसभा प्रमुख अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत. ते युवा सेनेचे राज्य कार्यकारणी सदस्य सुद्धा आहेत. त्यांच्या कार्यकाळात यवतमाळ जिल्ह्यात युवासेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत झाली असून अनेक तरुणांना पक्षाशी जोडण्यात ते यशस्वी ठरले आहेत. कोरोना काळात अन्नदान उपक्रम राबविणे, सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे आयोजन करणे, तसेच क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून तरुणांना सकारात्मक दिशा देणे, अशी उल्लेखनीय कामगिरी त्यांनी केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत शिवसेनेचे नेते तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. संजयभाऊ राठोड, पश्चिम विदर्भ सहसंपर्क प्रमुख पराग पिंगळे, यवतमाळ जिल्ह्याचे संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, हरिहर लिंगनवार यांनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त केला आहे. अत्यंत महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याबद्दल प्रतिक्रिया देताना विशाल गणात्रा यांनी सांगितले की, पक्ष नेतृत्वाने दिलेला विश्वास सार्थ ठरवत संघटन अधिक बळकट करण्यासाठी तसेच युवकांना पक्षाच्या विचारांशी जोडण्यासाठी आपण पूर्ण क्षमतेने कार्य करणार आहोत. या नियुक्तीबद्दल युवासेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, आगामी काळात संघटनात्मक कामाला अधिक वेग येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पैनगंगा अभयारण्याचे सौंदर्य खुलले

**जनमाध्यम प्रतिनिधी**

कुरळी : वैशाखाच्या कडक उन्हाने धरती तापलेली असताना निसर्ग मात्र आपल्या वेगळ्याच रंगोत्सवात रमलेला दिसत आहे. पैनगंगा अभयारण्यात सध्या 'बहावा'ची झाडे आपल्या सोनेरी फुलांच्या वर्षावाने लक्ष वेधून घेत आहेत. पिवळ्याधमक फुलांचे लोंबते घोस वाऱ्यावर हलताना जणू निसर्गाने सुवर्णहारच ल्याल्याचा भास निर्माण होतो. यामुळे पैनगंगा अभयारण्याचे सौंदर्य खुलले आहे.

रखरखत्या उन्हाळ्यात बहाव्याचा बहर मनाला गारवा देणारा ठरत आहे. पानगळ झालेल्या फांद्यांवर उमललेली पिवळी फुले पाहताना कवींच्या ओळी नकळत आठवतात, 'रानात सोनं फुललं, झाडांनी स्वप्नं मिरवली...' अशीच काहीशी भावना या बहाव्याकडे पाहताना मनात दाटून येते. जणू निसर्ग स्वतःच सूर्यकिरणांना फुलांच्या रूपात झाडावर उतरवत आहे. विशेष म्हणजे बहाव्याचा बहर हा पावसाळ्याच्या चाहुलीचाही दूत मानला जातो. एप्रिल ते मे महिन्यात संपूर्ण झाड फुलांनी नटते आणि काही दिवस परिसराला एक आगळे सौंदर्य प्राप्त होते.

## • वेचक

### अवैध दारू विक्रीवर आता एसडीओंच्या समितीचा 'वॉच'

यवतमाळ : जिल्ह्यात हातभट्टीसह अवैध दारु विक्रीला अक्षरशः उत आला आहे. आता अशा अवैध दारु विक्रीवर वॉच ठेवण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एसडीओंच्या नेतृत्वातील समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. दारु विक्रीवर नजर ठेवून या समितीला महिन्यातून एकदा तरी बैठक घेणे बंधनकारक आहे. जिल्ह्याच्या खेड्यापाड्यांना अवैध आणि घातक दारुने पोखरुन काढले आहे. तरुण पिढीसह अल्पवयीन मुलांनाही अशा दारुची 'चटक' लागली आहे. कित्येक संसारांना या दारुने सुरुंग लावल्याच्या घटना वारंवार पुढे येतात. त्यामुळे तालुका स्तरावर नियंत्रण समित्या नेमण्यात आल्या होत्या. पूर्वी या समितीचे प्रमुख म्हणून तहसीलदार काम पाहायचे. परंतु, या समित्यांचे कुठेही अस्तित्वच झळकले नाही. त्यामुळे शासनाने छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वात अभ्यास गट नेमून या समितीच्या कामकाजाचे अवलोकन केले. त्यातून आलेल्या शिफारशीनुसार, आता या तालुका समित्यांचे ११ मे रोजी गृह विभागाकडून पुनर्गठण करण्यात आले आहे. त्यानुसार समितीचे नेतृत्त्व आता तहसीलदारांऐवजी उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहे. तर तहसीलदारांसह, एसडीपीओ, राज्य उत्पादन शुल्कचे उपअधीक्षक, निरीक्षक, पंचायत समितीमधील सर्व महिला लोकप्रतिनिधी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी हे या समितीचे सदस्य राहणार आहेत. तसेच संबंधित क्षेत्रातील ठाणेदार हे या समितीचे सदस्य सचिव असतील. या व्यतिरिक्त एखादा शासकीय किंवा अशासकीय सदस्यही जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने नेमता येणार आहे. संबंधित तालुक्यात अवैध दारु विक्री होऊ नये, दारुबंदीच्या नियमाचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी या समितीला काम करावे लागणार आहे.

### ओम कॉलनीत ६० हजारांची घरफोडी



यवतमाळ : घरात कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने दरवाजाचे कुलूप कोंडा तोडून ६० हजारांवर डल्ला मारला. ही घटना ओम कॉलनी परिसरात ११ मे रोजी घडली. सुरेश नामदेव जयसिंगपुरे (४६) रा. महादेव मंदिर ओम कॉलनी जवळ यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादी हे बाहेरगावी गेले असता कुणीतरी अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. तसेच घरातील साहित्य अस्थाव्यस्थ करून कपाटातील ६० हजार रुपये आणि फिर्यादीच्या वडिलांनी ठेवलेली पैशाची पिशवी लंपास केली. जयसिंगपुरे यांनी १२ मे रोजी अवधूत वाडी पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली.

# यथार्थ गॅस एजन्सीचा 'बेधुंद' कारभार..!

## हक्काचा सिलेंडर मागितला तर ग्राहकाला शिवीगाळ!

### १५ दिवस उलटूनही डिलिव्हरी नाही एजन्सी मालकाची मस्ती पुसदमध्ये चर्चेत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - शहरातील 'यथार्थ इंडेन' गॅस एजन्सी'चा अनागोंदी कारभार आता चव्हाट्यावर आला आहे. मागील काही दिवसांपासून शहरात गॅसचा तुटवडा असताना, दुसरीकडे हक्काचा सिलेंडर मागणाऱ्या ग्राहकांना एजन्सी मालकाकडून चक्क शिवीगाळ आणि उद्धट वागणूक दिली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'जिथे तक्रार करायची तिथे करा' अशा शब्दांत मालकाने ग्राहकाला सुनावल्याने संताप व्यक्त होत आहे.

पुसद येथील ग्राहक रेवती अनिल साखरे यांनी गॅस सिलेंडर बुक केला होता. ३० एप्रिल २०२६ रोजी त्यांना गॅस डिलिव्हरीची पक्की पावती देखील मिळाली. नियमानुसार पावती मिळाल्यावर तात्काळ सिलेंडर मिळणे अपेक्षित होते. मात्र, १५ दिवस उलटूनही सिलेंडर त्यांच्या घरी पोहोचला नाही.

याबाबत विचारणा करण्यासाठी रेवती साखरे यांचे पती अनिल साखरे यांनी पुसदच्या इटावा वॉर्डातील 'यथार्थ इंडेन गॅस'चे मालक हंसराज जाधव यांच्याशी संपर्क साधला. अनिल साखरे यांनी सिलेंडर का मिळाला नाही, असे विचारले असता एजन्सी मालक हंसराज जाधव यांनी चक्क मद्यधुंद अवस्थेत साखरे यांना अभद्र भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

एवढ्यावरच न थांबता, "तुम्हाला जिथे जायचे तिथे जा, ज्याच्याकडे तक्रार करायची तिथे करा, मी कुणाला घाबरत नाही," अशा मस्तीत त्यांनी साखरे यांना उत्तर दिले. पावती हातात असूनही गॅस मिळत नाही आणि विचारणा केल्यावर शिवीगाळ सोसावी लागते, या प्रकारामुळे साखरे कुटुंब हादरून गेले आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष की मालकाची मुजोरी?

इंडियन ऑईलच्या नियमानुसार ग्राहकांना दर्जेदार सेवा देणे बंधनकारक असताना यथार्थ गॅस एजन्सीमध्ये मात्र उलटं चाललं आहे. आधीच गॅस तुटवड्यामुळे नागरिक त्रस्त असताना एजन्सी मालकाची ही 'मद्यधुंद' मस्ती सामान्य ग्राहकांच्या सहनशीलतेचा अंत पाहणारी आहे. या प्रकरणी वरिष्ठ गॅस अधिकारी आणि पुरवठा विभागाने हंसराज जाधव यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. सिलेंडरची पावती असूनही मालकाकडून मिळालेली ही वागणूक म्हणजे ग्राहकांच्या हक्काची पायमल्ली असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# ढाणकीत तीव्र पाणीटंचाई

## आश्वासन देणारे लोकप्रतिनिधी अपयशी

### संतप्त नागरिकांची टँकर सुरू करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



ढाणकी - 'पाणी समस्या कायमची मिटवू' असे मोठे आश्वासन देऊन ढाणकी नगरपंचायत निवडणुकीत विजयी झालेले लोकप्रतिनिधी नागरिकांची तहान भागवण्यात पूर्णतः अपयशी ठरले आहेत. आज भीषण उन्हाळ्यात संपूर्ण ढाणकी शहर तहानलेले असून, अनेक दिवसांपासून नळाला पाणीच आलेले नाही. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या या अकार्यक्षमतेमुळे संतप्त नागरिक आता थेट टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी करत आहेत.

निवडणुकीतील आश्वासने हवेत विरली असून नगरपंचायत निवडणुकीच्या वेळी सर्वच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी ढाणकीकरांना पाणी प्रश्न सोडवण्याचे मुख्य आश्वासन दिले होते.

मात्र, सत्तेत येताच लोकप्रतिनिधींना या आश्वासनाचा विसर पडल्याचे चित्र आहे. नळाला पाणी कधी येणार, याचा कोणताही पत्ता नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासकीय यंत्रणा सुस्त झाल्यामुळे आज नागरिक हतबल होऊन पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी ढाणकीतील नागरिकांना दाहीदिशा भटकावे लागत आहे. तीव्र उन्हात पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ महिला व बालकांवर आली आहे.

एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाली असतानाही स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणा ढिम्म हललेली नाही. "प्रशासन नागरिकांची पाण्यावाचून मारण्याची वाट पाहत आहे का?" असा संतप्त सवाल आता हतबल झालेले नागरिक विचारत आहेत.

नळ योजना कुचकामी ठरल्याने ढाणकी शहरात तात्काळ शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी जोर धरत आहे. लोकप्रतिनिधी व प्रशासन तात्काळ पावले न उचलल्यास "नागरिक तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे समजते."

# सत्र २००८ च्या एस.एस.सी. बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**



झरी - शेतकरी विद्यालयातील सत्र - २००८ च्या एस.एस.सी. बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमीलन सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. अनेक वर्षानंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जून्या आठवणींना उजाळा देत आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणाचे आराध्य दैवत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पुजनाने व दिपप्रज्वलाने करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षकांचा सत्कार करून विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. माजी विद्यार्थ्यांनी आपला परीचय देत शालेय जीवनातील आठवणी; अनुभव आणि सध्याच्या आयुष्यातील प्रवास एकमेकांसमोर मांडला. या सुंदर अश्या स्नेहमीलन कार्यक्रमामूळे जुन्या मित्र मैत्रिणींना भेटण्याची संधी मिळाली. यावेळी माजी विद्यार्थी शिक्षकवृंद आणि मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन माजी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडले. शेवटी आभार प्रदर्शनाने व राष्ट्र गिताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जागतिक बँकेच्या पथकाकडून भूमिगत सांडपाणी योजना व डंपिंग यार्डची पाहणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शहरातील सुरू असलेल्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जागतिक बँकेचे दोन सदस्यीय पथक बुधवारी यवतमाळमध्ये दाखल झाले. पथकाने नगर परिषदेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या भूमिगत सांडपाणी योजना, ड्रेनेज व्यवस्था तसेच डंपिंग यार्डची सविस्तर पाहणी केली.

या पाहणीदरम्यान प्रकल्पांची सद्यस्थिती, कामाचा दर्जा, प्रगतीचा वेग आणि पुढील कृती आराखड्याचा आढावा घेण्यात आला. शहरातील सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता व्यवस्था आणि घनकचरा विल्हेवाट प्रणालीची कार्यक्षमता याबाबतही पथकाने माहिती घेतली. यावेळी नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम क्यतमवार, जीवन प्राधिकरण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रफुल्ल व्यवहारे यांच्यासह नगर परिषद व जीवन प्राधिकरण विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी पथकाला प्रकल्पांचे तांत्रिक तपशील, आतापर्यंत पूर्ण झालेली कामे आणि आगामी टप्प्यांची माहिती दिली. माहितीनुसार, या पाहणीनंतर जागतिक बँकेचे पथक सविस्तर अहवाल तयार करून केंद्र सरकारकडे सादर करणार आहे. या अहवालाच्या आधारे प्रकल्पांच्या पुढील टप्प्यांसाठी निधी, आवश्यक सुधारणा आणि कामांच्या गतीबाबत निर्णय घेतले जाणार आहेत. शहरातील भूमिगत सांडपाणी व निचरा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्येत मोठ्या प्रमाणात घट होऊन स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तसेच डंपिंग यार्डच्या सुधारित व्यवस्थापनामुळे घनकचरा विल्हेवाट प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध आणि परिणामकारक होणार असल्याचे सांगण्यात आले. प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी ही पाहणी महत्त्वाची मानली जात असून, भविष्यातील विकासकामांना यामुळे अधिक गती मिळेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला.

# जिल्ह्याच्या पिकविमा प्रश्न कृषीमंत्र्यांच्या दालनात

## आ. किसन वानखेडे यांचा पाठपुरावा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी मागील काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश्य परिस्थिती आणि सततच्या उत्पादन घट यामुळे मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणारी पिक विमा योजना ही अत्यंत महत्त्वाची ठरते. मात्र यंदा यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदतीच्या यादीतून वगळण्यात आल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

यापूर्वी मुंबई येथे मा. मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन जिल्ह्याच्या परिस्थितीची सविस्तर माहिती मांडली होती. यवतमाळ हा कृषिप्रधान जिल्हा असून येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांवर अवलंबून आहेत. हवामानातील बदल, अतिवृष्टी, पावसाचा खंड आणि कीडग्रस्त परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर आज मुंबई येथे राज्याचे कृषिमंत्री माननीय नामदार श्री. दत्ता मामा भरणे यांची आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीदरम्यान यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदत यादीत समाविष्ट करून तातडीने मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील हजारो शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून शासनाच्या मदतीची त्यांना अत्यंत गरज आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे आमदारांनी यावेळी स्पष्ट केले. आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी कृषिमंत्र्यांसमोर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची वास्तविक परिस्थिती मांडताना अनेक गावांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आणून दिले. पिक विमा योजनेचा मूळ उद्देश हा नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार देणे हा आहे. त्यामुळे यवतमाळ जिल्ह्याला मदतीपासून वंचित ठेवणे अन्यायकारक ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी मंत्री महोदयांनी पिक विमा संदर्भातील तांत्रिक अडचणी दूर करून यवतमाळ जिल्ह्याला न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, असे अभिवचन दिले. यावेळी शेतकऱ्यांच्या भावना आणि अपेक्षा शासनापर्यंत पोहोचवत, "माझ्या शेतकरी बांधवांना न्याय मिळालाच पाहिजे," अशी ठाम भूमिका आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी मांडली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपण सदैव कटिबद्ध असून त्यांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहील, असा विश्वास त्यांनी जिल्ह्यातील जनतेला दिला. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आता शासनाच्या निर्णयाकडे आशेने पाहत आहेत. पिक विमा मदत जाहीर झाल्यास हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. शासनाने शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशीच सर्वसामान्य शेतकरी बांधवांची अपेक्षा आहे.

# थकित मानधन अदा करा

## जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आशा संघटनेचे निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - आयटक महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना जिल्हा शाखा यवतमाळ वतीने मा.जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे यवतमाळ जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांना केंद्राचे मानधन सात आठ महिन्यांपासून थकले आहे त्यामुळे आशा स्वयंसेविकांना उपासमार सोसावी लागत आहे आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत आहे त्यामुळे थकीत मानधन तातडीने अदा करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे आयटक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात जुलै २०२५ पासून मानधन थकीत आहे तर बाकी १५ तालुक्यात ऑक्टोबर २०२५ पासून थकीत आहे.

१२ नोव्हेंबर २०२५ ला निघालेल्या शासन परिपत्रकात ऑक्टोबर २०२५ पर्यंतचे मानधन आधीच राज्य स्तरावरून जिल्हाला अनुदान निधी अदा करण्यात आला आहे असे म्हटले आहे. त्यामुळे आशा स्वयंसेविकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.शासनाने ऑक्टोबर पर्यंतचा अनुदान निधी आधिच दिला असतांना मग उमरखेड तालुक्यात जुलै २०२५ पासून मानधन थकीत कसे राहिले आहे. तसेच उर्वरित १५ तालुक्यात ऑक्टोबर महिन्यापासुन मानधन थकीत कसे राहिले आहे.असा प्रश्न जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका करीत आहे. शासनाने जिल्हाला ऑक्टोबर पासूनचा अनुदान निधी आधिच दिला असतांना आशा स्वयसेवीकांना मात्र ऑक्टोबर पर्यंत मानधन अदा करण्यात आलेले नाही. ही बाब अन्याय कारक असुन यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात जुलै २०२५ पासून मानधनाची थकबाकी रक्कम तर उर्वरित १५ तालुक्यात ऑक्टोबर २०२५ पासूनची थकबाकी रक्कम अदा करण्यात यावी , अशी मागणी संघटनेने केली आहे तसेच सर्व प्रकारचे थकीत मानधन दि.३१ मे २०२६ पर्यंत अदा करण्यात यावे जर ३१ मे पर्यंत मानधन अदा करण्यात आले नाही तर दि.०१ जुन २०२६ पासून जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका नाईलाजास्तव संपावर जाणार आहे. असे म्हटले आहे. गेल्या सात आठ महिन्यांपासून मानधन असल्यामुळे जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांचे थकीत मानधन अदा करण्यात येवून मागणी निकाली काढण्यात यावी अशी विनंती निवेदनाद्वारे केलेली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ८० टक्के मतदार कोट्यावर दिग्गजांची नजर

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या हालचालींना वेग
## जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले

**अमरावती/का.प्र.**

विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था आणि मतदार संघटनेच्या निवडणुकांसंदर्भात जिल्ह्यात राजकीय हालचाली पुन्हा एकदा तीव्र झाल्या असून, या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. आवश्यक मतदार कोट्यापैकी ७५ टक्क्यांहून अधिक, म्हणजेच अंदाजे ८० टक्के मते उपलब्ध असल्याने अमरावती जिल्हा परिषदेच्या निवडणुका न घेता या निवडणुका घेण्याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघटनेचा कार्यकाळ जून २०२४ मध्ये संपला. याच मतदार संघटनेचे प्रवीण पोटे हे २२ जून २०१२ ते २१ जून २०२४ पर्यंत विधान परिषदेत आमदार म्हणून कार्यरत होते. तथापि, ओबीसी आरक्षणासह विविध कारणांमुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुका प्रलंबित आहेत, ज्यांना अनेक ठिकाणी चार ते साडेतीन वर्षांचा विलंब झाला आहे.प्रशासकांचे शासन चार वर्षे चालले. परिणामी, विधान परिषदेची ही जागा जवळपास दोन वर्षांपासून रिक्त आहे. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानुसार, महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका पूर्ण झाल्या आहेत.

अमरावती मतदार संघात, जिल्हा परिषद वगळता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्या असून, सध्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी ४५४ मतदार उपलब्ध आहेत. ५९ जिल्हा परिषद सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे मतमोजणी अपूर्ण असली तरी, निवडणुकीसाठी आवश्यक असलेली किमान संख्या कायम आहे. ७५ टक्के आरक्षणाची पूर्तता होत असल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांशिवाय




विधान परिषदेच्या निवडणुका घेण्यासाठी सरकारने न्यायालयाकडे परवानगी मागितली असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. असा निर्णय झाल्यास, अमरावती विधान परिषदेच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.संभाव्य निवडणुकीच्या चर्चेमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, विविध पक्षांनी इच्छुक उमेदवारांची हालचाल वाढवली आहे. आता राज्य सरकार आणि न्यायालय कोणती भूमिका बजावतील?

**विधान परिषदेचा मतदार संख्या**

| | |
|---|---|
| अमरावती महानगरपालिका | ९५ |
| अंजनगाव सुर्जी नगरपरिषद | २९ |
| दयापूर नगरपरिषद | २६ |
| धामणगाव रेल्वे नगरपालिका परिषद | २१ |
| मोर्शी नगरपरिषद | २५ |
| वरूड नगर परिषद | २७ |
| शेंदूरजनाघाट नगर परिषद | २१ |
| अचलपूर नगरपरिषद | ४२ |
| चांदूर बाजार नगरपरिषद | २१ |
| चांदूर रेल्वे नगरपरिषद | २१ |
| चिखलदरा नगर परिषद | २१ |
| धारणी नगर पंचायत | १८ |
| नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत | १८ |
| तिवसा नगर पंचायत | १७ |
| भातकुली नगर पंचायत | १७ |
| एकूण स्वीकृत नगरसेवक | ३५ |
| **एकूण मतदार** | **४५४** |

# महावीर नगरात वारंवार वीजपुरवठा खंडित

## नागरिक संतप्त; महावितरणच्या अभियंता यांना निवेदन

## आंदोलनाचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

शहरातील महावीर नगर सूतगिरणी प्रभाग क्रमांक २० येथे मागील २० ते २५ दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवार वीज खंडितीच्या समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येबाबत परिसरातील नागरिकांनी एकत्र येत महावितरण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करून तात्काळ कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, नवा ते पावा स्टेशन लाईनमध्ये सतत तांत्रिक बिघाड होत असल्याने दिवसातून तब्बल १५ ते २० वेळा वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून घरगुती कामकाज, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच लघुउद्योगांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अचानक वीज जाण्याच्या प्रकारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना उकाड्यात मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे.



वारंवार होणाऱ्या व्होल्टेज चढ-उतारामुळे घरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान होण्याची भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे. या समस्येबाबत अनेक वेळा संबंधित कार्यालयात तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

महावितरण विभागाने नवा ते पावा स्टेशन लाईनची तातडीने तांत्रिक तपासणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी व महावीर नगर परिसरातील सुरळीत वीजपुरवठा त्वरित सुरू करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा परिसरातील नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

सदर निवेदनावर महावीर नगर सूतगिरणी प्रभाग क्र. २० येथील समस्त नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून निवेदन सादर करताना रोशन भुरे, सार्थक मांगळकर, आकाश ढवाले, गौरव मोहोळ, हेमंत पटेल, अमित भेर्डे, प्रशात भुरे, अभि शिरभाते, मंथन मूगळकर, कृनाल सवई, अभि वाघमारे, ओम गावडे, वृषभ वासनकर, हिमांशू बंड, हेमंत पटेल,यांच्यासह महावीर नगर प्रभागातील अनेक नागरिक यावेळी उपस्थित होते.

# खल्लार पोलीस ठाण्यातील सहा बेवारस वाहनांचे क्रमांक जाहीर

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक पोलीस ठाण्यात बेवारस (लावारिस) रजिस्टरमध्ये नोंद असलेल्या एकूण सहा वाहनांची यादी खल्लार पोलिस स्टेशन, अमरावती ग्रामीण यांनी जाहीर केली आहे. या वाहनांवर अद्यापपर्यंत कोणीही मालकी हक्क सांगितलेला नसल्याने, मूळ वाहन मालकांचा शोध घेण्यासाठी आणि या वाहनांची कायदेशीर विल्हेवाट लावण्यासाठी पोलिसांनी ही माहिती प्रसिद्ध केली आहे.पोलिसांनी दिलेल्या तपशिलानुसार, जप्त केलेल्या वाहनांमध्ये टीव्हीएस कंपनीची दुचाकी (वाहन क्रमांक MH २७AE ०२०७, हिरो पॅशन प्रो (वाहन क्रमांक MH २७ AY ५१३४), बजाज पल्सर (वाहन क्रमांक MH ३१ BX १७२९), हिरो होंडा (वाहन क्रमांक MH ३० G १०१४), ऑटो रिक्षा (वाहन क्रमांक MH ३० P ८९५६) आणि एक चारचाकी लोडिंग वाहनाचा (वाहन क्रमांक MH २७ AX ५४) समावेश आहे.सदर वाहने ज्यांच्या मालकीची आहेत किंवा ज्या नागरिकांची या क्रमांकाची वाहने चोरीला गेली आहेत, त्यांनी आपल्या वाहनांची मूळ कागदपत्रे आणि योग्य कायदेशीर पुराव्यांसह तातडीने खल्लार पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. विहित मुदतीत कोणीही हक्क न सांगितल्यास, या सर्व बेवारस वाहनांची कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून विल्हेवाट लावली जाईल, असे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# सातेगाव-वनोजा बाग 'मातोश्री पांदण रस्त्याचे' काम अपूर्ण

## शेतकऱ्यांनी पालकमत्र्यांना दिले निवेदन



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालुक्यातील सातेगाव-वनोजा बाग येथील शेत गट क्रमांक ४७५ ते ५४२ मधील रखडलेल्या 'मातोश्री पांदण रस्ता' योजनेच्या कामावरून स्थानिक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे हे काम प्रदीर्घ काळापासून अपूर्ण अवस्थेत असून, हताश झालेल्या शेतकऱ्यांनी पालकमत्री यांना थेट निवेदन देऊन हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याची आर्त हाक दिली आहे.

शेतकऱ्यांचा शेतमाल वेळेवर बाजारपेठेत पोहोचून त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने 'मातोश्री पांदण रस्ता' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सातेगाव ते चिंचोली बु. दरम्यानच्या पांदण रस्त्याचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, काम सुरू असताना काही शेतकऱ्यांनी कामाला विरोध दर्शवून रस्ता थांबविण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी परिसरातील इतर शेतकऱ्यांनी आणि गावकऱ्यांनी सामोपचाराने मध्यस्थी केली.गावकऱ्यांनी समजूत काढल्यानंतर कंत्राटदाराला काम पूर्ववत सुरू करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यावेळी कंत्राटदाराने अपूर्ण राहिलेल्या रस्त्यावरील शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या. 'मी हा पांदण रस्ता पूर्ण करून देतो' अशी स्पष्ट हमी (हमीपत्र) कंत्राटदाराने शेतकऱ्यांना दिली होती. मात्र, या आश्वासनाला प्रदीर्घ काळ लोटूनही कंत्राटदाराने अद्याप रस्त्याचे काम पूर्ण केलेले नाही.सध्या उन्हाळा संपत आला असून पावसाळा तोंडावर आहे. हा रस्ता अपूर्ण राहिल्यामुळे पावसाळ्यात शेतात जाणे पूर्णपणे असंभव होणार आहे. प्रशासनाकडून दाद न मिळाल्याने अखेर शेतकऱ्यांनी थेट मंत्र्यांचे उंबरठे झिजवत ९ मे रोजी लेखी निवेदन सादर केले आहे.लोकप्रतिनिधी आणि संबंधित वरिष्ठ मंत्रालयाने या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन कंत्राटदाराला रखडलेले काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, अन्यथा शेतकऱ्यांना तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा सर्जेराव घोगरे, ग्रामपंचायत सदस्य गोपाल कोल्हे, हरिदास मूरे यांच्यासह समस्त गावकरी मंडळींनी दिला आहे.

# ग्रीष्मकालीन क्रीडा शिबिराचा समारोप

## ३०० खेळाडूंनी घेतले क्रीडा व मानसिक विकासाचे धडे

**अमरावती/का.प्र.**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती आणि एकविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १० दिवसीय ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा जिल्हा क्रीडा संकुल, मार्डी रोड येथे दिमाखात समारोप झाला. २ ते १२ मे दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल (तपोवन चौक) व श्रीमती नरसम्मा महाविद्यालय (किरण नगर) येथे सकाळ व संध्याकाळ अशा दोन सत्रांत हे शिबिर पार पडले. यात तब्बल ३०० प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध खेळांचे कौशल्य आत्मसात केले.



शिबिरात खेळाडूंच्या शारीरिक विकासासोबतच मानसिक स्वास्थ्यावरही विशेष भर देण्यात आला. स्पोर्ट्स न्यूट्रिशनिस्ट डॉ. तुषार आंबेडकर यांनी खेळाडूंना पोषक आहाराचे महत्त्व पटवून दिले. योग व झुंबा शिक्षिका श्रीमती कविता शेंडे यांनी ध्यान व व्यायामाचे प्रात्यक्षिक घेतले, तर 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या सविता मोटवाणी यांनी खेळाडूंचे मन एकाग्र करण्याचे आणि पंचज्ञानेंद्रिये कार्यान्वित करण्याचे धडे दिले.समारोप कार्यक्रमाला सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक संजय अढाऊ, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल इंगळे, क्रीडा कार्यकारी अधिकारी ममता कोळमकर आणि राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू रोशन पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट सहाय्यक प्रशिक्षक व उत्कृष्ट खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. संजय अढाऊ यांनी खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत जास्तीत जास्त वेळ मैदानावर सराव करण्याचे आवाहन केले.

प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी आपल्या प्रास्ताविकात क्रीडा विभागाच्या विविध योजना, ५ टक्के खेळाडू आरक्षण, क्रीडा गुण सवलत आणि 'मिशन लक्षवेध' याविषयी माहिती दिली. तसेच, मुलांनी आधुनिक मोबाईलच्या दुष्परिणामांपासून दूर राहून किमान एक तास मैदानावर घाम गाळावा आणि एका खेळाची निवड करून सराव करावा, असा सल्ला दिला. कार्यक्रमाचे संचालन स्वप्नील चांदेकर तर आभार प्रदर्शन आशिष पाटील यांनी मानले.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवेचा शुभारंभ

**अमरावती/का.प्र.**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक तसेच गट कर्ज योजनांतील लाभार्थ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'व्हॉट्सॲप चॅटबॉट' सेवा सुरू करण्यात आली आहे. `One Click Information' या विशेष संकल्पनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या या सुविधेमुळे आता लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जासंबंधित संपूर्ण माहिती आणि विविध प्रक्रियांची सद्यस्थिती थेट व्हॉट्सॲपवर तत्काळ प्राप्त होणार आहे.

या अत्याधुनिक सुविधेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ८९७६८५५९२१ या क्रमांकावर 'Hi' असे लिहून पाठवायचे आहे. हा मेसेज पाठवताच लाभार्थ्यांसमोर एक मेनू उपलब्ध होईल, ज्यामध्ये महामंडळ व योजनांची माहिती, नवीन नोंदणी संदर्भातील मार्गदर्शन, पात्रता प्रमाणपत्र स्थिती व ते डाउनलोड करण्याची सुविधा, बँक कर्ज मंजुरी स्थिती आणि व्याज परतावा दावा स्थिती यासारखे पर्याय मिळतील. सुरक्षा लक्षात घेता या सर्व सेवा ओटीपी आधारित पडताळणीद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, अर्जाच्या विविध टप्प्यांच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षण व्हिडिओ आणि तांत्रिक अडचणी नोंदवण्यासाठी 'तिकीट जनरेशन' सुविधाही यात अंतर्भूत आहे. आगामी काळात थेट व्हॉट्सॲपवरूनच एल.ओ.आय. अर्ज प्रक्रिया उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू असून, सर्व लाभार्थ्यांनी या डिजिटल साधनांचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन जिल्हा समन्वयक रोहित मोंढे यांनी केले आहे.

# शिक्षकांच्या सपाटीवरील समायोजनाचा प्रश्न ऐरणीवर

## शिक्षण विभागाच्या दुटप्पी भूमिकेविरुद्ध रोष

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्हा परिषद शिक्षकांच्या सपाटीवरील (नॉन-पेसा क्षेत्र) समायोजनाच्या प्रक्रियेवरून अमरावतीत पुन्हा एकदा संघर्ष पेटला आहे.आंतरजिल्हा बदलीने आलेल्या ४२ शिक्षकांचे समायोजन प्रलंबित असतानाच, शिक्षण विभागाने ७ व्या टप्प्यातील ९७ शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया सुरू केल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. या विरोधात मुख्य याचिकाकर्ते महेश ठाकरे यांनी शिक्षण विभागाविरुद्ध उच्च न्यायालयात 'अवमान याचिका'दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

न्यायालयाचे आदेश डावलले मागील वर्षी आंतरजिल्हा बदलीने जिल्ह्यात आलेल्या ४२ शिक्षकांना प्रशासनाने 'पेसा' क्षेत्रात समाविष्ट केले होते. याविरुद्ध शिक्षकांनी न्यायालयात धाव घेतली असता, नोव्हेंबर २०२५ च्या सुनावणीत त्यांना 'नॉन-पेसा' (सपाटीवर) क्षेत्रात समाविष्ट करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.



शिक्षण विभागाने त्यावेळी बदली प्रक्रिया झाली नसल्याचे कारण देत या ४२ शिक्षकांचे समायोजन टाळले होते. मात्र, आता ७ व्या टप्प्यातील ९७ शिक्षकांची बदली रद्द करून त्यांना सपाटीवर आणण्याची प्रक्रिया तातडीने सुरू केली आहे. या दुटप्पी भूमिकेमुळे मूळ याचिकाकर्त्या शिक्षकांवर अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाली आहे.

[illegible] समायोजन: ७ व्या टप्प्यातील शिक्षकांना पदस्थापना देण्यापूर्वी, न्यायालयाच्या आदेशानुसार आंतरजिल्हा बदलीने आलेल्या ४२ याचिकाकर्त्या शिक्षकांचे सपाटीवरील रिक्त पदांवर समायोजन करावे.पारदर्शक प्रक्रिया: १० मे २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदांवर स्थानिक अनुसूचित जमातीची भरती करून बिगर-आदिवासी शिक्षकांना तत्काळ मूळ प्रवाहात आणावे.तातडीची कार्यवाही: प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास, न्यायालयाचा अवमान झाल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई केली जाईल.याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. अमरावती) आणि प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग) यांना अधिकृत स्मरणपत्र पाठवण्यात आले असून, संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षक समुदायाचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील पाऊलाकडे लागले आहे.

## संक्षिप्त

### गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता सभापतींचा पुढाकार



**अमरावती** - महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी गुणवत्तेही पुढे असल्याचे दिसून येत असून इयत्ता दहावीच्या निकालामध्ये महानगरपालिकेत शाळांनी बाजी मारली असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये काही शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून १४ माध्यमिक शाळा मधील अधिक टक्केवारी घेऊन गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा नुकतीच शिक्षण सभापती प्रीतीताई रेवणे यांनी शाळेत जाऊन सत्कार केला. तसेच विद्यार्थिनींना पुढील भविष्यासाठी व प्रगतीसाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन सुद्धा केले.इयत्ता दहावी मध्ये केवळ शिक्षकांच्या अध्यापन मार्गदर्शनाच्या भरोशावर व स्वतः घेतलेल्या मेहनतीच्या भरोशावर ज्या मुलींनी ९०३ पेक्षा जास्त गुण प्राप्त केले अशा दोन विद्यार्थिनी कुमारी मोमीना तनवीर अहमद तस्किन , अलीना उरूज अब्दुल मतीन यांचा जमील कॉलनी हायस्कूल येथे कार्यक्रमावेळी शिक्षण सभापती प्रीती रेवणे , शाळा निरीक्षक योगेश पखाले, मुख्याध्यापक अब्दुल सईद , हाफिझ सर , समिना सुलताना, अरशिया कौसर, शाळा व्यवस्थापन समिती मधील डॉक्टर झाहिद नय्यर, सादिक सर, आतीक सर,सिद्दिकी मॅडम, दुरे शेहवार मॅडम व पालकांच्या उपस्थितीमध्ये पुष्पगुच्छ देऊन सत्कार पार पडला. अतिशय गरीब कुटुंबातील विद्यार्थिनींनी शिक्षण क्षेत्रात आपल्या मेहनतीच्या जोरावर घेतलेल्या गरुड झेप बद्दल शिक्षण सभापती यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक यावेळी केले.

### पालकमंत्र्यांचा शनिवारी जिल्हा दौरा



**अमरावती**-पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शनिवार, दि. १६ मे रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.दौऱ्यानुसार, श्री. बावनकुळे यांचे शनिवार, दि. १६ मे रोजी सकाळी ९.४५ वाजता दर्यापूर हेलिपॅडवर आगमन होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता दर्यापूर उपविभागीय कार्यालय येथे आढावा बैठकीला उपस्थित राहतील. दुपारी १ वाजता अमरावती येथे जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा सभेला उपस्थित राहतील. तसेच दुपारी ३ वाजता अमरावती जिल्हा परिषद कार्यालय सभागृहात बैठक घेतील. त्यानंतर दुपारी ५.३० वाजता अमरावती येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

### राजेश्वरी राठोड जिल्ह्यातून द्वितीय



**अमरावती**-बारावी सीबीएसई परीक्षेच्या निकालात विद्यार्थिनी राजेश्वरी राठोड हिने जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावत पी .आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.राजेश्वरी राठोड हिने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाचे नाव राज्यभर उज्ज्वल झाले असून विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी राजेश्वरीचे विशेष कौतुक करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### एमएसएमई राष्ट्रव्यापी क्रेडिट आउटरीच कार्यक्रम


**अमरावती**-जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी एक विशेष संधी उपलब्ध झाली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने शनिवार१६ मे २०२६ रोजी दुपारी वाजता परतवाडा येथील सोसियल -३ रा मजला, अर्धसैनिक कँटीन, विदर्भ हाऊसिंग बोर्ड, हरडे नगर येथे 'एमएसएमई राष्ट्रव्यापी क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुंबईच्या उपमहाव्यवस्थापक श्रीमती प्रीती सारस्वत उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षपद पंकज गुप्ता भूषवतील. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी होणाऱ्या पात्र उद्योजकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांची सविस्तर माहिती मिळण्यासोबतच, 'इन-प्रिन्सिपल सँक्शन लेटर' (तत्त्वतः मंजुरी पत्र) जागेवरच उपलब्ध करून दिले जाणार आहे.सेंट्रल बँकेच्या विशेष 'एमएसएमई महोत्सवा'अंतर्गत केवळ १६ मे रोजी कर्ज घेणाऱ्या व्यावसायिकांना बाजारातील सर्वात कमी व्याजदर आणि प्रक्रिया शुल्कात मोठी सवलत दिली जाणार आहे. याशिवाय, नवउद्योजकांसाठी उद्यम नोंदणी, जीएसटी अनुपालन आणि इतर व्यावसायिक कायदेशीर बाबींवर तज्ज्ञांद्वारे मोफत मार्गदर्शन केले जाईल. अमरावती आणि परतवाडा परिसरातील जास्तीत जास्त व्यावसायिक आणि उद्योजकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.

### पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**अमरावती**-सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार १९ मे रोजी 'पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, डेपो रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.मेळाव्याबाबत काही अडचण असल्यास उमेदवारांनी कार्यालयाच्या ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९ किंवा ८६०५६५४०२५ या क्रमांकावर किंवा amravatirojgar@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा. जिल्ह्यातील गरजू आणि पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा.

### शेषराव राऊत यांचे निधन

**अंजनगाव बारी/वार्ताहर**



अंजनगाव बारीतील जेष्ठ नागरिक तसेच ग्रामपंचायत माजी लिपीक व निदानजी महाराज संस्थानचे माजी सचिव शेषराव तुकाराम राऊत (वय ९२ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने १३ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले व नातूपंतू असा मोठा आप्त परिवार आहे.ते माजी कॉंग्रेस उपाध्यक्ष व पत्रकार साहेबराव राऊत यांचे तसेच ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी युवराज राऊत यांचे वडील होते. त्याच्यावर १४ रोजी हिंदू स्मशानभूमी अंजनगाव बारी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

**आज देशावर आलेल्या आर्थिक संकटाला दूर करायचे असेल तर देशातील सर्व जनतेनी एकमतांनी एकत्रित येणे आवश्यक आहे. नाहींतर देशात अराजक स्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.**



# पंतप्रधानांचे आवाहन आणि विरोधी पक्षांचे बंड

✍डॉ. दुर्गेश साठवणे

इराण, अमेरिका आणि इस्त्राईल यांचे युद्ध सुरु असले तरी युद्धाचे सर्वदूर परिणाम संपूर्ण जगावर पडले आहे. प्रत्यक्षात अन्य राष्ट्रे या युद्धात सहभागी नसले तरी आंतराष्ट्रीय व्यापारावर प्रामुख्याने याचे दूरगामी परिणाम पडलेले दिसून येते. अशा बिकट स्थितीत जी राष्ट्रे आर्थिक कमकुवत आहेत त्यांची पडता भुई थोडी झाली असून व्यापार मार्गात अडसर निर्माण झाल्याने अनेक राष्ट्रांना आर्थिक बाबतीत टोकाची भूमिका घ्यावी लागली आहे. प्रसंगी ही भूमिका घेताना देशातील नागरिकांचा विरोध देखील तिथल्या सरकारला सहन करावा लागत आहे. भारत शेजारील पाकिस्तान, श्रीलंका यांचे आर्थिक दृष्ट्या कंबरडे मोडले असून तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. आखाती राष्ट्रांमधून होर्मुझ च्या सामुद्रधूनीच्या मार्गे संपूर्ण विश्वाला तेलाचा पुरवठा होतो परंतु या मार्गावर अनेक प्रकारचे निर्बंध लादल्या गेले आहे. प्रामुख्याने तेलाच्या आयातीवर याचे परिणाम पडल्याने जवळपास सर्वच आशियाई राष्ट्रांनी देशांतर्गत इंधन दरवाढ व नागरिकांना जीवनयापन करताना काटकसरीचे आवाहन केले आहे.

अशातच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक आर्थिक संकटाची स्थिती लक्षात घेता भारतीय जनतेला, परकीय चलन वाचवण्यासाठी येणाऱ्या एक वर्षात सोन्याची खरेदी टाळणे. प्रवास करतांना शक्यतोवर सार्वजनिक साधनांचा वापर करणे. जास्तीत-जास्त पेट्रोल-डीझेल ची बचत करणे किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविणे. स्वदेशी वस्तूंचा वापर वाढविणे. शक्य होईल तिथे वर्क फ्रॉम होम, व्हर्च्युअल मिटिंग यांचा उपयोग करणे, खाद्य तेलाचा ठराविक व मोजका वापर करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या आवाहनावर देशातील विरोधी पक्षाने मात्र ताशेरे ओढले असून देश चालवण्यात सरकार अपयशी ठरल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यातून देशात एक वादंग निर्माण झाल्याचे चित्र दिसत असून जनतेच्या मनात भ्रमाची स्थिती उत्पन्न झाल्याचे दिसून येते. परंतु विश्वात सुरु असलेल्या युद्धजन्य परिस्थितीत विरोधी पक्षाचे हे वागणे योग्य आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. राजकारणात विरोध -प्रतिरोध हे नेहमीचं होत असतात परंतु युद्धजन्य परिस्थितीत देश आर्थिक संकटाच्या सावटाखाली असतांना विरोधी पक्षांचे हे वागणे म्हणजे राजकीय दिवाळखोरीचे म्हणावी लागेल.

पंतप्रधानांनी पहिल्यादांच असे आवाहन केले असे नाही या आधी सुद्धा वर्तमानातील विरोधी पक्ष सत्तेत असतांना अनेकदा असे आवाहन करण्यात आले. १९६० -७० च्या काळात अन्नटंचाई, युद्धखर्च आणि आर्थिक ताणामुळे सरकारने आयात कमी करण्यासाठी जनतेला खर्चावर नियंत्रण आणि साधेपणाचे आवाहन केले होते. १९९१ मध्ये देशावर भीषण परकीय चलन संकट आले होते त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिम्हा राव आणि अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंह यांनी सरकारी खर्चात काटकसर, आर्थिक सुधारणा आणि अनावश्यक खर्च कमी करण्याचे आवाहन केले होते. २००८ मध्ये जागतिक मंदीच्या संकटात सरकारी विभागांना खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. २०१२ -१३ च्या काळात भारत आर्थिक तुटीचा सामना करत होता त्यावेळी सुद्धा तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह व अर्थमंत्री पी.बी.चिदंबरम यांनी जनतेला सहा महिने ते एक वर्षापर्यंत सोने न खरेदी करण्याचे आवाहन केले होते. मग वर्तमान युद्धजन्य परिस्थितीत भारतीय पंतप्रधान जनतेला काटकसरीचे आवाहन करत असतांना विरोधी पक्षांनी विरोधातून राजकीय पोळी भाजणे कितपत योग्य आहे याचे आत्मपरीक्षण सुद्धा विरोधी पक्षांनी करणे आवश्यक आहे. देशाला काटकसरीचे आवाहन करतांना पंतप्रधान विदेश दौरे का करतात असा प्रश्न विरोधी पक्षांनी उभा केला आहे. त्यांना हे माहित असतांना देखील की युद्धजन्य स्थितीचा सामना करण्यासाठी परराष्ट्रीय धोरण मजबूत असणे आवश्यक आहे किंवा त्यात प्रासंगिक बदल करावे लागतात. हे करत असतांना देशाचे नेतृत्व करणाऱ्या पंतप्रधानांना अन्य राष्ट्रांचे दौरे करावेचं लागतील असे न केल्यास राष्ट्र अधिक तळाला जाण्याची संभावना नाकारता येणार नाही. मग पंतप्रधानांच्या विदेश दौऱ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे म्हणजे निरर्थक आणि तथ्यहीनच म्हणावे लागेल. यावेळी सरकारनी सुद्धा हे लक्षात घेणे आवश्यक आहे की नेत्यांनी सुद्धा त्यांच्या आवाजवी खर्चावर निर्बंध लावावे, व्हीआयपी कल्चर चा वापर टाळावा. त्यांच्या वागण्यातून जनतेला मार्गदर्शन मिळेल यासाठी प्रयत्न करावे नाही तर हे असं होणार 'लोका सांगे ब्रम्हज्ञान, आपण कोरडे पाषाण'

विरोधी पक्षांनी देखील आर्थिक संकटाच्या काळात राजकीय संधीचा लाभ न घेता राष्ट्रहित सर्वपरी ह्या भावनेनी सरकारच्या पाठीशी उभे राहावे. कारण घरची आर्थिक स्थिती ज्यावेळी कमकुवत असते त्यावेळी कुटुंबप्रमुख घरच्या सदस्यांना काटकसरीचे आवाहन करतो आणि त्याच्या आवाहनाचे घरचे सदस्य पालन करतात. आज देशावर आलेल्या आर्थिक संकटाला दूर करायचे असेल तर देशातील सर्व जनतेनी एकमतांनी एकत्रित येणे आवश्यक आहे. नाहींतर देशात अराजक स्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

नागपूर
मो.८२०८०६८८५३

# आर्थिक शिस्त

✍लीना गाडगीळ

जग एका नव्या आर्थिक आणि भूराज कीय वळणावर उभे आहे. अमेरिका- इराण, इजरायल - हमास, पाकिस्तान -अफगाणिस्तान, रशिया- युक्रेन यांच्यात युद्धाची धग अद्यापही चालूच आहे. छोट्याशा ठिणगीतून तिसऱ्या महायुद्धाला कधीही आरंभ होऊ शकतो इतकी अनिश्चितता आहे. गेल्या काही दशकात जागतिकरण, मुक्त व्यापार, तंत्रज्ञान आणि वेगवान अर्थवाढ यांच्या जोरावर जगाने अभूतपूर्व प्रगती अनुभवली आहे परंतु या प्रगतीसह एक मोठे वास्तवही समोर आले आहे ते म्हणजे जगातील प्रत्येक देश आता परस्परांशी इतका जोडला गेला आहे की एखाद्या प्रदेशात निर्माण झालेले संकट सहस्त्र किलोमीटर दूर असलेल्या सामान्य नागरिकाच्या आयुष्यालाही हादरा देऊ शकते मग ते युद्ध असो एखादी महामारी.

अमेरिका -इराण यांच्यातील तणावामुळे हार्मुझ समुद्रधुनीवर निर्माण झालेले संकट आणि जागतिक तेल बाजारातील अस्थिरता याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. मुत्सद्देगिरीच्या जोरावर थोडीफार इंधनाची आयात चालू असली तरी ती कधीही थांबू शकते आणि त्याचा थेट परिणाम भारतीयांच्या दैनंदिन जीवनावर होऊ शकतो. हे जाणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचत, एक वर्षासाठी सोन्याची खरेदी न करणे, रासानिक खातंचा वापर कमी करणे, विदेश गमन ण करणे आणि वर्क फ्रॉम होम ही पद्धत पुन्हा एकदा स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. हे आवाहन वरकरणी साधे वाटू शकते पण प्रत्यक्षात एका मोठ्या आर्थिक संघर्षाची पूर्व सिद्धता आहे.

पेट्रोल आणि डिझेल यांचा वार्षिक खर्च १३ लाख ३० हजार कोटी रुपये, खाद्य तेलाचा वापर वापराचा खर्च १ लाख ६५ हजार कोटी रुपये, सोने खरेदीवर ४ लाख १० हजार कोटी रुपये, रसायनिक खताचा वापर २ लाख ५० हजार कोटी रुपये, परदेशात पर्यटन आणि परदेशी वस्तूंची खरेदी यावर १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपये खर्च होतात. जर जनतेने पंतप्रधानांनी केलेल्या आव्हानाचे पालन केले तर भारताच्या परकीय चलनाची बचत होईल कारण या सर्व वस्तू परदेशातून आयात कराव्या लागतात. करोना महामारी मुळे लागू झालेल्या दळणवळण बंदीच्या काळात भारताने शिस्त आणि संयम बाळगला होता. आज पुन्हा हीच मुल्ये अंगी बाणावयाला लागणार आहेत. कोरोना महामारीच्या काळात संकट जीवावर आले होते आता आजचे संकट खिशावर आले आहेत.


गेल्या दोन-तीन दशकात भारतात उपभोगवाद वाढला आहे. मोठमोठी आलिशान वाहने, विवाह समारंभ, वाढता इंधन वापर, विलासी जीवनशैली आणि सतत वाढत जाणारी ग्राहक संस्कृती ही आधुनिक भारताची ओळख बनत चालली आहे पण युद्धासारख्या जागतिक संकटांनी हे दाखवून दिले आहे की अमर्याद उपभोगाची सवय कोणत्याही राष्ट्राला दीर्घकाळ चालू ठेवणे उपयोगाचे नाही. मानवाच्या सोयीसाठी निर्माण झालेल्या सुविधांचे आता चैनीत रूपांतर झाले आहे. खाजगी वाहन, वातानुकूलित जीवनशैली, सहलीनिमित्त विदेश दौरे, मोठे विवाह समारंभ आणि ब्रॅण्डेड वस्तूंचा पेहराव या गोष्टी प्रतिष्ठेच्या मापदंडात पालटल्या आहे. पेट्रोल डिझेल महाग झाले की वाहतूक महागते. वाहतूक महागली की, अन्यधान्य, भाजीपाला, औषधे, बांधकाम साहित्य, उद्योग उत्पादन आणि दैनंदिन जीवनातील प्रत्येक वस्तू महाग होते आणि त्यामुळे मध्यमवर्गीयांचे अर्थकारण कोलमडते. उद्योगांची स्पर्धात्मकता कमी होते. सरकार वरील आर्थिक ताण वाढतो, रुपयावर दाब येतो आणि पुढे परकीय चलन साठ्यावर ताण निर्माण होतो म्हणूनच पंतप्रधानांनी दिलेला संदेश समजून घेणे आवश्यक आहे. भारत विकासाची शिखरे गाठत आहे, याचा प्रत्येकालाच अभिमान आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात पंतप्रधानांनी नैसर्गिक शेतीकडे वळा, रासायनिक खतांवर अवलंबून राहू नका, स्वदेशी वस्तूंच्या वापर करा या आव्हानाला आत्मसात करून पुन्हा मूळ भारतीय परंपराकडे जाण्याची आवश्यकता लक्षात घ्यायला हवी.

आवश्यकता आणि चैन यामधील सीमारेषा आपण ओळखू शकतो का? भारतातील मध्यमवर्ग गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात कर्जाधारित जीवनशैलीकडे वळला आहे. घरकर्ज, वाहनकर्ज, वैयक्तिक कर्ज आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे यामुळे लोकांचे उत्पन्न आणि खर्च यामधील समतोल बिघडत चालला आहे. अशावेळी इंधनदर आणि महागाई वाढली तर सामान्य नागरिकांवर प्रचंड आर्थिक ताण येऊ शकतो. याच कारणामुळे सरकार नागरिकांना आधीच सावध करत आहे. इंधन बचत म्हणजे केवळ पैसा वाचवणे नाही तर राष्ट्रीय आर्थिक स्थैर्य जपणे आहे. सोन्याची खरेदी टाळणे म्हणजे केवळ व्यक्तिगत त्याग नाही तर परकीय चलन साठा वाचवण्याचा प्रयत्न आहे. वर्क फ्रॉम होम स्वीकारणे म्हणजे केवळ सोय नाही तर राष्ट्रीय ऊर्जाचा वापर कमी करण्याचा मार्ग आहे. महागाई वाढली की तिचा सर्वाधिक फटका गरीब आणि मध्यमवर्गीय यांना बसतो. श्रीमंत वर्ग काही प्रमाणात वाढते खर्च सहन करू शकतो त्यामुळे काटकसरीचा हा मंत्र सामान्याच्या घराप्रमाणे श्रीमंत वर्ग तसेच लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा, सरकारी कार्यालय अशा सर्व ठिकाणी लागू झाला पाहिजे. राष्ट्रीय शिस्त ही सर्वांसाठी समान असली पाहिजे.

भारतीय समाजाचे एक मोठे बळ, म्हणजे संकटसमयी एकत्र येण्याची क्षमता. युद्धकाळ, नैसर्गिक आपत्ती, महामारी किंवा आर्थिक संकट प्रत्येक वेळी समाजाने संयम दाखवला आहे. पंतप्रधानांचे आवाहन काहींना कठोर वाटेल, काहींना अति सावध वाटेल पण त्यामागील वास्तव नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीत प्रत्येकाने मी देशाची ऊर्जा आणि आर्थिक सुरक्षा त्यांच्यासाठी काय योगदान देऊ शकतो? कदाचित उत्तर मोठे नसेल वाचवलेला एखादा प्रवास किंवा टाळलेला अनावश्यक खर्च एवढेच त्याचे उत्तर असेल पण या संकटात तेवढ्यानेही देशाला आधार मिळू शकतो. अनिश्चिततेच्या जागतिक वातावरणात शिस्त सर्वात मोठी शक्ती ठरणार आहे. आजची आर्थिक शिस्त आणि संयमी जीवनशैली भविष्यातील महागाई आणि आर्थिक संकट यावर प्रभावी उत्तर आहे.

**सध्या देशातील वातावरणातील बदलांमुळे तापमान सतत वाढत आहे. हवामान विभागाने संपूर्ण देशात उष्णतेच्या वातावरणाची शक्यता वर्तवली होती. एप्रिल महिना सर्वार्थाने संपूर्ण देशासह आपल्या महाराष्ट्राला तापदायक ठरला. प्रशांत महासागरातील बदलामुळे उन्हाळा गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जास्त प्रमाणात असणार आहे, असे संकेत दिले होते.**

# उष्णतेचा वाढता कहर




✍सुनील कुवरे

दरवर्षी महाराष्ट्रातील मराठवाड्यात आणि विदर्भात उष्णतेच्या लाटांचे तडाखे बसत असतात. यंदा तर मोठ्या प्रमाणात उष्णतेचे तडाखे बसले आहेत. आतापर्यंतच्या उन्हाळ्यांपैकी हा सर्वात मोठ्या उष्णतेचा प्रकोप म्हणावा लागेल. २०२४ हे उष्णतेच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले होते. त्यावेळी देशात अनेक ठिकाणी लोक मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर २०२५ मध्येसुद्धा तशीच स्थिती होती. यंदा भारताच्या अनेक राज्यांसह महाराष्ट्राच्या अनेक भागांतसुद्धा कमाल तापमान ४० ते ४५ अंश सेल्सियसदरम्यान आहे.

जगातील उष्ण शहरांपैकी सर्वाधिक शहरे भारतात आहेत. यंदा उत्तर आणि मध्यपूर्वेतील भागात उष्णतेची लाट आली आहे. त्याचा फटका पंजाब, उत्तर प्रदेश, जम्मू-कश्मीर मध्य प्रदेश आदी राज्यांना बसला आहे. तेथील तापमान हे ४० अंश सेल्सियसच्या वर आहे. देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद केली गेली आहे ती वर्धा, अकोला, जालना, जळगाव, धुळे आदी भागांचा समावेश आहे. एप्रिलच्या २६ तारखेला अकोला येथे ४६.९ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

अकोल्याची प्रयागराजनंतर देशातील दुस?या आणि जगातील पाचव्या उष्ण शहराची नोंद झाली आहे, तर देशातील तिसरे आणि जगातील उष्ण राहिलेल्या अमरावती येथे ४६ .८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. यावरून उष्णता किती वाढली आहे याचा अंदाज येतो.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. महाराष्ट्रात अकोला, वर्धा, लातूर, अहिल्यानगर अशा काही ठिकाणी उष्माघातामुळे मृत्युमुखी पडले आहेत. लातूरमध्ये एका नऊ महिन्यांच्या बालकाचा मृत्यू झाला हे चिंताजनक आहे, तर आतापर्यंत ५५ जण उष्माघाताने आजारी पडले आहेत. उष्णतेचा फटका जसा मनुष्याला बसला आहे तसाच पशुपक्ष्यांनाही बसला बसत आहे.


उष्णतेच्या वेळी समुद्राची हवाही तापदायक ठरते. दरवर्षी उन्हाळ्या मध्ये तापमानाचा उद्रेक जाणवत असतो. अद्याप 'हीट वेव्ह' स्थिती निर्माण झाली नाही. मात्र येत्या काही दिवसांत तापमानवाढीचा धोका आहे. म्हणूनच हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेबाबत मार्गदर्शक तत्त्वे व सूचना जाहीर केल्या आहेत.

लहान मुले, वृद्ध आणि आरोग्याच्या समस्या असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. जागतिक पातळीवरील तापमानात वाढ, बेसुमार वृक्षतोड, शहरातील काँक्रिटी करण आणि ग्रामीण भागातील हरित क्षेत्राची झालेली घट यामुळे आपणच या संकटाला जबाबदार आहोत. तसेच हवामानात सतत बदल होत असून त्यामुळे कुठे अवकाळी पाऊस, कुठे गारपीट अशी संकटे वाढली आहेत. उन्हाळ्यात आपल्याला वृक्ष सावली देतात, पण विकासाच्या नावाखाली झाडी तोडली जातात. तेथे पुन्हा वृक्ष लागवड करतो का? अलीकडच्या काळात पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. जैवविविधतेचेसुद्धा संतुलन बिघडत असून प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

निसर्गाचा समतोल आपणच बिघडवत आहोत. खाणकाम आणि औद्योगिक प्रकल्पांसाठी जंगलतोड थांबवली पाहिजे. शहरांमध्ये हरित पट्टे निर्माण करणे सक्तीचे केले पाहिजे. नागरिकांनी स्वतःची जीवनशैली बदलली पाहिजे.

वाढते तापमान केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.

# कुटुंब : समाजजीवनाचा सशक्त आधार



✍डॉ. राजेंद्र बगाटे

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन

मानव हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. समाजात राहून, परस्परांशी संवाद साधून आणि नातेसंबंध जपत तो आपले जीवन समृद्ध करतो. या सामाजिक जीवनाचा पाया म्हणजे कुटुंब. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत तिच्या जीवनाला आकार देणारी, संस्कारांची शिदोरी देणारी आणि संकटसमयी आधार देणारी सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे कुटुंब होय. जगभरात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असताना कुटुंब संस्थेचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मे हा दिवस 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ मध्ये हा दिवस घोषित केला आणि १९९४ पासून जगभरात त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या दिवसामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे कुटुंब संस्थेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करणे, कुटुंबांसमोरील समस्या समजून घेणे आणि कुटुंबव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी समाज व शासन यांना जागृत करणे होय.

आजच्या धकाधकीच्या जीवनात कुटुंब ही व्यक्तीसाठी मानसिक शांतता आणि भावनिक आधार देणारी सर्वात मोठी शक्ती आहे. जीवनातील संघर्ष, स्पर्धा, ताणतणाव आणि असुरक्षितता यांमुळे अनेक व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर होत आहेत. अशा परिस्थितीत प्रेमळ कुटुंब व्यक्तीला धीर, आत्मविश्वास आणि मानसिक आधार देते. कुटुंबातील सदस्यांमधील संवाद, सहानुभूती आणि परस्पर विश्वास यांमुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते. विशेषतः बालक, महिला आणि वृद्ध यांच्यासाठी कुटुंबाचे महत्त्व अधिक असते. बालकाच्या मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकासासाठी कुटुंबातील वातावरण अत्यंत महत्त्वाचे असते. ज्या कुटुंबात प्रेम, शिस्त, समता आणि संवाद असतो, त्या कुटुंबातील मुले आत्मविश्वासपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनतात.

महिलांच्या जीवनातही कुटुंबाचे विशेष स्थान आहे. भारतीय समाजात महिलेला कुटुंबाचा केंद्रबिंदू मानले जाते. आई म्हणून ती मुलांवर संस्कार करते, पत्नी म्हणून सहजीवनाला बळ देते आणि मुलगी म्हणून कुटुंबातील नात्यांना जिव्हाळा देते. तथापि, अनेक वेळा महिलांवर घरगुती जबाबदाऱ्यांचे ओझे अधिक पडते. आधुनिक काळात महिलांनी शिक्षण, रोजगार, उद्योग, राजकारण, विज्ञान आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यामुळे कुटुंबातील भूमिका आणि जबाबदाऱ्या यामध्येही बदल होत आहेत. स्त्री-पुरुष समानतेची भावना, परस्पर सन्मान आणि सहकार्य यांवर आधारित कुटुंबव्यवस्था आजच्या काळाची गरज बनली आहे. महिलांच्या सक्षमीकर णाशिवाय कुटुंबाचे सुदृढीकरण शक्य नाही.

वृद्धांच्या दृष्टीने कुटुंब हा जीवनाचा आधारस्तंभ असतो. वाढत्या वयामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक समस्यांमध्ये कुटुंबीयांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असते. परंतु आधुनिक जीवनशैली, स्थलांतर आणि विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक वृद्ध एकाकीपणाला सामोरे जात आहेत. वृद्धाश्रमांची वाढती संख्या ही सामाजिक चिंतेची बाब आहे. ज्येष्ठ नागरिकांकडे अनुभवाचा मोठा खजिना असतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कुटुंबातील तरुण पिढीला जीवनमूल्ये समजतात. त्यामुळे वृद्धांचा सन्मान, त्यांची काळजी आणि त्यांच्याशी संवाद राखणे हे प्रत्येक कुटुंबाचे नैतिक कर्तव्य आहे.

आजच्या डिजिटल युगात कुटुंबसंस्थेसमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेकी वापर यामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. एकाच घरात राहूनही सदस्य एकमेकांपासून मानसिकदृष्ट्या दूर जात असल्याचे चित्र दिसते. कामाचा वाढता ताण, व्यस्त जीवनशैली आणि स्पर्धात्मक वातावरण यांमुळे कुटुंबासाठी वेळ देणे कमी झाले आहे. अनेकदा संवादाचा अभाव, गैरसमज, अपेक्षाभंग आणि आर्थिक ताण यांमुळे कौटुंबिक कलह निर्माण होतात. घटस्फोटांचे वाढते प्रमाण, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता आणि मानसिक आरोग्याच्या समस्या यांमुळे कुटुंबव्यवस्था अस्थिर होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते.

बालकांवरील वाढते मानसिक दडपण हीदेखील गंभीर समस्या आहे. शैक्षणिक स्पर्धा, करिअरची चिंता आणि पालकांच्या अपेक्षा यांमुळे अनेक मुले तणावग्रस्त होत आहेत. अशा वेळी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना प्रेमळ वातावरण देणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ भौतिक सुविधा पुरेशा नसतात; त्यांना भावनिक सुरक्षितता आणि आत्मीयतेची गरज असते. कुटुंबातील सकारात्मक वातावरणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक संवेदनशीलता विकसित होते.

आजच्या काळात कुटुंबातील संवादाचे महत्त्व अधिक वाढले आहे. संवाद हा कोणत्याही नात्याचा आत्मा असतो. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. मतभेद असले तरी परस्पर आदर आणि संयम राखणे गरजेचे आहे. अनेक समस्या संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. त्यामुळे दररोज काही वेळ एकत्र घालवणे, चर्चा करणे, जेवण एकत्र घेणे आणि कुटुंबीयांच्या सुख-दुःखात सहभागी होणे यामुळे नात्यांमध्ये दृढता येते.

कुटुंबातील मुलांना नैतिक मूल्यांचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रामाणिकपणा, सहकार्य, पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी, ज्येष्ठांचा आदर आणि स्त्री-पुरुष समानता यांसारखी मूल्ये बालपणापासून रुजविणे आवश्यक आहे. आज माध्यमे आणि डिजिटल जगाचा मुलांवर मोठा प्रभाव पडत आहे. त्यामुळे पालकांनी मुलांच्या मानसिक आणि सामाजिक विकासाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांना केवळ शैक्षणिक यशासाठी प्रोत्साहित न करता त्यांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनविण्यावर भर दिला पाहिजे.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा केवळ एक औपचारिक उत्सव नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण आपल्या कुटुंबासाठी किती वेळ देतो? कुटुंबातील सदस्यांच्या भावना कितपत समजून घेतो? वृद्ध, महिला आणि मुलांच्या गरजांकडे किती संवेदनशीलतेने पाहतो? या प्रश्नांचा विचार या निमित्ताने होणे आवश्यक आहे.


आधुनिक जीवनशैलीत भौतिक सुखसोयी वाढल्या असल्या तरी नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होत असल्याचे दिसते. त्यामुळे कुटुंबातील प्रेम, संवाद आणि सहजीवन यांना नव्याने बळ देणे ही काळाची गरज आहे.

१५ मे रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला कुटुंबाच्या या अनमोल मूल्यांची आठवण करून देतो.

या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील नात्यांना अधिक दृढ करण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रेम, विश्वास, समता आणि सहकार्य यांच्या आधारावर उभे राहिलेले कुटुंबच सुदृढ समाज आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करू शकते. म्हणूनच कुटुंब ही केवळ सामाजिक संस्था नसून मानवी जीवनाचा आत्मा आहे, असे म्हणणे

## ...थोडक्यात...

### सोमवारी महानगरात रामदेवबाबा ध्वज यात्रा



**अकोला :** लाखो भक्तांचे आराध्य रामसापीर रामदेवबाबा यांची महानगरात पावन ध्वज यात्रा आयोजित करण्यात आली आहे.श्री रामदेवबाबा ध्वज यात्रा भक्त परिवारच्या वतीने व रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या सहकार्याने सोमवार दि १८ मे रोजी सकाळी ७-३० वाजता आळशी प्लॉट येथील रामदेवबाबा मंदिर परिसरातून आरतीं करून ही यात्रा प्रारंभ होणार आहे. या ध्वज यात्रेत रामसापीर रामदेवबाबा यांची घोड्यावर बसलेली आकर्षक झाकी साकार करण्यात येणार असून सुमधूर भजने सादर करीत हातात ध्वज घेऊन महिला पुरुष या यात्रेत उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत.ही ध्वज यात्रा आळशी प्लॉट रामदेवबाबा मंदिर येथून आळशी प्लॉट, अशोक वाटिका, सर्वोपचार रुग्णालय, जिल्हाधिकारी कार्यालय, लक्झरी बस स्टँड मार्गे गीता नगर येथील रामदेवबाबा -श्यामबाबा मंदिरात उपस्थित होऊन रामदेव बाबांचे सामूहिक पूजन व आरती होऊन या ध्वज यात्रेची भक्तिभावात सांगता करण्यात येणार आहे.

### राज्यात मतदार याद्यांची ‘विशेष सखोल पुनरिक्षण’ मोहिम

**अकोला :** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये ’विशेष सखोल पुनरिक्षण’ (एईं) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने नुकताच आढावा घेतला. आयोगाच्या निर्देशानुसार प्रशिक्षण, तसेच विहित कार्यक्रमानुसार नियोजनबद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील १६ लाखांहून अधिक मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी या कार्यक्रमाद्वारे होणार आहे.

### अकोला व कौलखेड मंडळासाठी आज समाधान शिबिर

**अकोला :** अकोला तालुक्यातील अकोला व कौलखेड मंडळासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिर उद्या, शुक्रवार (१५ मे) सकाळी १० वा. नियोजनभवनात होणार आहे.

अकोला तालुक्यात मार्चपासून १२ महसूल मंडळ मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन होत आहे. नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला यांच्या प्रश्नांचे निराकरण, तक्रारी निकाली काढणे, दाखले वितरण, फेरफार निकाली काढणे, गाव दफ्तर अद्ययावत करणे आदी विविध कामे पूर्ण केली जातील. अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी केले आहे.

### आजपासून अंत्री निंबा फाटा येथे वारकरी बाल सुसंस्कार शिबिर



**अकोला :** रुक्मिणी माता सेवा प्रतिष्ठानच्या वतीने वै श्रीगुरु जोग महाराज, वै श्रीगुरु श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेने निंबा फाटा जवळील अंत्री मलकापूर येथील स्वयंभू महादेव मंदिर परिसरात निवासी वारकरी बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दिनांक १५ मे ते शुक्रवार दिनांक २९ मे पर्यंत आयोजित या १५ दिवसीय बाल सुसंस्कार शिबिरात हभप निवृत्ती महाराज माळी, हभप सचिन महाराज कराळे, हभप संदीप महाराज खकाळे, हभप श्रीकृष्ण महाराज काळे, हभप शुभम महाराज सावरकर, हभप अंकुश महाराज पांढरकर हे विविध अध्यात्मिक व नैतिक विषयाचे बालकांना प्रशिक्षण देणार आहेत. शिबिरात पंधरा दिवस सतत उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. बालकांनी आपल्या पालकासमवेत प्रवेशासाठी उपस्थित राहून या पंधरा दिवशीय शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन रुक्मिणी माता सेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# देशी कट्ट्यासह युवक जेरबंद; सिव्हिल लाईन पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील आकाशवाणी केंद्र परिसरात गावठी कट्टा घेऊन फिरणाऱ्या एका युवकाला सिव्हिल लाईन पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीकडून गावठी कट्टा, मॅगझीन व जिवंत काडतूस असा सुमारे २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी रात्री गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, एक इसम आकाशवाणी केंद्राजवळील रस्त्यावर कमरेला गावठी कट्टा लावून फिरत आहे. या माहितीच्या आधारे सिव्हिल लाईन पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन सापळा रचला.

दरम्यान, संशयित युवक पायी जाताना दिसून आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव वेदांत निवृत्ती गिरी (वय २१, रा. चांदूर, ता. जि. अकोला) असे सांगितले. पंचासमक्ष घेतलेल्या अंगझडतीमध्ये



त्याच्या कमरेला पॅन्टच्या उजव्या बाजूस लोखंडी बनावटीचा देशी कट्टा व मॅगझीन आढळून आले. मॅगझीनमध्ये एक जिवंत काडतूसही मिळून आले.

सदर अग्निशस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना आरोपीकडे नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपीने हे शस्त्र कुठून आणले याबाबत उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध आर्म अ‍ॅक्टच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक मालती कायटे यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

या कारवाईत पोउपनि दिनेश पवार, पोहेकॉ विजय लाखे, विजय भटकर, पोकॉ शक्ती कांबळे, प्रदीप पवार, प्रशांत शिरसाठ तसेच चालक मपोकॉ पूजा साबळे यांनी सहभाग घेतला. अटक आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावून जिल्हा कारागृहात रवाना केले असून पुढील तपास सुरू आहे.

## तांडा वस्तीतील मृतदेहांवर उघड्यावर अंत्यसंस्कार

### सावरगावातील बंजारा समाजाची व्यथा; स्वतंत्र स्मशानभूमीची मागणी रखडली

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या सावरगाव येथील बंजारा तांडा वस्तीमध्ये आजही मृतदेहांवर उघड्यावर अंतिमसंस्कार करण्याची वेळ नागरिकांवर येत असल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटून गेली, तरी बंजारा समाजाला स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सावरगावातील बंजारा समाजाने अनेकदा स्थानिक प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींकडे स्वतंत्र स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने समाजात तीव्र



नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्मशानभूमीअभावी अंत्यसंस्कार करताना नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर बनत असून, मृतदेहांवर उघड्यावरच अंत्यविधी करावे लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. बंजारा समाजातील नागरिकांनी प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन स्वतंत्र स्मशानभूमीची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही समाजबांधवांनी दिला आहे.

**जिवंतपणी अपेक्षा... मृत्यूनंतरही हाल!**

सावरगावातील बंजारा समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न हा केवळ जागेचा नसून प्रशासनाच्या उदासीनतेचे प्रतीक ठरत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जात असताना, मृतदेहांवर उघड्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ येणे ही दुर्दैवी बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी आता तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

> ‘ही केवळ मागणी नाही, तर आमच्या समाजाच्या सन्मानाचा प्रश्न आहे. मृतदेहांवर उघड्यावर अंतिमसंस्कार करावे लागणे म्हणजे प्रशासनाच्या निष्क्रियतेचा पुरावा आहे. वर्षानुवर्षे आश्वासनांपलीकडे काहीच झाले नाही. येत्या काही दिवसांत स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून दिली नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन उभारू.’
>
> **जानू बाबूसिंग राठोड,**
> सामाजिक कार्यकर्ते,
> सावरगाव

## अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणी आरोपीला ६ महिन्यांची शिक्षा

■ प्रतिनिधी | पातूर ■

अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून धमकी दिल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपीला सहा महिन्यांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, अकोला यांनी गुरुवारी (दि. १४) हा निकाल दिला.

या प्रकरणातील आरोपी नितीन सुखदेव ताजणे (वय ३४, रा. चोंडी, ता. पातूर) याला पोक्सो कायद्याच्या कलम १२ अंतर्गत सहा महिने सक्त कारावास व एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दंड न भरल्यास एक महिना साधा कारावास भोगावा लागणार आहे. तसेच भादंवि कलम २९४ अंतर्गत एक महिना साधा कारावास व ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवसांचा साधा कारावास अशीही शिक्षा न्यायालयाने सुनावली. फिर्यादीनुसार, २७ जानेवारी २०१८ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत महाविद्यालयातून घरी परतत होती. त्यावेळी आरोपी मोटार सायकलवरून आला व अश्लील शिवीगाळ केली. तसेच ‘तू दुसऱ्या मुलासोबत बोलली तर तुला मारून टाकीन,’ अशी धमकी देत तिचा मोबाईल हिसकावून घेत मारहाण केली होती. याप्रकरणी चान्नी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन पोटे व पोलीस उपनिरीक्षक जयसिंग पाटील यांनी केला. तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार पक्षातर्फे आठ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी अभियोक्त्यांनी न्यायालयात सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. तसेच पैरवी अधिकारी अशोक पाटोळे व सीएमएस येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फजलूर रहमान काझी यांनी न्यायालयीन कामकाजात सहकार्य केले.

## नीट पेपरफुटी प्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी

### शिक्षणमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांच्या राजीनाम्याची कशीश खान यांची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

‘नीट पेपरफुटी’ प्रकरण हे केवळ परीक्षा व्यवस्थेतील अपयश नसून देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी झालेला गंभीर अन्याय आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच संबंधित शिक्षणमंत्री व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी तात्काळ राजीनामे द्यावेत, अशी मागणी अकोला शहर महिला काँग्रेस अध्यक्षा कशीश खान यांनी केली आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी म्हटले की, देशभरातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांनी नीट परीक्षेसाठी दिवसरात्र मेहनत घेतली. पालकांनीही मोठ्या कष्टाने शिक्षणासाठी खर्च केला; मात्र सरकारच्या निष्काळजीपणामुळे



विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले. अशा प्रकारच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असून प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे.

या प्रकरणातील सर्व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यापूर्वी झालेल्या पेपरफुटी प्रकरणांचीदेखील चौकशी करून संबंधित दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, असे त्यांनी नमूद केले.भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुरक्षा वाढविण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारावी, अशी मागणी कशीश खान यांनी केली आहे. तसेच या घोटाळ्यामुळे विद्यार्थ्यांचे आणि जनतेचे झालेले आर्थिक नुकसान दोषींकडून वसूल करण्यात यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**अकोला :** महाराष्ट्र योग शिक्षक संघाची अकोला जिल्हा कार्यकारिणी महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे अमरावती विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत अवचार यांनी नुकतीच जाहीर केली. यामध्ये जिल्हाध्यक्षपदी डॉ. उल्हास मोकळकर यांची सर्वानुमते अविरोध निवड करण्यात आली.

**Change In Name**

I have change my name From
**Salma Jabeen Shahid Ahemad**
-To-
**Salma Jabeen Shahid Ahmad**
Address Chota Mominpura, Balapur, Balapur, Akola, Maharashtra - 444001 Passport No :- L9488944

**Change In Name**

I have change my name From
**Shahid Ahemad Gulam Shabbir**
-To-
**Shahid Ahmad Gulam Shabbir**
Address Chota Mominpura, Balapur, Balapur, Akola, Maharashtra -444001 Passport No :- L9488946

**Change In Name**

I have change my name From
**Shabana Parveen Mo. Yasin**
- To-
**Shabana Parveen Shakil Ahmed**
My Dob 03/05/1978Residential AddressABAD NAGAR, BALAPUR, Akola, 444302, Maharashtra, INDIA

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ४२/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** नालंदा बुद्धविहार ट्रस्ट, खरप बु., अकोला ता.जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. पंजाब श्रीपत शिरसाट रा. खरप बु., अकोला ता.जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काही नाही (आ) स्थावर मिळकत (वर्णन) : मौजे खरप बु., अकोला ता.जि. अकोला अकोला महानगर पालिका येथील 20840=900 चौ.फुट बांधकाम व खुली जागा याप्रमाणे ऐकून ९४५ चौ.फुट याची चतुःसीमा खालील प्रमाणे चतुः सीमा :- पूर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - राजू इंगळे यांचे घर, उत्तरेस- सरकारी रस्ता, दक्षिणेस- सेवानंद इंगळे यांचे घर.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल मांगी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## ‘गाथा रमाईकार’ पंजाबराव वर राज्यस्तरीय सम्राट अशोक

### उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

■ प्रतिनिधी | अकोला ■

चक्रवर्ती सम्राट अशोक प्रतिष्ठाण व फुले-शाहू-आंबेडकर शिक्षक संघटनातर्फे आयोजीत अशोकपर्व महोत्सवांमध्ये अकोला येथील सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, कवी, साप्ता. नारी ललकारचे संपादक पंजाबराव वर यांना त्यांचे सामाजिक व पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘राज्यस्तरीय सम्राट अशोक उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार’



त्यांचे निवासस्थानी जाऊन पंजाबराव वर व नारी ललकारच्या कार्यकारी संपादिका सुनंदा वर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी संघटनेचे पदाधिकारी प्रा. बाळकृष्ण खंडारे, मराठा सेवा संघाचे श्रीकृष्ण माळी, प्रा. सुनील कांबळे सर, राहूल भगत, दिनेश सोनोने, उपस्थित होते. भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजक प्रा. विजय आठवले, प्रा. बाळकृष्ण खंडारे, प्रा. सुनील कांबळे यांनी केले होते. पंजाबराव वर हे कार्यक्रमाला उपस्थित नसल्याने त्यांचे निवासस्थानी जाऊन राज्यस्तरीय मानाचा सम्राट अशोक उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापुर्वी देखिल पंजाबराव वर यांचे ‘वऱ्हाडी झटका’ काव्यसंग्रह, ‘महानायक बिरसामुंडा’ चरीत्र ग्रंथ, ‘भ्रुण कन्येचा टाहो’ काव्यसंग्रह, त्यांचा नुकताच त्यागमूर्ति रमाईच्या जीवनावर आधारित ‘गाथा रमाईची’ ग्रंथ प्रकाशित झाला आहे व ग्रंथाला महाराष्ट्रभरातून प्रतिसाद लाभत आहे.

यापुर्वी देखिल महाराष्ट्रभरातून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल न्यु महसुल कॉलनी येथील पंचशिल मंडळ व मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालय परिवारातर्फे त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**Change In Name**

I Have Changed My Name From
**SUMESH UMAKANTA AKKEWAR**
-TO-
**SUMESH UMAKANT AKKEWAR**
Passport No :- N8026294 My Residential Address in:- CB Bangla Irrigation dept , near officers club Dp Akola 444001

**Change In Name**

I Have Changed My Name From
**SHAILESH PRABHAKAR GOND**
-TO-
**SHAILESH PRABHAKAR DESHMUKH**
My Residential Address in:- HOUSE C27 ZP COLONY KHADKI AKOLA 444001

### जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- ३ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचेन्यायालय**

गैरअर्जदार/ गैरअपिलार्थी यांनी चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

Civil M.A. No. 387/2025 — प्रोसेस नं.१७९०/२०२६
Fix for: 17/06/2026 — दिनांक : १३/०५/२०२६

**बनाम :** १) रमेश राजारामजी भगत, २) जाई रमेश भगत, दोन्ही रा. न्यु भिमनगर, दिनेश किराणा दुकानाजवळ, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी ’जिल्हा न्यायाधीश– ३ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला ’ या न्यायालयामध्ये 'APPLICATION UNDER SECTION 5 OF LIMITATION ACT FOR CONDONATION OF DELAY' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अपिल दाखल केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १७/०६/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १७/०६/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक १३ माहे मे सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला.
दिनांक :- १३/०५/२०२६

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ४५/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** श्री. आई कालिका देवी चॅरिटेबल ट्रस्ट, पातुर ता. पातुर जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. गोपाल शाम धनस्कार रा. कासार वेटाळ, पातुर, ता. पातुर जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रु. ७००/- श्री. गोपाल शाम धनस्कार यांचे ताब्यात आहे. आ) स्थावर मिळकत (वर्णन) : निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### अकोला महानगरपालिका, अकोला सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला

**निविदा सुचना क्र. ०५, (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०३ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/१२०/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १४/०५/२०२६

# जिल्ह्यात कर्करोगाच्या रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ

## कर्करोगाच्या वाढत्या रुग्णसंख्येमुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज

**वर्धा/जनमाध्यम**

नव्या आरोग्य आकडेवारीनुसार जिल्ह्यात कर्करोगाच्या रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ होत असल्याचे समोर आले आहे. विशेषत: मुखाच्या कर्करोगाच्या रुग्णसंख्येत अपेक्षित प्रमाणापेक्षा तब्बल सहापट वाढ नोंदविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने जिल्हाभर प्रतिबंधात्मक आरोग्य क्रांती उपक्रम राबविण्याचे आवाहन केले आहे.

मुख, स्तन आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग वेळेत प्रतिबंध व निदान केल्यास टाळता किंवा पूर्णपणे बरा करता येऊ शकतात, असे आरोग्य तज्ञांनी स्पष्ट केले आहे. मागील वर्षाच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात कर्करोगाची झालेली वाढ मागील पाच वर्षाच्या आकडेवारीनुसार अंदाजित संख्येपेक्षा खूप जास्त आढळली आहे. यामध्ये मुखाचा कर्करोग अंदाजित १२७ रुग्णसंख्येच्या तुलनेत ७३२ प्रत्यक्ष रुग्ण आढळले असून सुमारे ४७६ टक्के वाढ झाली आहे. स्तनाचा कर्करोग अंदाजित १९९ रुग्णसंख्येच्या तुलनेत ४४६ प्रत्यक्ष रुग्ण आढळले असून १२४ टक्के वाढ झालेली आहे तर गर्भाशय मुखाचा कर्करोग अंदाजित १२३ रुग्णसंख्येच्या तुलनेत २२३ प्रत्यक्ष रुग्ण आढळले असून सुमारे ८१ टक्के वाढ झालेली आहे. देशभरात कर्करोगाच्या रुग्ण संख्येत मोठी वाढ होत असतांना जिल्ह्यातील ही परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे स्पष्ट होत आहे.मुखाचा कर्करोग, तंबाखुचे



घातक दुष्परिणाम : जिल्ह्यातील ८० टक्के पेक्षा अधिक मुखाच्या कर्करोगाचे रुग्ण तंबाखू सेवनाशी संबंधीत आहेत. यात धूम्रपानाबरोबरच खर्रा, गुटखा, मिश्री यासारख्या धूम्ररहित तंबाखू पदार्थाचाही समावेश आहे. यावर तंबाखूचे पूर्णपणे सेवन बंद करणे आणि आरोग्यदायी जीवनशैली स्विकारणे हे संरक्षणाचे सर्वात प्रभावी साधन आहे.

गर्भाशय मुखाचा कर्करोग, लसीकरणाद्वारे संरक्षण : गर्भाशय मुखाचा कर्करोग हा लसीकरणाद्वारे टाळता येणारा एकमेव कर्करोग आहे. यावर भारत सरकारतर्फे १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींसाठी मोफत एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

ही लस एकच डोस स्वरुपात दिली जाते. ती पूर्णपणे सुरक्षित असून कोणतेही गंभीर दुष्परिणाम आढळलेले नाहीत. ही लस आयुष्यभर संरक्षण प्रदान करते.स्तनाचा कर्करोग, लवकर निदान हाच बचाव: स्तनाच्या कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात आणि मृत्युदर लक्षणीयरित्या कमी होतो. यावर नियमित वैद्यकीय तपासणी, दर महिन्याला स्वत: स्तन तपासणी करणे अनिवार्य आहे. आरोग्य केंद्रात वेळोवेळी तपासणीसाठी येणे गरजेचे आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी स्वत:च्या व कुटूंबाच्या आरोग्यबाबत सजग राहावे तसेच पालकांनी आपल्या मुलींना जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरण देण्यासाठी पुढाकार घ्यावा. प्रौढ नागरिकांनी तंबाखू सेवन त्वरीत बंद करावे व आवश्यक असल्यास व्यसनमुक्ती केंद्राची मदत घ्यावी. महिलांनी स्तन व गर्भाशय मुख कर्करोगासाठी नियमित तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील यांनी केले आहे.

# जिल्ह्यात बोगस बियाण्यांची विक्री होऊ नये यासाठी दक्ष रहा-जिल्हाधिकारी

## जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा समन्वय समितीची सभा

**वर्धा/जनमाध्यम**

खरीप हंगाम लवकरच सुरू होणार असून मोठ्या प्रमाणावर बियाणे व खतांची विक्री होणार आहे. जिल्ह्यात बोगस व एचटीबीटी बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी भरारी पथकाची स्थापना करण्यात यावी. कृषी केंद्रे व सीमावर्ती भागात तपासणी मोहीम राबविण्यात यावी, जिल्ह्यात बोगस बियाण्यांची विक्री होऊ नये, यासाठी दक्ष राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी कृषी विभागाला दिले.

जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा समन्वय समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी अरविंद



उपरीकर, कृषी विकास अधिकारी शिवाजी जाधव, खत वाहतूकदार प्रतिनिधी रवि शेंडे तसेच कृषी व्यवसायी संघाचे अध्यक्ष मनोज भुतडा यांच्यासह संबंधित अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.खरीप हंगाम २०२६-२७ साठी एकूण ४ लाख १८ हजार ९७५ हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी ८७ हजार १८४ क्विंटल बियाण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. रासायनिक खतांच्या मंजूर आवंटनानुसार तालुकानिहाय पुरवठ्याबाबत चर्चा करण्यात आली.खरीप हंगामासाठी एकूण १ लाख १७ हजार १९० मेट्रिक टन खतांची मागणी करण्यात आली असून त्यामध्ये युरिया ३६ हजार ७५० मेट्रिक टन, एस.एस.पी. २८ हजार ५५० मेट्रिक टन, एम.ओ.पी. २ हजार ८५० मेट्रिक टन, डी.ए.पी. १३ हजार २४० मेट्रिक टन तसेच संयुक्त खत ३५ हजार ८३० मेट्रिक टन खताचा समावेश आहे.शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० तसेच ०७१५२-२५००९९ या क्रमांकावर तक्रारी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### क्षुल्लक कारणावरून मजुरास मारहाण

**पुलगाव**-क्षुल्लक कारणावरून एका मजुराला चौघांनी काठीने बेदम मारहाण केल्याची घटना पाटणी गॅस एजन्सीजवळ घडली.



या मारहाणीत शुभम भेंडे (२५) हा जखमी झाला असून पुलगाव पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.तक्रारीनुसार, तू आमच्या माणसासोबत का राहते,असे म्हणत रोहित नाईक, क्रिष्णा कळंबे, भावेश डोंगरे आणि जिवा चंदनखेडे यांनी शुभमला शिवीगाळ केली. त्यानंतर काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली. परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. जखमी शुभमने पोलिसांत तक्रार दिल्यानंतर आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.

# प्रशासक काळातील कामांवर संशयाची सावली

## विकासकामांच्या नावाखाली निधीचा गैरवापर? नगरसेवकांचा थेट आरोप

**सिंदी(रेल्वे)/जनमाध्यम**

सिंदी नगर परिषदेच्या प्रशासक कार्यकाळात करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे आणि शासकीय निधीचा गैरवापर झाल्याचा गंभीर आरोप करत विरोधी पक्षातील नगरसेवकांनी चौकशीची मागणी करत नगराध्यक्षांकडे विशेष सभा बोलावण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे शहराच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत सिंदी नगर परिषद प्रशासकांच्या ताब्यात होती. या काळात शहरात विविध विकासकामे करण्यात आली. मात्र, नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर नव्याने सत्तेत आलेल्या नगरसेवकांनी कामांचा आढावा घेतला असता अनेक कामांमध्ये गंभीर त्रुटी आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. अनेक विकासकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून, खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्ष कामे समाधानकारक नसल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे.नगरसेवकांनी नगराध्यक्षांना दिलेल्या निवेदनात नगर परिषद इमारतीच्या पहिल्या माळ्याचे बांधकाम, पाणीपुरवठा योजना दुरुस्ती, रंगरंगोटी, मनुष्यबळ पुरवठा, शहरातील सार्वजनिक शौचालय बांधकाम तसेच इतर विविध विकासकामांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ८१ (१) अ व २ नुसार सात दिवसांच्या आत विशेष सभा बोलावून या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.शहर विकासाच्या नावाखाली कोट्यवधींचा निधी खर्च झाला, मात्र प्रत्यक्षात अनेक कामांची गुणवत्ता संशयास्पद आहे. त्यामुळे नागरिकांच्या पैशांचा हिशोब जनतेसमोर यायलाच हवा, अशी भूमिका विरोधी नगरसेवकांनी घेतली आहे.निवेदन देताना विरोधी पक्ष गटनेते अजय कलोडे, आशिष देवतळे, सुरज कोपरकर, जगदीश बोरकर, तुषार हिंगणेकर, वर्षा बोंबले, दुर्गा बेलखोडे, ज्योत्स्ना तडस, जयश्री मडावी, गंगाधर कलोडे आदी नगरसेवक उपस्थित होते.

# बजरंग दल व युवा समितीचे मोक्षधाम स्वच्छ करून धर्मवीरांना अभिवादन



**सिंदी (रे.)/जनमाध्यम**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त बजरंग दल व युवा समिती सिंदी (रे.) यांच्या वतीने गुरुवारी (ता.१४) मोक्षधाम परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. समाजसेवा आणि स्वच्छतेचा संदेश देत युवा कार्यकर्त्यांनी परिसराची साफसफाई करून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली अर्पण केली.मोक्षधाम परिसरातील कचरा हटवून स्वच्छता करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी स्वच्छता हीच खरी सेवा हा संदेश देत नागरिकांमध्ये जनजागृती केली. तसेच सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.या अभियानात अनेक युवा कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडूनही कौतुक करण्यात येत आहे.

# चना खरेदीला पुन्हा ब्रेक; शेतकरी प्रतीक्षेत

## नाफेडची मर्यादा संपली, खा. अमर काळेंची वाढीव खरेदीची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

नाफेडमार्फत सुरू असलेल्या चना खरेदी प्रक्रियेला पुन्हा खीळ बसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मुदतवाढ मिळूनही खरेदीची मर्यादा संपल्याने अनेक शेतकऱ्यांचा चना खरेदीविना पडून आहे. या पार्श्वभूमीवर खा. अमर काळे यांनी प्रशासनाकडे खरेदीची मर्यादा वाढवून उर्वरित चना तातडीने खरेदी करण्याची मागणी केली आहे.



नाफेडने सुरुवातीला ७.६१ लाख मे. टन चना खरेदीला मंजुरी दिली होती. त्यानंतर खरेदीची मुदत संपल्यानंतर खा. अमर काळे यांनी पाठपुरावा करत मुदतवाढीची मागणी केली होती. त्यानुसार चना खरेदीची मुदत २९ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली. मुदतवाढ मिळाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी चना खरेदी केंद्रांवर आणला. काही शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्यात आला; मात्र काही दिवसांतच वाढीव खरेदी मर्यादाही पूर्ण झाल्याने केंद्रांवरील खरेदी बंद करण्यात आली.नाफेडने ५८ हजार ६३२ मे. टनांची वाढ करून एकूण ८.२० लाख मे. टन चना खरेदीस मंजुरी दिली होती. तरीही ही मर्यादा अपुरी ठरल्याचे चित्र आहे. एकट्या आष्टी तालुक्यात सुमारे १५० शेतकऱ्यांचा चना अद्याप खरेदीअभावी पडून असल्याची माहिती आहे.

शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन खासदार अमर काळे यांनी १२ मे रोजी जिल्हा प्रशासन व उपनिबंधक यांना पत्र पाठवून खरेदीची मर्यादा वाढविण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सोन्याच्या भावासोबत हुंड्याचे दरही गगनाला

**साहूर/जनमाध्यम**

सोन्याच्या वाढत्या किमतींचा फटका आता थेट विवाहसंस्थेलाही बसताना दिसत आहे. हुंडा देणे-घेणे कायद्याने गुन्हा असतानाही ग्रामीण भागात आजही ही प्रथा सुरूच असून, आता तर हुंड्याचे दर सोन्याच्या भावानुसार ठरवले जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. सोन्याचे दर दीड लाखांच्या उंबरठ्यावर पोहोचल्याने मुलीच्या कुटुंबावर आर्थिक ताण वाढला आहे.

पूर्वी लग्न जुळविताना कुटुंबाची प्रतिष्ठा, माणुसकी आणि स्वभावाला महत्त्व दिले जात होते. मात्र आता मुलाला सुंदर मुलगी हवी, तर मुलींना नोकरीवाला नवरा हवा, अशी मानसिकता वाढताना दिसत आहे. त्यामुळे सरकारी किंवा खासगी नोकरी करणाऱ्या मुलांना मोठी मागणी असून, त्यांच्या विवाहासाठी लाखोंचा हुंडा मागितला जात असल्याच्या चर्चा ग्रामीण भागात रंगू लागल्या आहेत.

विशेष म्हणजे ग्रामीण भागातील मुलीही आता शेतकरी मुलांना नकार देत असल्याचे चित्र आहे. शेतकरी नवरा नको' अशी भूमिका अनेक मुली घेत असल्याने शेती करणाऱ्या तरुणांसमोर मोठा सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक सुशिक्षित शेतकरी तरुण वयाची चाळिशी ओलांडूनही अविवाहित असल्याचे वास्तव साहूर परिसरात पाहायला मिळत आहे.लग्नात सोन्याचे दागिने आवश्यकच, अशी मानसिकता असल्याने मुलीचे वडील कर्ज काढूनही मागण्या पूर्ण करत आहेत. काही कुटुंबांकडून 'मुलाच्या शिक्षणावर खर्च झाला, मग हुंडा घेण्यात गैर काय?' असा प्रश्न उपस्थित केला जात असल्याने सामाजिक संवेदनशीलतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.दरम्यान, वाढती महागाई, शेतीतील अनिश्चित उत्पन्न आणि बदलती सामाजिक मानसिकता यामुळे शेतकरी कुटुंबांतील तरुणांमध्ये नैराश्य वाढत असल्याचे चित्र आहे. शेतकरी असणे हा गुन्हा आहे, असा प्रश्न अनेक अविवाहित तरुण उपस्थित करीत आहेत.


# कर्जमाफीच्या घोषणेनंतर शेतकऱ्यांना आशेचा किरण

## पण बळीराजाची मागणी एकच - तात्पुरती माफी नको, कायमची कर्जमुक्ती हवी

**अल्लीपूर/जनमाध्यम**

शासनाने कर्जमाफीची घोषणा करताच राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या मनात नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. पावसाळ्याची चाहूल लागताच जिल्हा बँका आणि सोसायट्यांमध्ये कागदपत्रांसाठी शेतकऱ्यांच्या रांगा लागल्या आहेत. मात्र, शेतकऱ्यांचे लक्ष केवळ कर्जमाफीवर नसून कायमस्वरूपी कर्जमुक्तीकडे असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसत आहे.

खरीप हंगाम तोंडावर आला असताना बियाणे, खत आणि औषधांच्या वाढत्या किमतींनी बळीराजाची चिंता वाढवली आहे. यंदा शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यांच्या दरात सरासरी २० टक्क्यांनी वाढ झाली असून डिझेलचे दरही उच्चांकावर पोहोचले आहेत. त्यामुळे कर्जमाफी झाली तरी पेरणीसाठी पैसा कुठून आणायचा असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.यंदा पावसाळा लहरी राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. वेळेवर पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट, तर अतिवृष्टी झाल्यास पिके वाहून जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. दरवर्षी दुष्काळ किंवा अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. त्यातच पीक विम्याची मदत मिळण्यास होणारा विलंब आणि पंचनाम्यांतील त्रुटीमुळे संताप वाढत आहे.शेतकरी संघटनांनी सरकारकडे काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. स्वामीनाथन आयोगानुसार उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावाचा कायदा करावा, पीक विम्याची मदत ३० दिवसांत थेट खात्यात जमा करावी, बोगस बियाणे व खतांच्या काळाबाजारावर नियंत्रण आणावे तसेच प्रत्येक शेतापर्यंत सिंचन सुविधा पोहोचवावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.सरकारच्या घोषणांपेक्षा आता शेतकऱ्यांचा विश्वास कृतीवर असल्याचे चित्र आहे. तात्पुरत्या कर्जमाफीपेक्षा सुरक्षित शेती, हमीभाव आणि कायमची आर्थिक स्थिरता मिळावी, अशी अपेक्षा बळीराजा व्यक्त करीत आहे.




# धारदार शस्त्रासह तरुण जेरबंद

**वर्धा**- धारदार शस्त्र बाळगून संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. ही कारवाई इतवारा बाजार परिसरात करण्यात आली.राहुल मडावी हा विसाव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर घातक शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गस्तीवरील पथकाने घटनास्थळी धाव घेत त्याला ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्याच्याकडून लोखंडी व गोलाकार धारदार सुरा जप्त करण्यात आला. आरोपी एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याने तातडीने कारवाई करण्यात आली. आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### सौंदर्यीकरणाच्या कामातील साहित्य चोरीला

**वर्धा**-शहरातील आरती चौकात सुरू असलेल्या सौंदर्यीकरणाच्या कामातील इलेक्ट्रिक साहित्य चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाचे ठेकेदार अतुल सातपुते यांना आरती चौकातील सौंदर्यीकरणाचे काम मिळाले आहे. या कामासाठी लागणारे लोखंडी पोल, इलेक्ट्रिक बोर्ड व अन्य साहित्य सैनिकी मुलींच्या वसतिगृहाजवळील एका खोलीत ठेवण्यात आले होते. मात्र, अज्ञात चोरट्यांनी संधी साधून साहित्य लंपास केले. साहित्य चोरीला गेल्याचे लक्षात येताच ठेकेदाराने शहर पोलिसांत तक्रार नोंदविली. सार्वजनिक कामांमध्ये वापरण्यात येणारे साहित्य चोरीला जात असल्याने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे.




# कुंभारांच्या चाकाला शासनाची गती; भोयर-बावनकुळे यांच्या बैठकीत मोठे निर्णय

## मातीशी नाळ जपणाऱ्या कुंभारांना दिलासा; सात महिने माती उपशास परवानगी

**वर्धा/जनमाध्यम**

मातीशी आयुष्यभर नाळ जोडून पारंपरिक व्यवसाय जपणाऱ्या कुंभार समाजासाठी राज्य शासनाने मोठा दिलासादायक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. वर्षातील तब्बल सात महिने माती उपसा करण्यास परवानगी देण्यासोबतच विशेष व्यावसायिक क्लस्टर उभारण्याचा निर्णय मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील हजारो कुंभार कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला नवे बळ मिळणार आहे.

बैठकीतील निर्णयानुसार, पिढीजात कुंभार कुटुंबांना विटा, कौले, मडकी व इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी वर्षाकाठी ७०० ब्रासपर्यंत माती विनामूल्य आणि कोणतीही रॉयल्टी न भरता उपसा करता येणार आहे. यासाठीचा परवाना दरवर्षी ९ नोव्हेंबर ते ३० मे या सात महिन्यांच्या कालावधीसाठी सलग स्वरूपात देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे नदी, नाले किंवा सरकारी पडीक जमिनीमधून केवळ माती उपशासाठी माती काढल्यास ७०० ब्रासपर्यंत कोणताही दंड आकारला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी २१ फेब्रुवारी २०२६ रोजी वर्ध्यात आयोजित राज्यव्यापी मेळाव्यात समाजाच्या विविध मागण्या जोरकसपणे मांडल्या होत्या. त्यावेळी राज्याचे गृह



(ग्रामीण), गृहनिर्माण, सहकार, शालेय शिक्षण व खाणीकर्म राज्यमंत्री तथा वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मंत्रालयात विशेष बैठक घेऊन सकारात्मक निर्णयाचे आश्वासन दिले होते.त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला आणि बुधवारी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात कुंभार खाणी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. ज्या भागांत पिढीजात कुंभार समाज वास्तव्यास आहे, त्या ठिकाणी मडकी, मूर्ती आणि वीट व्यवसायासाठी विशेष खाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच व्यवसायासाठी विशेष प्रमाणपत्र देऊन वीजदरात सवलत देण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर येथील वीज प्रकल्पांमधून निघणारा रिजेक्ट कोल आणि फ्लाय अॅश मोफत उपलब्ध करून देण्याचाही निर्णय घेण्यात आला. कुंभार व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी विशेष व्यावसायिक क्लस्टर उभारण्यात येणार असून, या क्लस्टरसाठी पाच वर्षांच्या करारावर जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. वीटभट्ट्यांना थेट पाच वर्षांची परवानगी देण्यात येणार असून, डिजिटल स्वाक्षरीयुक्त परवाना प्रणाली लागू करण्यात येणार आहे.श्री संत गोरोबा काका मातीकला बोर्डाच्या त्वरित अंमलबजावणीसह समाजाच्या इतर प्रलंबित मागण्यांबाबतही संबंधित विभागांच्या मंत्र्यांसोबत बैठक घेऊन न्याय मिळवून देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.शासनाच्या या निर्णयामुळे कुंभार समाजात समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पारंपरिक व्यवसायाला नवसंजीवनी मिळेल, अशी भावना समाजबांधवांनी व्यक्त केली आहे. सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी यासाठी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पंजाबराव लोखंडे यांचे निधन



**हिवरखेड :-** वरुड तालुक्यातील करजगाव (गांधी घर) येथील प्रतिष्ठित नागरिक पंजाबराव अजाबरावजी लोखंडे यांचे दिनांक ०९ मे २०२६ शनिवारला वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचेवर करंजगाव (गांधी घर) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा लहान मुलगा आकाश हा हिवरखेड येथील बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये कर्मचारी आहे. त्यांचे मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली, दोन जावई, नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३५४/२०२६ ने.ता.३०.०६.२०२६

**अर्जदार -**
१. रेखा ज्ञानेश्वर गजभिये, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.आजनगांव, पो.खेडीकला, ता.जि.पांढुर्णा
२. वंदना राजेंद्र गोंडाने, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.छत्रसाल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. पुष्पा सुभाषराव डोंगरे, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती
४. माला मनोज सोमकुंवर, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.भटेवाडी पो.चिचखेडा, ता.जि.पांढुर्णा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील नामे **किसनराव सदुजी बोरकर** हे दि.**०८.०९.२०१७** रोजी **दयासागर हॉस्पीटल, अमरावती, ता.** जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ४ यांची आई नामे **द्रौपदी किसनराव बोरकर** हिचा दि.**३१.०८.२०२०** रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मृत्यू झाला. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक / /२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९१४/२०२६
**बेनीबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Benibai Mangaldas Gupta, Age 80 Yrs. Occu.: Nil**
**R/o Near Kadbi Bazar, Gawalipura, Amravati.**
2. **Rekha Vijay Gupta, Age 61Yrs. Occu.: Housewife**
**R/o Near Kadbi Bazar, Gawalipura, Amravati.**
3. **Siddharth Vijay Gupta, Age 30 Yrs. Occu.: Labour**
**R/o Near Kadbi Bazar, Gawalipura, Amravati.**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विजय मंगल गुप्ता** हे दिनांक 22.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **बेनीबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बेनीबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 43/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **राधेकृष्ण गौरक्षण हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **सौ.सुमित्रा साहेबराव गायकवाड**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०५.०५.२०२६**रोजी दिली.

**(श्रीमती वाय.एस.शेख)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
शिक्का
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २४६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. २५.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद इर्शाद अब्दुल मजीद** च्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमुद दिनांक **१०.०९.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) | १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल साहेबराव दारोकर | २) श्री.अतुल साहेबराव दारोकर |
| ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) | ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) |
| ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर | ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**

## जाहीर नोटीस

**(खरेदीखत/विक्रीपत्र हरविल्याबाबत)**

आम्ही, १) सर्वेश नरोत्तमदास संघवी, वय ४७ वर्षे, २) शैला नरोत्तमराव संघवी, वय ७५ वर्षे, रा.मातोश्री विला अपार्टमेंट, झेडा चौक, राजापेठ, अमरावती-४४४६०६ याद्वारे सर्वसामान्य जनतेस जाहीरसुचना देतो की, खाली न मुद मालमत्तेचे **मूळ खरेदीखत** (Original Sale Deed) हरविले/गहाळ झाले असून सखोल शोध घेऊनही सापडलेले नाही.

**हरविलेल्या दस्तऐवजाचा तपशील**

**दस्तऐवजाचा प्रकार** - **खरेदी खत/विक्रीपत्र** (Sale Deed)
**दस्तऐवज/नोंदणी** क्र - ५६८/२००४
नोंदणीची तारीख - दि.२७.०२.२००४
दुय्यम निबंधक कार्यालय - दुय्यम निबंधक अमरावती शहर-२
विक्रेता (Seller) - विक्रेत्याचे पूर्ण नांव
खरेदीदार (Buyer) - १) सर्वेश नरोत्तमदास संघवी, वय ४७ वर्षे,
२) शैला नरोत्तमराव संघवी, वय ७५ वर्षे,
मालमत्तेचे वर्णन - सदनिका क्र.४०३, क्षेत्रफळ ६६० चौ.फुट
शिट क्रमांक - ५४-डी
वार्ड/गांव/परिसर -
शहर/तालुका/जिल्हा - अमरावती, ता.जि.अमरावती (महाराष्ट्र)
मोबदला रक्कम - अंकात रक्कम रु. शब्दात रक्कम रु.

वरील दस्तऐवज हरविल्याबाबत राजापेठ, पोलीस ठाणे येथे तक्रार/एफआयआर क्र३३५/२६ दि.११.०५.२०२६ रोजी नोंदविण्यात आली आहे. सदर तक्रारीची प्रत तपासणीसाठी उपलब्ध आहे.

सूचना/इशारा - ज्या कोणाला वरील दस्तऐवज सापडेल त्यांनी कृपया खाली दिलेल्या प त्त्यावर परत करावा. सर्वसामान्य जनतेस याद्वारे स्पष्टपणे सावध करण्यात येते की, हरविलेल्या सदर दस्तऐवजाच्या आधारे वरील मालमत्तेची खरेदी-विक्री, हस्तांतरण, तारण, भार निर्माण करणे किंवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. अशा कोणत्याही व्यवहाराची जबाबदारी जाहीरनामा देणाऱ्यावर राहणार नाही.

दस्तऐवज सापडल्यास खाली दिलेल्या संपर्क क्रमांकावर किंवा पत्त्यावर संपर्क करावा. सापडवून देणाऱ्यास योग्य बक्षीस देण्यात येईल.

**नांव - सर्वेश नरोत्तमदास संघवी**
**पत्ता - रा.मातोश्री विला अपार्टमेंट,**
**झेडा चौक, राजापेठ, अमरावती-४४४६०६**
**मो.**क्र.९३२५३७५७८०
तारीख

जाहीरनामा देणाऱ्याची सही
१) सर्वेश नरोत्तमदास संघवी, वय ४७ वर्षे,
२) शैला नरोत्तमराव संघवी, वय ७५ वर्षे,

प्रो.नं.१२६४/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१२.०५.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./२२१/२०२६ दिनांक २२.०६.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. ज्ञानेश्वर विश्वनाथ कडू, वय ४४ वर्षे, धंदा - शेती
२. सुरेश विश्वनाथ कडू, वय ४६ वर्षे, धंदा - शेती
दोन्ही रा.घोडचंदी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. उषा गजानन पाटकर, वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पाटी, ता.जि.अकोला

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **धुरपतीबाई उर्फ पिसूबाई विश्वनाथ कडू,** हे दिनांक **२९.०९.२०२०** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **धुरपतीबाई उर्फ पिसूबाई विश्वनाथ कडू,** यांचे वडील नामे राम उर्फ गोंडाजी रामाडे यांचे नांवे मौजा आखतवाडा, ता.जि.अकोला येथे शेत गट नं.५, ०.८१ हे.आर ही शेती असून सदर शेताची बाजारभाव किंमत ५०,०००/- इतकी आहे. अर्जदार नं.१ ते ३ ह्यांचा१/४ अंश कायदेशीर हिस्सा आहे.

आज दि.१२.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खाली नमुद केलेल्या वर्णनाची मिळकत ही सदर मिळकतीच्या मालकांकडून खरेदी करणार आहेत त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

**अम**रावती शहर नझूल शिट नं.६७-ए, नगर भूमापन क्र.२२८, क्षेत्रफळ ६१.७० चौ.मी. धारणाधिकार-अ. ही मिळकत १) श्री.मोहन केशवराव चरडे, २) श्री.संजय केशवराव चरडे,आणि ३) श्री.किशोर केशवराव चरडे यांच्या मालकीची आहे. सदरची मालमत्ता आमचे पक्षकार वरील दिलेल्या मालकांकडून खरेदी करणार आहेत. तरी सदर मालमत्ते संदर्भात कोणाचीही खरेदी, बक्षीस, दान, पोटगी, भाडेपट्टा, लीज. गहाण, कब्जा व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क संबंध असल्यास व सदरील वर न मुद मालमत्तेच्या नियोजित खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास ही हरकत हक्क संबधाच्या योग्य त्या कागदपत्रानिशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील नमुद आमच्या पत्त्यावर हरकत नोंदवावी. तशी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिकतीच्या मालकांबरोबर सदरील मिळकतीचे खरेदी पूर्ण करतील व मागाहून कोणतीही तकार चालणार नाही, याची कृपया समज द्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस

स्थान - अमरावती
दिनांक १५.०५.२०२६

(ॲड.निखिल ए.किन्हीकर)
मुधोळकर पेठ, अमरावती
मो.९१६८८९८४७२ /

**मा. दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१५३/२०२६ ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार :**
१. मंदा शतनसिंग खानंदे,
रा.छत्री तलाव रोड, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. दिनेश शतनसिंग खानंदे,
रा.स्मशान रोड, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. नरेश शतनसिंग खानंदे,
रा.समाज मंदिराजवळ, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. निलेश शतनसिंग खानंदे,
रा.हिंदु स्मशान भूजीजवळ, जेवड नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **शतनसिंग रत्नाजी खानंदे** यांचा मृत्यू दि.**२४.०१.२०२६** रोजी **जामगांव** ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ ते ४ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मे, २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. २५.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **जहूर खान रशिद खान** च्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमुद दिनांक **०९.०१.१९९४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) | १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल साहेबराव दारोकर | २) श्री.अतुल साहेबराव दारोकर |
| ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) | ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) |
| ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर | ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. १६.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **नसिरुद्दीन शेख हिसामुद्दीन** च्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमुद दिनांक **२९.०८.१९९०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) | १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल साहेबराव दारोकर | २) श्री.अतुल साहेबराव दारोकर |
| ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) | ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) |
| ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर | ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**

प्रो.नं.१२५८/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.११.०५.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./२२४/२०२६ दिनांक २०.०६.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. ललीता सहदेव पवार, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्रीकांत सहदेव पवार, वय ३० वर्षे, धंदा - मजुरी
३. अर्चना सहदेव पवार, वय २८ वर्षे, धंदा - घरकाम
४. ईश्वर सहदेव पवार, वय ३१ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.दिक्षाभूमी नगर, आशामनिषा देवी रोड, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **सहदेव यशवंत पवार** हे दिनांक **१६.०७.२०२२** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.११.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीरनामा/सायटेशन

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयातील**
**एम.जे.सी. ६२९/२०२६** **ने.ता.१५.०६.२०२६**

**अर्जदार :** १. Smt.Kiran Wd/o Mangesh Bugadane
रा.हाऊस नं.१३२, राजश्री कॉलनी, दस्तूर नगर, अमरावती,
ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **मयत मंगेश कमलाकांत बुगादाणे** यांचे निधन दिनांक **०६.०८.२०२५** रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व ईतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक ०६.०५.२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,(प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व-स्तर)
अमरावती

**विदर्भ एज्युकेशन सोसायटी, किशोर नगर, अमरावती द्वारा संचालित**
**(बौध्द धर्मीय अल्पसंख्यांक संस्था)**

## महिंद विद्यालय,

**त्रिवेणी कॉलनी, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती**

## पाहिजेत

**(शासनमान्य १०० टक्के अनुदानित)**

**पद रिक्त झाल्यामुळे खालील पदावर पूर्णवेळ शिक्षक नियुक्त करणे आहे.**

| अ. क्र. | पदाचा तपशील | शैक्षणिक पात्रता | व्यावसायिक पात्रता | पदाची संख्या | मानधन | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक इयत्ता ९ ते १० करीता | बी.ए. | बी.एड. | ०१ | शासकीय नियमानुसार | खुला |

वरील प्रमाणे पुर्ण वेळ शिक्षक नियुक्त करणे आहे. पात्र व ईच्छुक उमेदवारांनी रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी दुपारी ११.०० वाजता आवश्यक कागदपत्रांसह समक्ष मुलाखतीकरीता स्वखर्चाने स्वतः हजर रहावे.

**वेळ - सकाळी ११.०० ते २.०० पर्यंत**

**मुख्याध्यापक,**
**महिंद विद्यालय,**
**त्रिवेणी कॉलनी,**
**कॉंग्रेस नगर रोड**
**अमरावती**

**अध्यक्ष**
**विदर्भ एज्युकेशन सोसायटी,**
**किशोर नगर,**
**अमरावती**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. ०५.०४.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शायका अंजुम मोहम्मद नसीर** च्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमुद दिनांक **०१.०१.१९८६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) | १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल साहेबराव दारोकर | २) श्री.अतुल साहेबराव दारोकर |
| ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) | ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) |
| ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर | ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. ०५.०४.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल शरीफ अब्दुल लतीफ** च्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमुद दिनांक **२८.०३.१९६०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) | १) सौ.पद्मा स.मेस्कर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल साहेबराव दारोकर | २) श्री.अतुल साहेबराव दारोकर |
| ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) | ३) श्री.इजाजोद्दीन मो.इनामतदार (तं.मु.अ.) |
| ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | ४) श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर | ५) श्री.नंदकिशोर भी.वासानकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३२७/२०२६ ने.ता.१९.०६.२०२६

**अर्जदार -**
१. शम्मा बशीर अली शहा, वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
२. शमीर बशीर अली, वय ५१ वर्षे, धंदा - मजुरी
३. राजीक अली बशीर अली शहा, वय ४८ वर्षे, धंदा - मजुरी
तिघेही रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सुलतानपाशा बशीर अली, वय ४३ वर्षे, धंदा - मजुरी
रा.८०/५, त्रिवेणी सोसायटी, भेकराई नगर, फुरसुंगी पुणे
५. शबनम परवीन अजीज शहा, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.ग्रीन काउंटी फेस-२, भेकराई नगर, फुरसुंगी पुणे

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील नामे **बशीर अली कासम शाह** हे दि.**२९.१०.२०२५** रोजी **धामणगांव**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.०५.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 121/25 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व **युवा** क्रांती रोजगार बहुउद्देशीय संस्था, माहुली धांडे, ता.दर्यापूर
नोंदणी क्रमांक जि.अमरावती. एफ-१८२९७
बाबत अर्जदार - **शरद महादेवराव सुने**
गैरअर्जदार - १) पंकज सुधाकर गोहत्रे, २) प्रदीप सुरेशराव पाळनकर, ३) रंजित विठ्ठलराव पानझाडे ४) राजू किसनराव गजभिये, ५) जयकुमार रुपराव धुमाळे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०४.०३.२०२६**रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.१६०/२०२६ ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :**
**१.** गोदावरी वासुदेव मनोहरे, वय ८६ धंदा - घरकाम
रा.प्रियदर्शनी वसाहत, शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. राधाबाई आबाराव वानखडे, वय ७३ धंदा - घरकाम
रा.सावरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक गुलाबराव शिवरामजी दामले** यांचा मृत्यू दिनांक **१३.०२.२००७** रोजी रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच मृतक **मनकर्णा गुलाबराव दामले** हिचा दि.**२२.१०.२००५** रोजी रा.सावरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१६०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.


त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## संक्षिप्त



### विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**अमरावती-**स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला माजी अधिसभा सदस्य डॉ. अशोक सोमवंशी तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल माहिती प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ.धनंजय पाटील यांनी दिली.

### मोबाईल चार्ज करताना विजेचा धक्क्याने मुलीचा मृत्यू

**वरूड-**मोबाईल चार्ज करत असताना विजेचा धक्का लागून



एका १६ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सुरळी येथे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. जानवी किशोर सोनारे (१६) असे मृत मुलीचे नाव आहे. दोन बहिणींमध्ये ती लहान होती. तिने नुकतीच इयत्ता १० वीची परीक्षा उत्तीर्ण होऊन ६७ टक्के गुण मिळवले होते. त्यामुळे तिच्या पुढील शिक्षणाबाबत कुटुंबीयांमध्ये वातावरण होते. आनंदाचे मिळालेल्या माहितीनुसार, जोरदार सायंकाळी सुमारे ६.३० वाजताच्या सुमारास जानवी घरीच काम करत होती. याच दरम्यान तिने मोबाईल चार्जिंगला लावताना अचानक विजेचा धक्का बसला. घटनेनंतर कुटुंबीयांनी तत्काळ तिला उपचारासाठी नेले; मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# परिमंडळातील ४८ हजार ७४१ वीज ग्राहकांचे बिल शून्यावर

## छतावर सौर प्रकल्प बसविल्यामुळे वीज बचतीसह पर्यावरण संवर्धनाला चालन

**अमरावती/का.प्र.**
केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' अंतर्गत अमरावती परिमंडळात सौर ऊर्जेबाबत ग्राहक जागरूक झाले असून आतापर्यंत तब्बल ४८ हजार ७४१ घरांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. त्यामुळे या ग्राहकांचे वीज बिल शून्यापर्यंत कमी झाले आहे.

महिन्याला ३०० युनिट वीज वापर असणाऱ्या वीज ग्राहकांना मोफत वीज देणे हा या योजनेचे उद्धीष्ठ असून ग्राहकांना सौर ऊर्जा स्थापनेसाठी प्रोत्साहन म्हणून प्रति किलोवॅट ३० हजार रूपये, याप्रमाणे दोन किलोवॅटला ६० हजार आणि तिसऱ्या किलोवॅटसाठी १८ हजार रूपये, याप्रमाणे ७८ हजार रूपयाचे अनुदान दिल्या जाते. ग्राहकाचे अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा होते. तसेच सौर प्रकल्प बसविण्यासाठी बँकेमार्फत कर्जाची सुविधा देखिल उपलब्ध आहे.महावितरणकडून या योजनेच्या प्रभावी



अंमलबजावणीसाठी मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंते दिपक देवहाते, प्रविण दरोली यांच्या पुढाकाराने विशेष प्रयत्न केले जात असून ग्राहकांना ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, तांत्रिक मार्गदर्शन तसेच नेट मीटरिंग सुविधा जलदगतीने उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील ग्राहकांचा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत आहे.परिमंडळात ४८ हजार ७४१ ग्राहकांनी आपल्या छतावर सौर प्रकल्प बसविले आहे.

यात अमरावती जिल्ह्यातील ३३ हजार ८४६ आणि यवतमाळ जिल्ह्यातील १४ हजार ८९५ ग्राहकाचा समावेश आहे. अमरावती जिल्ह्यात अमरावती शहरातील १९ हजार २७२ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत घराच्या छतावर सौर प्रकल्प बसविले आहे, त्यानंतर अचलपूर विभागात ५ हजार ९१२, मोर्शी विभागात ४ हजार ६०६ आणि अमरावती ग्रामीण विभागात ४ हजार ५६ ग्राहकांनी आपल्या छतावर सौर प्रकल्प बसविले आहे. यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे ६ हजार २५७ सौर प्रकल्प यवतमाळ विभाग, ३ हजार ४३० पुसद विभाग, ३ हजार ३६० पांढरकवढा आणि १ हजार ८४६ दारव्हा विभागातील वीज ग्राहकांनी आपल्या घराच्या छतावर सौर प्रकल्प उभारून आपले वीजबिल शुन्यापर्यंत कमी केले आहे.

# कुपोषणग्रस्त मेळघाटमध्ये मेडिकल कॉलेजची उभारणी करा

## १८ तारखेला एकदिवसीय उपोषण तसेच रास्तारोको आंदोलनाचा इशारा

**धारणी/वार्ताहर**
कुपोषणग्रस्त मेळघाट परिसरात शासकीय मेडिकल कॉलेज उभारण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी येत्या १८ तारखेला बिहाली येथे एकदिवसीय उपोषण तसेच रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. अनेक वर्षांपासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करूनही शासन व प्रशासनाकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. माजी जिल्हापरिषद सदस्य सुखदेव पवार यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, गेल्या सात वर्षांपासून मेळघाटात



मेडिकल कॉलेज उभारणीसाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. अनेक वेळा निवेदने, आंदोलने आणि बैठका घेऊन शासनाचे लक्ष वेधण्यात आले; मात्र अद्यापही या गंभीर प्रश्नावर ठोस कार्यवाही झालेली नाही.

मेळघाट हा आदिवासी व दुर्गम भाग असून येथे आरोग्य सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. कुपोषणामुळे दरवर्षी अनेक बालकांचे मृत्यू होत असल्याच्या घटना समोर येतात.

त्यामुळे या भागात अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या शहरांमध्ये उपचारासाठी जावे लागू नये, यासाठी मेडिकल कॉलेज उभारणे अत्यंत आवश्यक असल्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# गांधी विद्यालयाचा दहावी परीक्षेत झळाळता उत्कृष्ट निकाल

**अंजनगाव बारी-**न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा द्वारा संचालित गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयाचा बोर्डाचा एकूण निकाल तब्बल ९२.१७ टक्के लागला असून परीक्षेसाठी ११५विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यापैकी ३० विद्यार्थी प्राविण्यासह उत्तीर्ण, ५० विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर १५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.



गुणवंत विद्यार्थी प्रथम क्रमांक कल्याणी संतोष हजारे (९० टक्के), द्वितीय क्रमांक–मेघना रत्नाकर मोडक (८९ टक्के),तृतीय क्रमांक –खुशी गजानन अंबाडकर (८९ टक्के), यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष राजेश टारपे व अॅड.आनंद इंगोले, शाळा समिती सभापती रामेश्वर लाड तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले. विद्यालयाच्या प्राचार्या वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिगंबर करडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या मार्गदर्शनामुळे व परिश्रमामुळे हा उत्कृष्ट निकाल साध्य झाल्याचे सांगण्यात आले. विद्यालयाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# दादा भामोदकर कृषी विद्यालयाचा दहावीच्या निकालात ९७ टक्के यश

**टाकरखेडा शंभू-**साऊर येथील शिवाजी शिक्षण संस्था संचालित दादा भामोदकर कृषी विद्यालय चा इयत्ता दहावीचा निकाल यंदा ९७ टक्के लागला असून विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. या निकालामध्ये



प्रविण्य श्रेणीत १५, प्रथम श्रेणीत १६, द्वितीय श्रेणीत १६ तर पास श्रेणीत २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच एका विद्यार्थ्याला एटीकेटी मिळाली आहे. विशेष म्हणजे गणित, विज्ञान तसेच इतिहास-भूगोल या विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.निकालात श्रावण निलेश सोनवणे याने ९० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. समर्थ गजानन बोरखडे याने ८९ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर श्रावणी प्रवीण विंचुरकर हिने ८५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी विषय शिक्षक के. आर. मोहड, एन. टी. गवई, आर. डब्ल्यू. बरडे, एस. पी. देशमुख, पी. पी. गंदे, ए. बी. डाबेराव, एन. एस. चाफलेकर, मुख्याध्यापक आर. एस. जावरकर तसेच पालकांना दिले आहे.मुख्याध्यापक आर. एस. जावरकर व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

# माध्यमिक शाळांना दिलेली सवलत उच्च प्राथमिकच्या इयत्तांसाठी लागू करा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे शासनाला पत्र

**अमरावती/का.प्र.**
संच मान्यता शासन निर्णय १५ मार्च २०२४ मधील निकषामुळे इयत्ता नववी, दहावी ची पटसंख्या २० पेक्षा कमी असल्यास शिक्षकांची मान्य पदे कमी करण्यात आली होती. परंतु ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाच्या पत्रानुसार इयत्ता गट ९-१० करिता २०२५-२६ ची संचमान्यता करताना दोन्ही वर्गाची पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास तीन शिक्षक अनुज्ञेय करण्यात यावेत अशा प्रकारची सवलत प्रोत्साहन म्हणून एक वर्षासाठी देण्यात आली आहे. या सवलती करिता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून शासनाचे स्वागत करतानाचआभारही व्यक्त केले आहे.

इयत्ता नववी व दहावी मध्ये विद्यार्थी प्राथमिक, उच्च प्राथमिक शिक्षणातूनच पुढे जात असतात. सोबतच इयत्ता ६ ते ८ उच्च प्राथमिक वर्गातील शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या नववी, दहावीच्या शिक्षणासाठी व शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी तयार करणारा महत्त्वाचा टप्पा आहे. हा टप्पा जर कमजोर राहिला तर विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यात अडसर निर्माण होतो हे वास्तव कुणालाच नाकारता येणार नाही.इयत्ता सहावी ते आठवीच्या शाळेत २० पेक्षा कमी पटसंख्या असण्याची कारणे सुद्धा तीच आहेत जी नववी दहावीची पटसंख्या कमी असण्याची आहेत. जर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी नववी दहावीची परसंख्या २० असल्यास तीन शिक्षकांची पदी मान्य होतात. तर हाच न्याय इयत्ता सहावी ते आठवीच्या इयत्तांना सुद्धा का लागू करण्यात आला नाही हे अनाकलनीय आहे.इयत्ता सहावी ते सातवी/आठवीमध्ये २० विद्यार्थी असल्यास गणित-विज्ञान विषयाचे केवळ एकच पद, २० ते ७० साठी दोनच पदे आणि ७० पेक्षा अधिक असल्यासच तीन पदे मंजूर केली जातात. दोन किंवा तीन इयत्ता आणि या इयत्तांचे सर्व विषय शिकवण्यासाठी केवळ एकच पद मंजूर करणे हा निकष विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत अयोग्य आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान करणारा आहे. या विद्यार्थ्यांना सुद्धा गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेण्याचा हक्क असल्याने त्यांच्या शिक्षणासाठी सुद्धा शासनाने अनुकूल निर्णय घेत १५ मार्च २०२४ चा शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनास अडसर ठरणारा शासन निर्णय रद्द केलाच पाहिजे.तसेच ज्याप्रमाणे शासनाने माध्यमिक शाळांच्या इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचा विचार करून सद्यस्थितीत शिक्षक पदे मान्य करताना सुधारणा केली आहे तशीच सुधारणा कोणताही पक्षपात न करता समान न्याय तत्त्वाचा अवलंब करून उच्च प्राथमिक इयत्तांसाठी सुद्धा करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे,शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर,रणजीत सिंग देओल प्रधानसचिव,आबासाहेब कवळे,उपसचिव,सचिंद्र प्रताप सिंग राज्य आयुक्त(शिक्षण),शरद गोसावी शिक्षण संचालक (प्राथमिक)यांना निवेदना व्दारे केली आहे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# टायटन्स पब्लिक स्कूल (CBSE) चा १२वीचा उत्कृष्ट निकाल

## शेख हातीम शेख इब्राहीम जिल्ह्यात प्रथम

**अंजनगाव बारी**-विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित टायटन्स पब्लिक स्कूल शाळेच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बोर्डामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. यावर्षी शाळेचा एकूण निकाल ९०% लागला आहे.शेख हातीम शेख इब्राहीम यांनी ९७.४०% गुण मिळवून अमरावती जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला.गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अनन्या मित्तल – ९३.६०%, न्यासा काळे – ९३.४०%, संमयी सावरकर – ९२.२०%, तनिशा चांडक – ९२%, निलय सोनुकले – ९०.२०%, याशिका धोटे – ९०%, प्रसन्ना महल्ले – ८९.८०%, मोहित कालमेघ –



८८%, जिया जैस्वाल – ८७.८०%, रुद्रा चोरे – ८७.६०%, अथर्व लिखितकर – ८७.२०%, अथर्व गावंडे – ८७.२०%, स्वरांगी सावरकर – ८६.६०%, आर्यन अजमिरे – ८६.२०%, आशी जैन – ८६.२०%, मंदार जावरे – ८५%, यावर्षी २० विद्यार्थ्यांनी ८५ पेक्षा जास्त गुण मिळवत क्रमांक पटकावले आहेत.

प्रथम येणाऱ्या व गुणवत्ता क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अँड. उदयजी देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी संचालक नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रो. विनय गोहाड, प्रो. गजानन काळे यांच्यासह



शाळेचे प्राचार्य अजय चौबे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे. उत्कृष्ट निकालांची परंपरा टायटन्स पब्लिक स्कूलने कायम ठेवली असून विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# सुबोध हायस्कूलच्या श्रेयशी कोरडे व आनंदी तट्टे जिल्ह्यात द्वितीय

**अचलपूर-**अचलपूर शहरातील सुबोध शिक्षण मंडळाद्वारे संचालित सुबोध हायस्कूलने इयत्ता दहावीच्या निकालात यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. यंदाच्या निकालातील विशेष बाब म्हणजे श्रेयशी शरद कोरडे व आनंदी गणेश तट्टे या दोन्ही विद्यार्थीनींनी ९८.२० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात द्वितीय, तालुक्यात प्रथम तसेच शाळेत संयुक्त प्रथम येण्याचा मान पटकावला. तसेच सर्वेश नरेश खाडकर याने ९७.४० टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय क्रमांक मिळविला, तर स्वानंद संजय भागवत याने ९६.२० टक्के गुणांसह शाळेत तृतीय क्रमांक पटकावला. शाळेतील एकूण २३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. प्रथम श्रेणीत ८२ विद्यार्थी उत्तीर्ण



झाले असून त्यापैकी ८४ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी मिळविली आहे. उर्वरित २४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय भारतीय, उपाध्यक्ष राजन पितळे, सचिव डॉ. अनंत भारतीय, माजी उपाध्यक्ष विनायकराव भारतीय,श्याम क्षीरसागर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक संजय चौबे, पर्यवेक्षिका व वर्गशिक्षिका अंजली शुक्ल, मिनाक्षी कुळकर्णी, वर्गशिक्षक संजय सुरजुसे, सुबोध इंग्रजी प्रायमरीच्या प्राचार्या वैशाली हरदास तसेच शिक्षक समिती सदस्य सीमा बडे, श्रीरंग तारे, मंदार भारतीय, वैभव भारतीय, गजानन कावलकर, प्रणिता धुळे, रोशनी दातीर, अवंतीका सावरकर, योगेश अमृतकर, हरीश फुटनाईक आदींसह शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सातत्यपूर्ण गुणवत्तेची परंपरा कायम राखत पोटे पाटील सीबीएसई बारावीचा निकाल १०० टक्के

**अमरावती/का.प्र.**
पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या सीबीएसई बारावी फेब्रुवारी/मार्च २०२५-२६ परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून महाविद्यालयाने सातत्यपूर्ण गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ८० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली.

या निकालात तब्बल २७ विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत गुणवंत यादीत स्थान पटकावले. राजेश्वरी रवींद्र राठोड हिने ९६.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. पार्थ सुमित



चांडक याने ९५.०० टक्के, अथर्व विजय वानखडे व नवीषा संदीप दानखडे यांनी प्रत्येकी ९३.२० टक्के गुण मिळवले. तसेच प्रसाद मुरलीधर वाडेकर ९२.८०%, मल्हार जीवन डालके ९२.४०%, हिमांशू संजय महल्ले ९१.००%,

यश नितीन दातीर ९०.४०% आणि मयंक शैलेश हटवार ९०.२०% गुणांसह यशस्वी ठरले. याशिवाय अनुष्का किशोर पखाण ८९.४०%, सर्वज्ञ नितीन कडू ८९.२०%, हेमांगी नरेंद्र भुजाडे ८८.२०%, आर्यन ज्ञानेश्वर वावरकर ८८.००%, अधिराज हेमंतकुमार डिके ८७.८०%, आयुषी आशिष देशमुख ८७.६०%, ओजस्वी मंगेश राऊल ८६.६०%, अग्रजा महेश साबळे ८६.२०%, गौतमी प्रतापराव अडसड व पृथ्वी निलेश ठाकरे प्रत्येकी ८५.००%, आशी मनीष अग्रवाल ८४.८०%, साहिल गणेशराव बोकडे ८४.६०%, आर्यमन विजय लेवटे व हर्ष राजेंद्र वारकरी प्रत्येकी ८२.८०%, कृपा रवींद्र घुगे व वेदांत प्रवीण वानखडे प्रत्येकी ८२.६०%, पृथा गजानन धर्माळे ८२.४०ऽ आणि मोहम्मद अबुजर ८०.२०% गुण मिळवत गुणवंत ठरले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे सहकार्य तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली. नियमित सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरणामुळे हे यश शक्य झाल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले.पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण अमरावती परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कोट्यवधींचे दंड ‘थंडबस्त्यात’; महसूल यंत्रणा नेमकी कोणाच्या बाजूने?

## ४८ आणि ५८ कोटींची वसुली रखडली

### गाजीपूर-रुदाळी खाण प्रकरण :

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील गाजीपूर-रुदाळी परिसरातील गौण खनिज उत्खनन प्रकरण आता महसूल विभागासाठी केवळ प्रशासकीय फाईल उरलेले नसून, शासनाच्या महसूल व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे प्रकरण ठरत आहे. एका बाजूला ४८ कोटी आणि ५८ कोटी रुपयांचे दंड ठोठावल्याचा गाजावाजा केला जातो; दुसऱ्या बाजूला त्या दंडाची प्रत्यक्ष वसुली मात्र वर्षानुवर्षे होत नाही. परिणामी ‘दंड शासनासाठी की दिखाव्यासाठी?’ असा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.गेल्या काही वर्षांत गाजीपूर-रुदाळी परिसरात गौण खनिज उत्खननाच्या नावाखाली डोंगर पोखरणे, मंजूर मर्यादेपेक्षा अधिक खोलीपर्यंत खाणकाम, तात्पुरत्या परवान्यांचा गैरवापर आणि पर्यावरणीय नियमांचे उघड उल्लंघन झाल्याचे आरोप सातत्याने होत आले आहेत. मात्र आश्चर्य म्हणजे, इतक्या गंभीर अनियमिततांनंतरही महसूल प्रशासनाची कारवाई कागदोपत्रीच अडकून पडलेली दिसते.

गाजीपूर-रुदाळी परिसरात तात्पुरत्या उत्खनन परवान्यांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर गौण खनिज उपसा झाल्याचे आरोप स्थानिकांकडून सातत्याने करण्यात येत आहेत. मंजूर क्षेत्र आणि प्रत्यक्ष उत्खनन यामध्ये मोठी तफावत असल्याचे सांगितले जाते.

परिणामी या भागातील डोंगररांगा विद्रूप होत आहेत, भूजल पातळीवर परिणाम होत आहे, धुळीचे प्रदूषण वाढत आहे आणि शेतीक्षेत्राचेही नुकसान होत असल्याची तक्रार ग्रामस्थ करत आहेत. मात्र पर्यावरणीय नुकसानाचे मूल्यमापन करण्यासाठी कोणतीही स्वतंत्र यंत्रणा सक्रिय झालेली दिसत नाही. स्थानिक पर्यावरणप्रेमींच्या मते, जर या संपूर्ण परिसराचे सॅटेलाइट सर्वेक्षण झाले, तर केवळ महसुलीच नव्हे तर पर्यावरणीय घोटाळ्याचेही मोठे वास्तव समोर येऊ शकते हे विशेष! गाजीपूर-रुदाळी परिसरात अनेक खदानींमध्ये मंजूर क्षमतेपेक्षा अधिक उत्खनन झाल्याचे दिसून येत असतानाही निवडक खदानींचीच ETS मोजणी करण्यात आल्याचे बोलले जात आहे. काही प्रकरणांवर कोट्यवधींचे दंड, तर काहींकडे पूर्ण दुर्लक्ष या विसंगतीमुळे प्रशासनाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ‘महसूल विभाग सर्व खदानींची निष्पक्ष मोजणी करण्यास तयार आहे का? की काही प्रकरणे जाणीवपूर्वक वगळली जात आहेत?’ असा सवाल आता ग्रामस्थ उघडपणे विचारू लागले आहेत.

दरम्यान, चांडक, चिमोटे, सोयाम व इतरांवरील दंड प्रकरणे प्रलंबित ठेवण्यामागील नेमकी कारणे महसूल विभागाने सार्वजनिक करावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा ‘कोट्यवधींच्या महसुली घोटाळ्याला प्रशासनाचीच मूक संमती आहे,’ असा आरोप आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

### ■ शासन नियमांना हरताळ; २५ टक्के रक्कमही न भरता प्रकरणे प्रलंबित?

शासनाच्या नियमांनुसार अवैध उत्खनन प्रकरणात दंड ठोठावल्यानंतर संबंधितांनी अपील करायचे असल्यास दंडाच्या अंदाजित रकमेपैकी किमान २५ टक्के रक्कम जमा करणे आवश्यक असते. तसेच अपील दाखल झाले तरी महसूल वसुली प्रक्रिया थांबवायची नसते. मात्र गाजीपूर-रुदाळी प्रकरणात नेमके याउलट चित्र दिसत आहे. चांडक, चिमोटे, सोयाम व इतरांवरील प्रकरणांमध्ये शासन नियमांनुसार २५ टक्के रक्कम भरवून घेण्यात आली का? जर नाही, तर संबंधितांना हा विशेष सवलतीचा लाभ कोणी दिला? असा थेट प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिकांचा आरोप अधिक गंभीर आहे. त्यांच्या मते, ‘दंड प्रलंबित ठेवण्याचा घाट हा महसूल प्रशासन आणि खाणधारकांच्या हातमिळवणीचा भाग आहे. अन्यथा सामान्य नागरिकांच्या थकबाकीसाठी जप्ती करणारे प्रशासन कोट्यवधींच्या दंड प्रकरणात एवढे शांत का?’

### तात्पुरत्या परवान्यांच्या आड उत्खनन सुरूच, पर्यावरणीय विध्वंसाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?

### ■ ६४ कोटींचा दंड अचानक ४८ कोटींवर; महसूल विभाग उत्तर देणार का?

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ आणि ३८ मधील अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात जमीनमालक विलास काळू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्यावर सुरुवातीला तब्बल ६४ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. महसूल विभागाच्या कारवाईनंतर हे प्रकरण मोठ्या चर्चेत आले; मात्र काही काळातच ETS मोजणीचा आधार घेत दंडाची रक्कम थेट ४८ कोटी रुपयांपर्यंत खाली आली.

या दोन मोजण्यांमध्ये एवढा मोठा फरक कसा निर्माण झाला? पहिली मोजणी चुकीची होती का? की दुसऱ्या मोजणीत काही ‘समायोजन’ झाले? हा प्रश्न आता नागरिकच नव्हे तर महसूल वर्तुळातही चर्चेचा विषय बनला आहे. विशेष म्हणजे, दंडाची रक्कम कमी झाली; पण शासनाच्या तिजोरीत प्रत्यक्ष किती पैसे जमा झाले, याचे स्पष्ट उत्तर मात्र प्रशासनाकडे नाही. त्यामुळे ‘कोट्यवधींचे दंड हे केवळ आकडेवारीपुरतेच आहेत का?’ असा सवाल उपस्थित होत आहे.

### ■ ५८ कोटी ‘सातबारावर’; महसूल विभागाची जबाबदारी संपली?

गट क्रमांक २ मधील बाळू शंकर सोयाम व इतरांवर २०१९ मध्येच तब्बल ५८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. मात्र त्यानंतर प्रत्यक्ष वसुलीसाठी कोणती कठोर कारवाई झाली, याचे उत्तर अद्याप अस्पष्ट आहे.

महसूल विभागाने संबंधित जमिनीच्या सातबारावर बोजा चढवून स्वतःची जबाबदारी संपल्यासारखी भूमिका घेतल्याची टीका होत आहे. ‘शासनाचा महसूल वसूल करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे की केवळ सातबारावर नोंद घेणे?’ असा प्रश्न स्थानिकांकडून विचारला जात आहे. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या दंडानंतरही संबंधित प्रकरणांतील आर्थिक व्यवहार, औद्योगिक हालचाली आणि खनिजाशी संबंधित कामकाज पूर्णपणे थांबलेले नसल्याचे बोलले जाते. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर संशय अधिकच वाढत आहे.

# तेजस्विनी पतसंस्थेत १० कोटींच्या ठेवींचा घोटाळा..!

## संचालक फरार, ठेवीदारांचा आंदोलनाचा इशारा



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ शहरातील तेजस्विनी को-ऑपरेटिव्ह वुमन सोसायटी पतसंस्थेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप समोर आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. ठेवीदारांना सुमारे १० कोटी रुपयांचा फटका बसल्याचा दावा होत असून संस्थेचे संस्थापक प्रमोद शिंदे यांच्यासह संचालक मंडळ फरार झाल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे. त्यामुळे संतप्त ठेवीदारांनी प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

माहितीनुसार, संस्थेकडून गुंतवणूकदारांना तब्बल २४ टक्के परताव्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणात ठेवी स्वीकारण्यात आल्या. अधिक नफ्याच्या अपेक्षेने अनेकांनी आपली आयुष्यभराची बचत या संस्थेत गुंतवली. मात्र मुदत पूर्ण झाल्यानंतर ठेवी परत मिळण्याऐवजी संस्थेचे कार्यालय बंद आढळून आले आणि संचालक मंडळाशी संपर्क तुटल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. ६ एप्रिल २०२६ रोजी संस्थेवर प्रशासक म्हणून ओंकार पहुरकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर १६ एप्रिल रोजी पंचनामा ☞(पान २ वर)

# परप्रांतीय भटक्या कुटुंबावर काठ्यांनी थरारक हल्ला

## रात्री जबरी चोरी, कौटुंबिक मंडळींना मारहाण..!

### -२६५०० रुपयांचा मुद्देमाल लुटला!



**बाभुळगाव/प्रतिनिधीः-** शहर पोलीस स्टेशन हद्दीत बसस्थानक परिसरात नवनिर्मित वसाहत वर्मा ले आऊट येथे दिनांक १४ मे च्या मध्यरात्री २ वाजताचे सुमारास दरोडेखोरांनी एका परप्रांतीय भटक्या कुटुंबावर काठ्यांनी थरारक हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली.यात सोन्याचे-चांदीचे दागिने व नगदी असा एकूण २६५०० रुपयांचा मुद्देमाल हिसकावून नेला. यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी कुसुम जब्बरसिंग चितोडिया यांच्या आई-वडील, आजोबा, मामा-मामी यांना जबरदस्तीने मारहाण करून जखमी करण्यात आले.याप्रकरणी फिर्यादी कुसुम चितोडिया ☞(पान २ वर)

# वेतन रखडल्याने समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे १५ मे रोजी अन्नत्याग

## दोन महिन्यांपासून वेतन नाही, प्रोत्साहनपर मोबदला थकीत

**टाकरखेडा शंभू/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत २०१९-२० पासून कार्यरत असलेले समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) हे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा मानले जातात. उपकेंद्र स्तरावर आरोग्य सेवा देत गावागावातील नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या या अधिकाऱ्यांचेच आर्थिक आरोग्य सध्या धोक्यात आले आहे. जिल्ह्यातील १९८ समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे मागील दोन महिन्यांपासून वेतन रखडले असून, कामावर आधारित प्रोत्साहनपर मोबदला तब्बल नऊ महिन्यांपासून मिळालेला नाही. त्यामुळे घरखर्च, मुलांच्या शाळेच्या फी, आई-वडिलांच्या औषधोपचारांसह दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले ☞(पान २ वर)

# ट्रकच्या चाकाखाली सापडून युवकाचा दुर्दैवी मृत्यू

## कोंडेश्वर मार्गावरील घटना; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोंडेश्वर रोड परिसरात ट्रकच्या चाकाखाली सापडून २५ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला आहे. मृतक युवकाचे नाव शुभम सुनील सोनोने (वय २५, रा. गोपाल नगर, अमरावती) असे आहे. माहितीनुसार, शुभमचे वडील सुनील रामराव सोनोने यांना फोनद्वारे माहिती मिळाली की, कोंडेश्वर रोडवरील बुद्ध विहाराजवळील शेतात त्यांच्या मुलाचा अपघात झाला आहे. ही माहिती मिळताच ते पत्नीसमवेत☞(पान २ वर)

# आयशर ट्रकमधून ११ गोवंशाना जीवदान

### -तिवसा पोलिसांची कारवाई

**तिवसा/प्रतिनिधीः-** गोवंशाना कत्तलीच्या उद्देशाने व निर्दयपणे कोंबून नेणाऱ्या वाहनांवर तिवसा पोलिसांनी कारवाईची धडक मोहीम सुरू केली असून अलीकडच्या ७ दिवसात चौथी कारवाई करून ५० पेक्षा अधिक गोवंशाची सुटका केली आहे.

बुधवारच्या रात्री साडेतीन वाजताचे दरम्यान पेट्रोलपंप चौकात आणखी एक आयशर ट्रक तिवसा पोलिसांनी पकडला.ट्रक क्रमांक MH 32,AJ-2233 यामध्ये ११ गोवंशाना कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने कोंबून नेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी☞(पान २ वर)

# तिवसा ते कुऱ्हा मार्गावर तब्बल ९३ किलो गांजा जप्त

## २३ लाख ७२ हजाराचा मुद्देमाल जप्त

### -स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई



**तिवसा/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात वाढत्या अंमली पदार्थांच्या अवैध तस्करीविरोधात तिवसा पोलिसांनी मोठी धडक कारवाई करत तब्बल ९३ किलो ६०० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. तिवसा–कुऱ्हा मार्गावरील शेंदुरजना बाजार परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे २३ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांच्या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार दिनांक १४ मे २०२६ रोजी तिवसा पोलीस स्टेशन हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नियमित पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना माहिती मिळाली की, एका सिल्वर रंगाच्या बोलेरो वाहनातून ☞(पान २ वर)

# महिलांनो आत्मरक्षणासाठी दुर्गा बना- काजल हिंदुस्थानी

## दर्यापुरात सभेला मोठी गर्दी -गोपाल अरबट मित्र मंडळाचे आयोजन



**खल्लार/प्रतिनिधीः-** महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा बसवायचा असेल तर आत्मरक्षणासाठी महिलांना दुर्गा बनावे लागेल, आपल्या मुलांवर चांगले संस्कार करा , मोबाईलच्या अति वापरा पासून दूर रहा , अनोळखी व्यक्तीला मोबाईल वर मित्र बनवू नका असे आवाहन सुप्रसिद्ध वक्त्या काजल हिंदुस्थानी यांनी दर्यापूर येथील भरगच्च सभेत केले. गोपाल पाटील अरबट मित्र परिवार यांच्या वतीने या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी मोर्शीच्या नगराध्यक्षा प्रतिक्षा गुल्हाने, प्रमुख पाहुणे अंजनगावचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले, प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख सुनिल डिके, सहसंपर्क प्रमुख गजानन वाकोडे,मार्गदर्शक रविंद्र गणोरकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख☞(पान २ वर)

# बांधकाम स्थळांवरील विजेच्या तारा चोरणारी टोळी जाळयात

## शहर गुन्हे शाखेची कारवाई; ५ गुन्ह्यांचा उलगडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील विविध बांधकाम सुरू असलेल्या घरांना लक्ष्य करून विजेच्या तारा चोरी करणाऱ्या एका सराईत चोरट्याला शहर गुन्हे शाखेने अखेर बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईत चार चोरी आणि एका जबरी चोरीसह तब्बल पाच गुन्ह्यांचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले. आरोपींकडून १ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव साहिल कैलाश राऊत (वय २४, रा. गांधी आश्रम परिसर) असे असून त्याच्यासोबत एका अल्पवयीन साथीदारालाही ताब्यात घेण्यात आले आहे. शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या बांधकामस्थळांवरून विजेच्या तारा चोरी होण्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे या मालिकेचा छडा लागला.

१३ मे रोजी शहर गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्त☞(पान २ वर)

# जिल्हाधिकाऱ्यांकडून ‘एल निनो’च्या पार्श्वभूमीवर आढावा

## पाणी, चाराचे नियोजन करण्याचे निर्देश



**अमरावती/प्रतिनिधीः-** ‘एल निनो’च्या प्रभावामुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पावले उचलली आहेत. यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेतली. या बैठकीत जिल्ह्यातील पाणी टंचाई, जलसंधारण, शेती आणि चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत विविध विभागांकडून सद्यस्थिती जाणून घेत आगामी काळातील उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीला प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार उपस्थित होते. ‘एल निनो’मुळे पाणी प्रभावीत होणार आहे. त्यामुळे उपाययोजना म्हणून जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी जिल्ह्यातील पाण्याच्या सद्यस्थितीची☞(पान २ वर)

# वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे वीज उपकरणे निकामी, नागरिक संतप्त



**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या समस्येबाबत शहर युवक काँग्रेस कमिटीतर्फे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला निवेदन देण्यात आले. शहरातील नागरिकांना सततच्या वीज खंडित समस्येमुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून तात्काळ वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. शहरातील नागरिक तसेच छोटे-मोठे दुकानदार अशा अनेक लोकांना या समस्येला सामोरे जावे लागत आहे. यामुळे झेरॉक्सच्या मशिनी, सिलिंग फॅन, फ्रिज ☞(पान २ वर)